

# भावबंध पंचक हे!

कुमारी शक्तिलीला (निकिता राजेश पाटील)

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# भावबंध पंचक हे!

## निकिता राजेश पाटील

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# भावबंध पंचक हे!

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना दाद द्या

ई साहित्य ला आपल्या मित्रांचे मेल पत्ते द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# भावबंध पंचक हे!


## निकिता राजेश पाटील

पत्ता : १०९, वांगणी हाईटस्, बदलापूर नेरळ हायवे, पूनम हॉटेलजवळ, वास्तुकार नगर, वांगणी (पूर्व), जि. ठाणे. 421503

फो. न. : ८६८९९५४८०६

e-mail shaktileelanikita@gmail.com



**या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.**

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :
www. esahity.com
esahity@gmail.com
eternity, G1102,
eleventh floor,
eastern express highway,
Thane. 400604

प्रकाशन : २० सप्टेंबर २०२१ (भाद्रपद पौर्णिमा १९४३)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## *भावबंध पंचक हे!*

-निकिता राजेश पाटील

## परिचय

नाव:-निकिता राजेश पाटील.

वांगणीत वास्तव्य.

"कुमारी शक्तिलीला" या नावाने कविता लेख कथांचे लेखन.

कथालेखन काव्यवाचन अशा स्पर्धांत सक्रिय सहभाग.

वाङमयीन परिचय:-१) संस्कृत चंद्रिका अशा मासिकात श्लोक लेखन.



२)विद्याविकास संस्थेच्या वार्षिकात( सांवत्सरिकात) रौप्य महोत्सवानिमित्त "द्रौपदीचे आत्मकथन" हा ललित लेख व "मनाचे प्रदूषण" ही कविता व "बायको नावाचं अजब रसायन" ही विनोदी कथा प्रकाशित.

३) टिळकनगर सांस्कृतिक महोत्सवानिमित्त “द्रौपदीचे स्वगत” ह्या एकपात्री प्रयोगाचे वेशभूषा-प्रयोगलेखन-फार्सलेखन व सादरीकरणाचा एकत्रित मेळ.

४) बदलापूरच्या कविसंमेलनात कविरुपात काव्यवाचन.

५) अस्मिता या हस्तलिखित सांवत्सरिकात “नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर” या लेखाचे लेखन.

६)मानवविद्या विभागात “वाचनसंस्कृती : डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयाचे महत्त्व” या विषयावर संशोधन.

७) निबंध स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक.

वाचन:- मी आजपर्यंत विविध प्रकारची पुस्तके वाचली आहेत.त्यातील सगळ्यात जास्त महाभारताची पुस्तकं आहेत.

शिक्षण:- एसवाय बीए.

फोन नंबर:- ८६८९९५४८०६ 👸 👰 👸

# अर्पणपत्रिका



# उपोद्घात

*द्रौपदी! महाभारताची महानायिका ! जिचा प्रवेश महाभारतात झाल्यानंतर जिच्यावरच भारतीकथा केंद्रित झाली आहे व जिने युगपरिवर्तन घडवले, अशी लोकोत्तर व्यक्तिरेखा !*

*ही व्यक्तिरेखा २०१५ पासून माझ्या मनात आहे. प्रथमतः मी वयाच्या बाराव्या वर्षी द्रौपदीच्या जीवनावर आधारित कल्पित कथा लिहिल्या. ज्या शिक्षकांनी या कथा वाचल्या, त्या कथा त्यांना सत्यच वाटल्या. त्यानंतर मी द्रौपदीच्या जीवनावर आधारित चित्रकथा लिहिली. परंतु ती अपूर्णच राहिली.*

*त्यानंतर माझ्या मनात असलेले स्वप्न २०१७ ला पूर्ण झाले. माझी प्रकर्षाने इच्छा होती, की मी द्रौपदीचे पात्र रंगमंचावर साकार करावे. तेव्हा मला सांस्कृतिक कार्यक्रमात 'द्रौपदीचे स्वगत' हा एकपात्री प्रयोग करण्याची संधी मिळाली.*

*खरं पाहता, द्रौपदीचा आयुष्यपट इतका व्यापक आहे, की ३ मिनिटांच्या स्वगतात द्रौपदीचे जीवन सामावून घेणे अत्यंत दुष्कर कार्य होते. द्रौपदीच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना वेचून संक्षिप्तात*

*‘ द्रौपदीचे स्वगत’ लिहिण्यासाठी मला तब्बल दोन तीन दिवस लागले, तर अभिनयाच्या सरावासाठी पंधरवडा.*

*परंतु त्या अभिनयातून मला एक सुंदर आणि बोधप्रद अनुभव आला होता, जो मी कधीच विसरू शकत नाही.*

*तो अनुभव असा होता,*

*“ **जेव्हा तुम्ही एखाद्या व्यक्तिरेखेला अभिनय किंवा लेखनरूपाने आवाज देत असता, तेव्हा परकायाप्रवेशापेक्षा परविचारसंज्ञान महत्त्वाचे असते, कारण ती भूमिका करताना वा त्या भूमिकेतून लिहिताना स्वतःच्या अस्तित्वाचे व पात्राच्या व्यक्तिमत्त्वाचे भान ठेवावे लागते.”***

*मी हे आतापर्यंत लक्षात ठेवलेलं आहे, व नंतरही मी लक्षात ठेवणार आहे.*

*पुढे नंतरच्या काळात मला द्रौपदीविषयी लिखाण करण्याची इच्छा निर्माण झाली. त्यासाठी मी महाभारत व द्रौपदीच्या जीवनावर आधारित कादंबरी तसेच ग्रंथांचा अभ्यास केला. जननीमाईंच्या कृपेने मला विभिन्न पुस्तके उपलब्ध झाली.*

*मात्र मला सर्वांपेक्षा वेगळे आगळे लिहिण्याची कामना होती, आहे. त्यामुळे मी पांडव व द्रौपदीच्या नातेसंबंधांवर आधारित*

महाकादंबरी लिहिण्याचे ठरविले. जननीमाईंच्या प्रेरणेने ती महाकादंबरी लिहून झाली.

मी पांडव -द्रौपदीचे नातेसंबंध इंद्रप्रस्थातील निवडले नाहीत. ते सर्वविदित आहेतच.

याउलट मी वस्त्रहरणानंतरचे अन् वनवासातील पांडव-द्रौपदीचे नातेसंबंध निवडले आहेत. कारण वस्त्रहरणानंतर त्यांच्या नात्यांत पडलेला काहीसा फरक, आलेला तणाव, तेढ व द्रौपदीच्या मनाची व्यथाही मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

याशिवाय मोठमोठे संवाद, अलंकारिक शब्दरचना आणि अधिकाधिक विशिष्ट शब्दांचा वापर हे माझ्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे, हे या महाकादंबरीतून जाणवेलच!

याखेरीज मी या कादंबरीच्या प्रथम भागाचा शेवट द्रौपदी-सत्यभामा संवादाने केला आहे. खरं पाहता, मला या संवादाचं अप्रूपच वाटतं. द्रौपदीने नीतिशास्त्र, धर्मशास्त्र, राजनीती, अर्थशास्त्र यांचा जितका अभ्यास केला होता, तितकेच तिचे सखोल चिंतन मानसशास्त्रातही होते.

मी आज वैकासिक व सामाजिक मानसशास्त्रात वैवाहिक जीवनात कसे वागावे, एकमेकांमध्ये कसं विश्वासाचे नाते निर्माण

*करावे, त्याकरिता आवश्यक असणाऱ्या कोणत्या आदर्श तत्वं, मूल्यांचे पालन करावे, जोडीदाराच्या मनातील भाव कशा प्रकारे समजून- जाणून घ्यावे, याविषयी वाचले आहे. परंतु ५,००० वर्षांपूर्वी पांचालीने केलेली या सर्वांविषयीची प्रतिपादने अत्यंत प्रगल्भ व परिपक्व विचारांनी परिपूर्ण आहेत, वैवाहिक जीवनातील समस्यांबाबत आजही चिंतनप्रवृत्त करायला लावणारी आहेत.*

*आणि याशिवाय युद्धानंतर पाण्डव- द्रौपदीच्या नात्यांमध्ये आलेला पुनः तणाव नि त्यातून उद्भवणारी विरक्ती हे भावबंध रेखाटण्याचाही मानस आहे. जननीमाईंच्या कृपेने ते भावबंधही पूर्ण होतील.*

*द्वितीय भागाची प्रतीक्षा करावी.*

निरंतरमस्तु ॥

भावबंध

पंचक हे!

एक विलक्षण महाकादंबरी

- कुमारी शक्तिलीला



# *प्रथम बंध......*

**ॐ श्री गुरवे नमः।**

**ॐ श्री प्रेरणायै नमः||**

**इति||**

**पा**षाण तसेच दर्भ उगवलेल्या भूमीला ती स्वच्छ करत होती. त्यानंतर पवित्र शेणाचे वलय करत पुष्पांचा सडा घालत होती. तिचे तर ते नियमित कार्य होते.

परंतु तिच्या त्या कार्यावर कोणीतरी केर पसरवत होते. तिनं पाहिले, तो तिने सडासंमार्जन केलेल्या भूमीवर केर काढीत होता,

तिला क्रोध आला. मात्र तिने शांतपणे म्हटले, “आर्यपुत्र नकुल! आपण हे काय करताहात?”

“ नीलांगिनी! मी केर काढीत आहे.’’ नकुलाने म्हटले.

“नाथ, सडासंमार्जन केल्यानंतर कोणी केर काढतं का?”

“अं.... अं....” नकुल अडखळला.

“आता मला हे कार्य पुनः करावे लागेल.” तिने म्हटले. “क्षमा कर, पांचाली! मी फक्त साहाय्य करत होतो.” नकुलाच्या शब्दांवर पांचाली हसली,

”तुम्ही फक्त तलवार चालवून युध्दकौशल्याचा सराव करा. मला गृहकार्ये करू द्या. अन्यथा माझे चित्त सदैव विचलित होईल.”

“अवश्य. किंतु हीच गृहकार्ये मी सहजरित्या करायचो, मात्र ते १७ वर्षांपूर्वी! राजमाता कुंती आम्हां सर्व पांडवांना ही सर्व कार्ये करण्याची आज्ञा द्यायच्या. आम्ही ती सर्व कार्ये करायचो. त्याकारणे आम्ही त्या कार्यांत प्रवीण झालो होतो. परंतु अकस्मात तू गृहात आलीस, अन् आमची कार्ये तुझी झाली.”

“उचित म्हणालात आर्य! आपली राजनीती, आपली गुप्तचर यंत्रणा, आपली कृषीव्यवस्था, आपली अर्थव्यवस्था अशी आपली राजकीय आणि आर्थिक कार्येही माझी झाली.” पांचाली चतुराईने म्हणाली.

“तुझ्या तर वाक्चातुर्याला तोड नाही, द्रौपदी!” नकुलाने म्हटले.

“ते तर आहेच; आपणही वाक्चतुर आहात! किंतु एक कार्य कराल?” द्रौपदीने त्याला विनंती केली.

“तू एक सांग, मी दहा कार्ये करेन.” यावर द्रौपदीने हसत म्हटले, “ आपण एकच कार्य करा. आपणांस निसर्गात अत्यंत रुची आहे. आपण

आपल्या कुटीच्या परसातील रोपांना जल घालून त्यांच्या मुळाशी खत घालाल? माझ्यापेक्षा आपणास वनस्पती शास्त्राचे अधिक ज्ञान आहे ना....”

“तत्पूर्वी आपली ही प्रभात काहीशी प्रणयरम्य व्हायला नको का?” नकुलाने तिच्या कटीला आपल्या बाहूंचा विळखा घातला. तसे द्रौपदीने आपले हात नकुलाच्या कंठात गुंफण्याचा प्रयास केला. त्याक्षणीच नकुलाने द्रौपदीचे हात दूर केले, “नको , तुझे हात शेणाने भरलेले आहेत?!”

“आर्य, कोणाचे दुष्कर्म केल्याकारणे हात बरबटले आहेत, अन् तुम्ही कोणाच्या हातांना अकिंचन म्हणताहात?” द्रौपदी आपले हात धुता-धुता गंभीर झाली.

“नीलांगिनी, तू कुठल्याही वाक्याचा संदर्भ वस्त्रहरणाशी व कौरवांशी कसा काय जोडतेस?”

नकुलाने रोषाने म्हटले.

“आर्य, ती माझ्या जीवनातील अशी घटना होती, जिचे विस्मरण घडणे या जन्मात तरी शक्य नाही.”

नकुल हे ऐकून दुःखी झाला. मात्र नीलांगिनीला त्या स्मृतींपासून त्रास होता कामा नये म्हणून तिचे मन वळवले पाहिजे.

“चुकूनही प्रयाणासमयी अर्जुनाला शिवस्तुतीकरिता वीणा देऊ नकोस. कारण त्याने एकदा वीणेच्या तारा छेडताना ताराच तुटल्या होत्या.”

नकुलाने तिचे मन या विषयावरून वळवण्याचा प्रयास केला.

द्रौपदीने मंदस्मित केले अन् नकुलाच्या कंठात आपले स्वच्छ हात गुंफत म्हटले , ”आर्य, कसं? कसं आपण मला हसवणं जाणता?”

“मला ज्ञात नाही, परंतु मीही उत्कृष्ट धनुर्धर आहे. मी मारलेला तीर संधान साधत असणारच ना ....... आताही पाहिलंस ना, मी कसा तीर परजला तो!”

नकुलाच्या शब्दांवर द्रौपदीने म्हटले , “ आर्य, आपणही ना!...”

ते दोघे असेच एकमेकांच्या बाहुपाशात असतानाच त्यांच्या त्या प्रणयाला भंग करणारा एक रुष्ट स्वर आला, “ अतिसुंदर! आपला पती तथा भ्राता तपस्येस प्रस्थान करत असताना कृष्णा व नकुल रत होताहेत?”

तो स्वर अर्जुनाचा होता. द्रौपदी चटकन सावध झाली अन् तिने नकुलाला आपल्यापासून दूर केले.

ते पाहून अर्जुन द्रौपदीवर क्रुद्ध झाला, “ कृष्णे, तू आपल्या पतीच्या प्रयाणाची, त्याला उपयुक्त असणाऱ्या वस्तूंची व्यवस्था करायचे सोडून तू नकुलासह रममाण होतेस?”

“आर्यपुत्र अर्जुन! तेही माझे पती आहेत. त्यांच्याशी मी रममाण झाले तर, त्यात माझा व नकुलांचा काय दोष?” द्रौपदीने स्पष्टपणे म्हटले.

“म्हणजे माझ्या गमनानंतर तुला माझ्या व्यथापूर्ण क्रोधापासून मुक्तता मिळणार! याचाच अर्थ, माझ्या गमनाकारणे तुला आनंद झाला आहे.”अर्जुन रुष्ट झाला.

“आर्य, आपल्या गमनाकारणे मला स्वप्नातही आनंद वाटेल का? अन् आपल्या रोषाचा मी कधीच स्वीकार केला आहे, म्हणजे आपणा सर्वांच्या……” द्रौपदीने नकुलाला पाहत म्हटले.

“मला वाटतं, तुम्हां दोघांना एकांताची आवश्यकता आहे!” असे म्हणून नकुल काही अंतर दूर गेला. त्याला ज्ञात होते, अर्जुन आता रुष्ट आहे, तो द्रौपदीशी एकही शब्द बोलणार नाही.

नकुल अर्जुनाचा स्वभाव उत्तम प्रकारे जाणत होता. त्याने पाहिले, अर्जुन क्रुद्ध होऊन तेथून निघून गेला आहे. द्रौपदी मात्र तेथेच उभी होती.

नकुल तिच्याजवळ गेला अन् तिच्या कोमल बाहूंवर अलगद हात फिरवत तिच्या विचारतंद्रीतून जागृत केले, ”काय झाले, प्रिये? कसल्या विचारांत आहेस?”

“ नाही, काही नाही , आर्य! मला अनेक कार्ये करायची आहेत, त्यांचाच विचार करत…….”द्रौपदीचं वाक्य तोडत नकुलाने म्हटले, ” सरळ का सांगत नाहीस, अर्जुनाचा विचार करत होतीस ते? मी सांगतो

तुला, या अर्जुनाचा क्रोध शमणे शक्य नाही म्हणून त्याचा विचार सोडून दे.”

“नाही, मला आर्यपुत्र अर्जुनांचा रोष दूर करणे आवश्यक आहे.” द्रौपदी विचारमग्न झाली, ”अन्यथा तोच रोष त्यांच्या तपस्येत बाधा उत्पन्न करू शकतो.”

असे म्हणून द्रौपदी अर्जुनामागे गेली…..

“**कु**ठे चाललास, अर्जुना? द्रौपदी क्रुद्ध झाली की काय?” सहदेवाने वेगाने चालणाऱ्या अर्जुनास अडवून विचारले.

“काही नाही रे, सहदेवा! मी तपस्येत प्रयाण करण्यासमयी माझ्याकरिता उपयोगी वस्तूंची व्यवस्था करण्याऐवजी ती नकुलाच्या बाहुपाशात रत होती!” अर्जुनाच्या स्वरात मत्सर होता.

“तर काय झालं? ती तुझी एकट्याचीच भार्या आहे का?” सहदेवाने सहजपणे म्हटले.

“तेच तर माझे शल्य आहे.” अर्जुनाच्या मनात अजूनही विषाद होता.

“आपण पाची पांडव व ऋतानृतेने १७ वर्षांपूर्वीच विवाह केला होता, नि तिने आजपर्यंत यशस्वीपणे गृहस्थीची दायित्वे, कर्तव्ये

पेलवली आहेत. तरीही तू पूर्वेतिहासाचे का वारंवार चर्वितचर्वण करतोस?" सहदेवाने म्हटले.

"सहदेवा! कुणा पुरुषाला आपल्या पत्नीचे आपल्या भ्रात्यांतच विभाजन झालेलं रुचेल का? आपलेच भ्राते आपल्या पत्नीला आपल्यासमोरच आलिंगन देतात, हे पाहून कुणा पुरुषाचे पौरुष्य दुखावले जात नाही का?"

"तुझा पुरुषार्थ? तुझे पौरुष्य? त्याविषयी काहीच सांगू शकत नाहीस तू!"सहदेव उपरोधाने हसला, "द्रौपदीच्या विभाजनाच्या वेळी नि वस्त्रहरणावेळी तुझा पौरुष्य, पुरुषार्थ कळला, स्वयं ऋतानृतेलाही दिसला."

"तसं म्हणजे तुझाही पुरुषार्थ द्यूतसभेत दिसला. तू तर नेत्र मिटून बसला होतास." अर्जुनाने म्हटले.

"हो, मला द्रौपदीची अवस्था पाहवत नव्हती व मी तिची विटंबना टाळूही शकत नव्हतो, म्हणून मी नेत्र मिटून घेतले होते. मला माझा प्रमाद मान्य आहे. पण द्रौपदीच्या विभाजनाचे काय? तू उघड्या नेत्रांनी मूकपणे ते सहन केलेस , कुरुवंश तिची निंदा करताना, भ्राता युधिष्ठिर नि राजमातांनी तिचे विभाजन करताना तू शांत राहिलास. त्यात कुठला तुझा पुरुषार्थ होता?"

“ मी विवश होतो, माझ्या माता- भ्रात्याच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी परंतु तिने निदान माझा तरी विचार करावा.......”

“अरे! अर्जुना, तिने तुझा विचार केला पाहिजे असं म्हणतोस, तूच स्वतः या विवाहाचं समर्थन केलं होतं ना रे. तेव्हा तू स्वतः विरोध करायला हवा होतास. ते तर करणं दूरच, तू द्रौपदीलाच या घटिताचा दोष देतोस.

याशिवाय तू तिच्यावर रुष्ट होऊन गोहरणासमयी वनवासास जाण्याचा निर्णय केला होतास, ते तिला दंडित करण्यासाठी. अन् आजही तूच तिला दोषी ठरवितोस. तुझ्या या अशा रोषपूर्ण आचरणाने तिची ओढाताण किती होते, असा विचार केलास का कधी? अरे, पूर्वी आपण एक व्यवस्था आखली होती, ज्या व्यवस्थेकारणे द्रौपदी क्रमाक्रमाने आपल्या पतींची सेवा करू शकत होती. परंतु ती व्यवस्था आता आपण स्थगित केली आहे. कारण प्रारंभी द्रौपदीची मानसिक स्थिती ढासळली होती अन् नंतर आपल्या सर्वांची मने विचलित होती. त्याकारणे तिला पाच पांडवाची सेवा, त्यांना अर्थातच आपल्याला संतोष राखणे, प्रसन्न करणे हे सर्व एकत्रित करावे लागते आहे. त्यामुळे तू तिचे कष्ट कमी करण्यापेक्षा तिला अधिक पीडा देतोस!”सहदेवाच्या शब्दांनी अर्जुन भावुक झाला व विचारमग्न झाला.

सहदेवाच्या शब्दांत तथ्य आहे. किंतु आपणही द्रौपदीवर सर्वाधिक प्रेम करत आहोत. म्हणूनच तिने केलेली उपेक्षा किंबहुना अन्य पांडवां-

सह केलेली अधिक कालक्रमणा आपल्याला सहन होत नाही. न प्रेमात आपल्या प्रिय व्यक्तीवर रोष व्यक्त करण्याचा अधिकार आपल्याला असतोच की! कृष्णाही आपल्यावर कधी कधी क्रुद्ध होते ना!

“प्रेमात मत्सर नसतो, अर्जुना! कुठलाही अधिकाराचा दुरुपयोग करू नये.” क्षणार्धात सहदेव गंभीर झाला, “अन् ऋतानृता कधी कधी क्रुद्ध होणारच! कारण वस्त्रहरणानंतर आपल्या सर्वांतील नाते, द्रौपदीचा आपल्यावरील विश्वास नि आपण ज्या व्यवस्थेचे अभ्यस्त होतो- ती व्यवस्था, आपली स्थिती- परिस्थिती व मन:स्थिती यात खूप परिवर्तन घडले आहे.”

“खरंच आहे तुझं, सहदेवा! किंतु द्रौपदीने आपल्या विभाजनाला नकार दिला असता तर…....” अर्जुनाने म्हटले.

“ऋतानृतेने कुमारिका राहून समाजाच्या दूषणांसह पितृगृही वास करण्यापेक्षा पाच पुरुषांशी विवाह करून चारित्र्याची, पवित्रतेची अग्निपरीक्षा देण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला, जेणेकरून समाजाला हे कळायला हवे की चारित्र्य, एकस्व, पतिनिष्ठा नि पवित्रता या सर्वांचा जन्म तसेच उदय आत्म्याद्वारे होतो.” सहदेवाने आत्मविश्वासाच्या स्वरात म्हटले, “या संकल्पना शरीर, विचार, स्मृतींशी, योनीशुचितेशी संबंधित नव्हेत.”

“तरीही माझ्याकरिता हे पीडादायक आहे.”अर्जुन हताश झाला.

“वस्त्रहरणासमयी कर्णाने तिला ‘पाच पुरुषांशी रममाण होणारी ‘बंधकी’ असे म्हणून विवस्त्र करण्याची दुःशासनाला सूचना केली होती, तेव्हा तिला किती पीडा झाली असेल!” सहदेव व्यथित झाला.

“ खरोखरच हे सर्व काही माझ्याकारणेच घडलं! मी जर द्रौपदीचे विभाजन रोखले असते तर, त्या नीच कर्णाला द्रौपदीने ‘सूतपुत्र’ म्हणून त्याला नकार देण्याचा प्रतिशोध घेण्याकरिता द्रौपदीच्या मर्म-चारित्र्याविषयीचा तर्क प्राप्त झाला नसता अन् द्रौपदीच्या चारित्र्यावर लांछन बसलेच नसते.”अर्जुन पश्चातापदग्ध झाला.

“परंतु आर्यपुत्र सहदेव!” द्रौपदी अकस्मात् तेथे आली.

“कृष्णे, तू?” अर्जुन चकित झाला.

“परंतु आर्यपुत्र सहदेव! आपणही माझ्या विभाजनाला विरोध करायला हवा होता?”

यावर सहदेव मुखस्तंभ झाला. धैर्य साधत त्याने म्हटले, ” तू आमच्याकरिता स्वतःच्या सुखाचे, सन्मानाचे बलिदान करावे ही आमची कामना होती. आमच्याशी विवाह करून आपले नाते, वचने व कर्तव्ये निभावत यशस्विनी होण्याचा निर्णय तुझा असणार होता.”

“ उचित म्हणालात आपण, आर्य! आर्यपुत्र अर्जुनांच्या उपयोगी वस्तूंची व्यवस्था मी करायला जाते. अनुमती आहे?” द्रौपदीने विचारले.

“अवश्य……” सहदेवाने द्रौपदीचा हात धरला. “चला, आर्यपुत्र अर्जुन.” आपला दुसरा हात अर्जुनाच्या हाती देत तिने सहदेवाला विचारले, “आर्यपुत्र सहदेव! आपण माझ्या या प्रश्नाकारणे दुखावला गेलात का?”

“दुखावलो गेलो होतो आणि दुखावलो गेलो नाहीही.” सहदेवाने उत्तर दिले, “ मात्र हा प्रश्न इतक्या वर्षानंतर निरर्थक नाही का वाटत?आपले नाते कधीच विणलेले आहे, ते अतूटपणे, घट्टपणे!”

“ **कृ**ष्णे……” अर्जुनाने द्रौपदीला साद घातली. द्रौपदीने अर्जुनाची वस्त्रे , फळे आणि प्रवासात क्षुधेच्या तृप्तीकरिता उपयुक्त अन्नाने भरलेली अशी पेटी, तळहाताएवढे मावणारे शिवलिंग व त्यावर लपटलेले कषायवस्त्र अशी सामुग्री वस्त्रांत बांधत होती.

“आर्य! यात तुमचे आराध्य- महादेव कषाय वस्त्रात लपेटून ठेवलेले आहेत. ते तुम्हाला तुमच्या तपसाधनेत यश प्रदान करतील.” असे म्हणून द्रौपदीने अर्जुनाच्या भालप्रदेशावर तिलक रेखत त्याला पंचारतीने ओवाळत विचारले, ”आर्य! आपण कधीपर्यंत परताल?”

“ज्ञात नाही , परंतु तुझ्याकरिता लवकरात लवकर परतेन.” अर्जुनाच्या या शब्दांना विरोध करत द्रौपदीने गांभीर्याने म्हटले, “ आर्यपुत्र! हा काही प्रवास नव्हे, की तुम्ही ठरवून निश्चित करून परतू शकाल. ती तपश्चर्या आहे, आर्य! तपश्चर्या फलिभूत होईपर्यंत आपणास एकाच स्थानी तपस्या करणे क्रमप्राप्त आहे अन् मला ज्ञात आहे....” द्रौपदी क्षणभर भावनाविवश झाली, “ की हे पार्था! आपण दीर्घकाळाकरिता जात आहात, त्याकारणे माझे मन कशामुळेही आनंदित होणार नाही. तुमच्या विरहात माझ्या जीवनात कोणताही रस उरणार नाही.”

हे ऐकून अर्जुन क्षणार्धात दुःखी झाला. त्याला भावुक झालेलं पाहून त्याची ती भावुकता त्याच्या तपस्येत बाधा उत्पन्न करेल, असे वाटून तिने कठोर स्वरात म्हटले, “आर्यपुत्र! तरीही मी भावुक न होता आपणां सर्वांकरिता, आपणा सर्वांच्या ध्येयपूर्तीकरिता, आपणा सर्वांना न्याय मिळण्याकरिता नि आपल्या तपश्चर्येकरिता आवश्यक असलेला अर्जुनविरह सहन करेन.” तिचा स्वर ओजस्वी झाला, “तुमच्या यशासाठी मी शांतपणे प्रार्थना करेन. मी तुमच्यासाठी वसु, रुद्र, आदित्य, मरूद्गण, विश्वेदेव आदि देवतांना शरण जाऊन आपले शुभाभिष्टचिंतन करेन.”

असे म्हणत द्रौपदी अर्जुनाच्या चरणांशी झुकली, किंतु तिचे हात त्याच्या चरणांपर्यंत पोचेनात.

"कृष्णे, तू माझे चरण शिवू नकोस. मी तुझ्याप्रति अत्यंत अन्याय केला आहे."

हे ऐकल्यानंतर तिने त्याचे चरण शिवले व घट्ट धरून ठेवले.

"हे काय करतेस?" अर्जुनाने विचारले.

"आर्य! आपण कधी परताल, हे ज्ञात नाही. म्हणून आपले चरणकमल, त्यानंतर मुखकमल , आपले बाहू- ज्यांच्या साहाय्याने सदैव मला कवटाळता, आपले हास्य, आपले काळेभोर नेत्र- ज्यांत मला माझीच प्रतिकृती दिसत राहते, आपले अधर......." द्रौपदीने अर्जुनाच्या रूपाचे वर्णन करण्यास आरंभ केला, तसं अर्जुनाने म्हटले, " कृष्णे!पुरे! पुरे!"

"आर्य! मला आपल्या या रूपास नेत्रांत, हृदयात साठवायचे आहे आणि हळूहळू ते अलवारपणे हृदयाच्या भूर्जपत्रावर रेखाटायचे आहे, मनाच्या एका कप्प्यात बंदिस्त करायचे आहे, नि तुमचे स्मरण घडताच मी ते उघडून पाहेन." द्रौपदीने अर्जुनाच्या वक्षावर मस्तक ठेवले.

"कृष्णे, मला क्षमा कर."असं म्हणत अर्जुनाने तिच्या केसावरून हात फिरवला, तसा तो शहारला. त्याचा हात कंप पावला, द्रौपदीचा केशांत असलेली वस्त्रहरण- केशाकर्षणाची वेदना थेट त्याच्या उरात

घुसली. त्याला आज कळले होते, की द्रौपदीने आपले केश का मोकळे सोडले होते? ही सुकेशी मुक्तकेशी का झाली होती ते!

“आर्य! आपण मूक का? काही दुःख आहे का?” द्रौपदीने विचारले.

“फार मोठं दुःख आहे, पांचाली. पण तुला कसं.....”अर्जुन अडखळला.

“माझ्याकडे दुःख सोपवून निश्चित व्हा. कारण नियतीनेही मला याकरिताच विश्वस्त मानले आहे.” आपण काय बोलतोय हे कळताच द्रौपदीने दातांखाली आपला अधर दाबला.

तिचे शब्द ऐकून अर्जुन हसला, विषण्णतेने, ” द्रौपदी! तुझ्याकडे कसं सोपविणार! तुझंच दुःख आहे ते.” त्याच्या त्या शब्दांचा अर्थ तिला कळला. तिच्या नेत्रपटलांवरून त्या घटना झाल्या, पुनः तितक्याच जिवंतपणे व असोशीने! ते पाहून ती जितकी पीडेने तडफडली, तितकीच क्रोधाने भडकली.

तिचे नेत्र अंगार व जलाने भरून गेले. ती उत्तेजित झाली. तिच्या स्वरात विलक्षण धार व थरथर होती, “आर्य! तर त्या दुष्टांना दंड देण्याकरिता व मला न्याय देण्याकरिता आपणांस तपस्या करावीच लागेल, तेही अविचलितपणे.”

तिच्या क्रोधाचा व उत्तेजनाचा परिणाम अर्जुनावरही झाला. त्याचे बाहू वीरश्रीने स्फुरण पावले. त्याच्या एका शब्दातच त्याचा निश्चय सामावलेला होता, “अवश्य.”

“ तथापि आर्यपुत्रांच्या चरणीं एक विनंती आहे...” द्रौपदीने क्षणभर दृष्टी खाली वळवून पुनः अर्जुनाच्या नेत्रांस भिडवली, “माझे हे.....”

द्रौपदीने आपले केस अर्जुनापुढे धरले, तशी अर्जुनाच्या गहिऱ्या नेत्रांत उद्वेगाची ठिणगी फुलली. “ माझ्या या मुक्त केशांचे सदैव स्मरण असावे.” तिच्या स्वरात कंप होता, “अन् त्या स्मरणाने तुम्हाला दुष्टसंहाराकरिता प्रेरित करत राहावं!”

यावर “तथास्तु!”इतकंच अर्जुन उच्चारु शकला.

“**अर्जुना**! आपलं तन- मन- सर्वस्व ईश्वरचरणी अर्पण करुन तपस्या कर. कुठल्याही परिस्थितीत पाशुपतादि दैवी अस्त्रे प्राप्त झाली पाहिजे.” युधिष्ठिराने अर्जुनाला सूचित केले, “अन्यथा तो कर्ण मला परास्त करेल, माझा प्राणही घेईल.”

“ तू चिंता करू नकोस, भ्रात्या! तुझ्या निद्रेचे हरण करणाऱ्या नि द्रौपदीच्या पवित्र शीलाची निंदा करणाऱ्या त्या कर्णाचा मी शिरच्छेद करेन! अन् हे लक्ष्य प्राप्त करण्यासाठीच मी घोर तपश्चर्या करेन, जोपर्यंत महादेव आणि इंद्रादि देवता प्रसन्न होत नाहीत, तोपर्यंत माझे तप अविरत चालू राहिल.” अर्जुनाचा निर्धार अगदी ठाम होता.

“ तुझ्या तपाला यश प्राप्त होवो! तुझ्यावर महादेव इंद्र तसेच अन्य देवतांची कृपा सदैव राहू दे!” भीमाने अर्जुनाला आलिंगन देत शुभाशीर्वाद दिले.

“ यदि इंद्राने स्वर्गात तुला नेले, तर कुठल्याही अप्सरेच्या प्रेमबंधनात अडकू नकोस म्हणजे झालं!” नकुलाने अर्जुनाला खिजवले.

“तू तुझं पहा, नकुला! तू एखाद्या वनकन्येशी विवाह केलास तर....” अर्जुनाने म्हटले.

“मी अजून दहा विवाह करेन, रे! परंतु द्रौपदी माझ्यावर क्रुध्द होईल ना...... त्यातच तिची मनःस्थिती ढासळलेली..... म्हणून मी तिचा विचार करून मी फक्त तिचीच काळजी घेण्याचे व तिच्यावरच लक्ष केंद्रित करायचे ठरवले आहे.” नकुलाने म्हटले. यावर अर्जुन हसला.

“हसू नको, भ्रात्या! तो ठरवलं तर, द्रौपदीची काळजी उत्तमरीत्या घेऊ शकतो. अन् तो तिची काळजी घेतही आहे.” सहदेवाने म्हटले.

“ कृपया तुम्ही चौघांनीही द्रौपदीची काळजी घ्या. तिला मानसिक, शारीरिक कष्ट, पीडा होणार नाहीत, याचीही जरा चिंता करा.” अर्जुनाने म्हटले.

“आर्य, एक क्षण थांबा.” असे म्हणत द्रौपदी लगबगीनं आश्रमाच्या अंगणात आली व तिने अर्जुनच्या हातात पळीभर घट्ट रसदार मधुपर्काचे द्रावण ठेवले, “यशस्वी व्हा.”

“ एवमस्तु! कृष्णे!” अर्जुनाने मधुपर्क ग्रहण केला. त्याने निरोप घेता- घेता पुन्हा आपल्या भ्रात्यांना बजावले, “ द्रौपदीची काळजी घ्या.”

त्याक्षणी युधिष्ठिराने द्रौपदीला जवळ घेत म्हटले, “तू चिंता करू नकोस, अर्जुना! मी तिची काळजी घेईन ना…”

हे पाहून अर्जुनाला मत्सर वाटला खरा, परंतु त्यावर काहीच प्रतिक्रिया न देता तो तिथून निघून गेला.

मात्र अर्जुनाची दृष्टी अलगद आपसूक मागे वळली, द्रौपदीकडे. मात्र द्रौपदीचे लक्ष त्याच्याकडे नव्हतेच! ती तर रोषाने तर युधिष्ठिराकडे पाहत होती.

हे पाहताच अर्जुनाने दृष्टी फिरवली, तत्क्षणीच द्रौपदीने अर्जुनाच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहिले. अर्जुनाला काहीसा आभास झाला म्हणून त्यानेही मागे वळून पाहिले.

त्या दोघांचीही दृष्टादृष्ट झाली, त्याचे नेत्र काहीसे भावुक झाले होते, निरोपाच्या या अवघड क्षणी! द्रौपदीचेही नेत्र सजल झाले होते. मात्र तिने स्वतःला सावरत आपल्या नेत्रांत तेज आणले.

द्रौपदीचे धैर्य पाहून अर्जुनानेही आपले मन घट्ट केले नि आपल्या प्रवासास आरंभ केला.

अर्जुनाच्या प्रयाणानंतर द्रौपदी काही क्षण आश्रमाच्या द्वारातच थिजल्यागत तिष्ठत होती. , ती अर्जुनाच्या पाऊलखुणा ज्या दिशेने उमटल्या होत्या, त्या दिशेकडे म्हणजेच उत्तरेकडे पाहत होती.

“कल्याणी! तू किती वेळ अशी उभी राहणार आहेस? तुझ्या तिष्ठत राहण्याने अर्जुन याक्षणीच परतणार आहे का? चल, त्याला यश प्राप्त व्हावे यासाठी ‘विजयकाम्य' यज्ञ करूया.” युधिष्ठिराने द्रौपदीचा हात धरला अन् ते उभयंता आश्रमात परतले.

किंतु द्रौपदीच्या मनातून अर्जुनाचा विचार जाईनाच. तिला त्याच्या चिंतनातच रस वाटू लागला. ती त्याच्यावर कविता रचू लागली, आपली गृहकार्ये करतां- करतां. तिच्या मनातले विचार भराभर कवितेच्या रुपात भूर्जपत्रावर उतरू लागले होते,

*“प्रियतरा, तव विरहें मम दिन*
*वाटें मना एक वर्षाहूनी दीर्घतर!*
*तू परतशील कधी- किती वर्षांनी!*
*तू येतां गृही, आनंद पसरेल या आसंमती,*
*चराचरांत, विश्वात, तसेच त्रिलोकींही!*
*तपस्या तव व्हावी पूर्ण |*
*याकरिता मी प्रार्थना करेन क्षणोक्षण,*
*किंतु तव स्मरणावरी- विरहावरी आहे का*
*औषधी?*
*मात्र मला आहे ज्ञात, मम विरहाचे औषधी*
*आहेसि तूचि!”*

द्रौपदीने आपली कविता उराशी लावली, त्याक्षणीच सहदेवाचा स्वर तिच्या कानी पडला, “ अर्जुनावर कविता लिहिते आहेस?”

ते ऐकून द्रौपदी स्तिमित झाली, “तुम्हाला माझं मन व कविता वाचणं कसं शक्य होतं, आर्य?”

“ऋतानृते! ते महत्त्वाचे नाही. महत्त्वाचा प्रश्न आहे तो, अर्जुनावर तू कविता लिहिते आहेस?”

“ अर्थातच , आर्य!”

“अर्जुनावर कविता लिही, यावर माझा आक्षेप नाही. याशिवाय तू अन्य पतींकडेही लक्ष दे, विशेषतः भीमसेनाकडे. तो तुझ्याबाबत अत्यंत कोमल आणि हळुवार आहे.” सहदेवाच्या शब्दांनी द्रौपदी काहीशी पश्चातापदग्ध झाली.

“आर्य, मला उत्तमप्रकारे ज्ञात आहे, भीमसेन, आपण, धर्मराज तसेच नकुल माझ्याकरिता कोमल- हळुवार आहात. परंतु अर्जुनांच्या स्मृती, त्यांचा विरह मला प्रारंभीस पीडादायक ठरत आहे. आर्यपुत्र, मात्र या सगळ्यांतून मी सावरेन व आपणां सर्वांकडे लक्ष देईन.” द्रौपदीने सहदेवाला आश्वस्त केले.

“मला खात्री आहे, ऋतानृते! तू आपल्या दुःख, पीडा सौख्य, इच्छा-आकांक्षा सारून पांडव परिवाराच्या कल्याणाला- हिताला प्राधान्य देशील.”सहदेवाने तिच्या स्कंधावर हात ठेवला.

“मला पूर्ण जाणीव आहे की, माझे भावबंध पाचही पांडवांच्या हृदयांशी जुळलेले आहेत.” द्रौपदीने त्याला उचित असा प्रतिसाद दिला.

**भी**म अत्यंत चिंतेत होता. अर्जुन इंद्रनील- हिमालयावर आपल्या योगशक्तीने पोहोचला असेल का, त्याची तपश्चर्या निर्विघ्नपणे पूर्ण होते की नाही याचाच विचार करत होता, तो.

नकुलाला अर्जुनाची विशेष चिंता वाटत नसली, तरी त्याला अर्जुनाच्या बालपणीच्या घटनांचे प्रकर्षाने स्मरण घडायचे. अर्जुनाला प्रथमतः धनुष्य धरता आले नव्हते, त्यावेळी चारही पांडव त्याच्यावर हसले होते! याशिवाय द्रौपदी – सुभद्रेच्या कलहाची गोष्ट रचून अर्जुनाला चिंतातुर करण्याचा प्रसंगही त्याला आठवला होता.

सहदेव ध्यानावस्थेत कुशासनावर बसला होता. मात्र त्याचे ध्यान मध्ये- मध्ये खंडित होत होतं.

युधिष्ठिर अस्वस्थपणे पाठीशी हात बांधून येरझाऱ्या घालीत होता. अखेर त्याने सहदेवाचा ध्यानभंग करत विचारलेच,

“सहदेवा! कधी होईल तुझं ध्यान पूर्ण? काय झालंय ते मला तरी कळेल का?”

“अर्जुनाच्या विचित्र रोषाशिवाय माझा दिवस जातच नाही.” नकुलाने म्हटले.

“हो ना! त्याचे तेजस्वी तसेच हताश शब्द मला आताही आठवताहेत.” भीमाने म्हटले.

“अर्जुनांशिवाय हे काम्यकवन रमणीय वाटत नाही, हे वन कितीही सुंदर, दिव्य नि रम्य असले तरी, महाबाहू असलेले अर्जुन सहस्त्र भुजा असणाऱ्या कार्तवीर्य अर्जुनाप्रमाणे पराक्रमी व महाप्रतापी आहेत. त्यांच्याशिवाय- त्यांच्या दृष्टीशिवाय मी जेव्हा ही भूमी, हे आकाश, हे जगत् जिथे- जिथे पाहते आहे, तिथे- तिथे मला शून्यवत दिसते आहे. या वनात अनेक प्रकारची पुष्पे आहेत, तरीही मला …….” आश्रमाच्या द्वारात आलेली द्रौपदी नकळतपणे काव्यात्मक भाषेत बोलून गेली आणि तिने अन्य पांडवाकडे पाहिले. सहदेव वगळता अन्य पांडव स्तंभित झाले होते.

“नीलांगिनी! हे अनुचित आहे. तू या वनाला ‘अरमणीय’ म्हणू शकत नाहीस. कारण कोणाचे असणे, कोणाचे नसणे वनाच्या सौंदर्यावर, दिव्यतेवर प्रभाव पाडत नाही अथवा परिणाम करत नाही. निसर्ग, भूमी, जगत् तसेच आकाशाच्या रमणीयतेचा काहीच अभाव नाहीये. उलट शून्यवतपणाही त्याचे सौंदर्य वाढवितो.” नकुलाने तिच्या शब्दांना विरोध केला, कारण त्याला हे आवडले नाही, की द्रौपदीने तो तिच्यासोबत असतानाही ‘अर्जुनाशिवाय मला हे विश्व शून्यवत् वाटत आहे’ असं म्हणावं. ?

भीमालाही द्रौपदीचे शब्द खटकले. युधिष्ठिराने द्रौपदीच्या शब्दांवर उघड उघड क्रोध व्यक्त केला, “आम्ही चारही तुझे पती तुझ्या सुखाची

चिंता करत असतां, तुला अर्जुनाची पर्वा आहे? मलाही अर्जुनाला भेटण्याकरिता उत्सुकता लागली आहे, म्हणून आपण जीवनाला 'शून्यवत्' म्हणू शकत नाही."

"भ्रात्या! ऋतानृतेचे म्हणणं उचित आहे. यदाकदाचित आपण या वनाचा त्याग केला पाहिजे. आपण तीर्थयात्रा केली पाहिजे, जेणेकरून द्रौपदीला विभिन्न अद्भुत स्थळांचं पर्यटन करता येईल, तिचं मनही रमेल, आपण विविध राज्यांशी संधीही करू शकू." सहदेवाने उचित असा पर्याय सांगितला.

"आर्य! आपण सांगितलेला पर्याय अतिशय योग्य आहे, शुभंकरही आहे." द्रौपदीने सहदेवाची प्रशंसा केली.

"अरे, तर शुभकार्याला विलंब कसला?" तिथे आलेल्या महर्षी धौम्य, शौनक, नि लोमशांनी सहदेवाच्या उपायाचे समर्थन केले.

"जर आपणा सर्वांची हीच इच्छा असेल, तर...." युधिष्ठिराने द्रौपदीला आज्ञा दिली, "तू आम्हा सर्वांच्या आवश्यकतेच्या वस्तू, भोजन सामग्री, वस्त्र-पात्रे, अक्षयपात्र एका वस्त्रात बांधून घे."

"मी ऋतानृतेला साहाय्य करेन. कारण मला आवश्यक असणाऱ्या वस्तू मी विशिष्ट वस्त्रांत बांधून घेईन." सहदेवही द्रौपदीसह वस्तूंची बांधाबांध करू लागला.

तेव्हा द्रौपदी त्याच्या कानांत पुटपुटली, "आर्य! आपण तीर्थयात्रेचा उपाय का सुचविलात? माझं मन या वनातच रमत नाही, तर अन्य तीर्थक्षेत्री कसं रमेल?"

"जर तुझं मन तीर्थक्षेत्री रमले नाही तर, ....... नाही...अं.... नाही. मी तुला माझी सेवा करू देणार नाही, मी स्वतः तुझी सेवा करीन." सहदेवाने खात्रीने म्हटले.

"खरोखरच? तुम्ही माझी सेवा कराल?" द्रौपदी लाजत सहदेवाला छेडीत म्हणाली.

"माझा उपाय श्रेयस्कर ठरेलच, माझा पूर्णत: विश्वास आहे." सहदेवाने म्हटले.

हे शब्द ऐकून द्रौपदी अनिमिषपणे सहदेवाच्या नेत्रांत पाहिले. त्याच्या काहीशा पिंगट नेत्रांत एक विलक्षण अद्भुत छटा होती....

**पां**डव- द्रौपदीच्या तीर्थयात्रेचं प्रथम स्थान होतं नैमिषारण्य. अत्यंत निबिड निर्जन घनदाट अरण्य होते ते! एकदा या अरण्यात प्रवेश केला तर, बाहेर पडण्याचा मार्ग शोधणे दुष्कर होऊ शकतं. याशिवाय या अरण्यात मार्ग न प्राप्त झाल्यास तिथेच संपूर्ण जीवन व्यतीत करावे लागते अशी किंवदन्ति पांडवांना श्रुत होती, बालपणीपासून.

“ यदाकदाचित आपल्याला या अरण्यातून बाहेर पडण्याचा मार्ग प्राप्त झालाच नाही, तर आपण द्रौपदीच्या अपमानाचा अन् आपल्यावर झालेल्या अन्यायाचा प्रतिशोध कसा घेणार?” भीम विचारांत पडला.

“अरे भ्रात्या! या अरण्यात प्रवेशणे किती कठीण आहे, ते पाहा! या अरण्यात वादळाप्रमाणे पवन घोंघावत असतो. त्या पवनाकारणे महाकाय वृक्षही उन्मळून कोसळतात. ते वृक्ष आपल्या अंगावर कोसळणार नाहीत याची क्षणोक्षणी काळजी घ्यावी लागते.” सहदेवाला नैमिषारण्याची भौगोलिक परिस्थिती जाणवली.

“सहदेवा, चिंता करू नकोस. मी स्वयं पवनाशी, वृक्षांशी संवाद साधेन, जेणेकरून वादळ येणार नाही वा वृक्ष कोसळणार नाही.” नकुलाने हसत म्हटले.

नकुलाचा उपाय ऐकून द्रौपदी साशंक झाली. नैसर्गिक आपत्ती कोसळतातच. त्यांना सदैव टाळणे उचित वा हितकरही नव्हे. त्याकारणे प्रकृतीचा नैसर्गिक समतोल ढासळेल, अन् आपण प्रत्येक घटित टाळू शकत नाही, अन्यथा ऋत अर्थात् सृष्टीचे संचालन व्यवस्थाच बिघडून जाईल.

“नकुला, तू हे वादळ टाळू शकतोस, मात्र आयुष्यातील वादळ टाळू शकतोस का तू? जर ते शक्य असतं, तर आज आपण वनात नसतो, नि द्रौपदीचा अपमान – द्यूत आपण घडूच दिलं नसतं.”

सहदेव हळवा झाला. त्याच्या स्कंधावर हात ठेवत द्रौपदीने सांत्वनार्थ म्हटले, "आर्य! वादळामुळेच आयुष्याला नवीन दिशा तसेच कलाटणी मिळते. आयुष्यात विपदा नसत्या, तर विजिगीषेला स्थानच नसते."

सहदेवाने द्रौपदीकडे पाहिले. द्रौपदीनेही त्याच्याकडे पाहिले. एकमेकांशी नेत्रसंकेत होताच त्या उभयंतांनी सूचक स्मित केले.

" भीमा! तू वनातील मार्ग शोधत आमच्यापुढे असशील. नकुल-सहदेवहो! तुम्ही द्रौपदीच्या मागोमाग वनाच्या मार्गाचे स्मरण ठेवत चालत असाल." युधिष्ठिराने त्या तिघांना सूचना दिल्या.

युधिष्ठिराच्या सूचनांनुसार ते चौघे चालू लागले. युधिष्ठिर त्या सर्वांच्या मागे लोमश, धौम्य व शौनक ऋषींसमवेत चर्चा करत चालू लागला.

त्याचे ते निर्धास्तपण पाहून अन्य पांडवांना क्रोध आला, तरीही ते मूकपणे चालत राहिले.

भीम वृक्षाच्या फांद्या, लता-पल्लवी दूर करीत अरुंद मार्गातून वाट काढीत होता. त्याच्यामागोमाग पांडवांच्या वस्त्रपात्रांचा भार स्कंधावर घेऊन पांचाली चालत होती. तिच्या मागे चालणाऱ्या नकुल-सहदेवांनी स्कंधाला भोजनसामग्री, आवश्यकतेच्या वस्तू, अक्षयपात्र असलेल्या

झोळ्या अडकवलेल्या होत्या. त्यांच्यामागे चालणारा युधिष्ठिर मात्र भारहीन होता. त्याच्या स्कंधावर कुठलाच भार नव्हता.

असेच सर्वजण मंदगतीने चालत होते. अकस्मात् वादळ घोंघावू लागले. पालापाचोळा, धूळ सर्वत्र उडू लागली. भीमाने पांचालीचे हात धरण्याचा प्रयत्न केला, तिला सावरण्याकरिता. मात्र त्याच्या हातांत तिच्या स्कंधावरील वस्त्र- पात्रे आली.

वादळवारे प्रचंड- तीव्र वेगाने वाहू लागले होते. त्यामुळे सर्वांना वादळवाऱ्यांत काहीच दिसेनासे झाले. स्वतःच्या मुखावर उत्तरीय ठेवत प्रत्येकजण आधाराकरिता काही ना काही हाती धरू लागला. भीमाने एका महाकाय वृक्षास धरले. नकुलाने द्रौपदीचा हात धरला होता, तर सहदेव- युधिष्ठीर एकमेकांना घट्ट आलिंगन देऊन उभे होते.

पांचालीने एका वृक्षाची मोठी फांदी घट्टपणे धरली होती.

काही क्षणांत वादळ ओसरू लागले. पांडवांनी पांचालीकडे पाहिले. पांचालीने आश्रयार्थ एका वृक्षाची मोठी फांदी धरून ठेवली होती. अचानक पुनः वादळवारा त्याच वृक्षाच्या दिशेने आला अन् तीच फांदी पांचालीच्या अंगावर मोडून पडली. पांचालीही खाली पडली- क्षणांतच मूर्च्छित झाली. त्यावेळी भयावहपणे घोंघावणारा वादळवारा शांत झाला. जणू तो तिला मूर्च्छित करण्याकरिताच आला होता!

परंतु या प्रसंगातून एकच सत्य प्रतीत होते, आपण ज्याचा संकटसमयी आधार घेतो, त्याच्याचकारणे आपण नव्या विपदेत सापडू शकतो.

"नीलांगिनी...." नकुलाने उच्चरवात म्हटले.

"पांचाली...." भीमही तिच्यापाशी आला व त्याने तिच्यावरील ती वृक्षाची फांदी उचलली.

"ऋतानृते! तू चिंता करू नकोस. मी तुझ्यावर उपचार करेन. तू स्वस्थ होशील." सहदेवाने वस्त्रांतून विशिष्ट जडीबुटी काढली.

"कल्याणी घायाळ तर झाली नाही ना?"युधिष्ठिराचे मन कधी नव्हे तर, या क्षणी द्रवीभूत झाले. त्याच्या मनात विचार आला, द्रौपदीला काही झालं तर? तिचा प्राण.... नाही.

"कल्याणीची हस्तनाडीची स्पंदने चालू आहेत ना?" त्याने विचारले.

"मंदगतीने चालू आहेत स्पंदने." सहदेवाने द्रौपदीच्या आघातांवर उपचार केले. नकुलाने तिच्या मुखावर पाणी शिंपडले. त्या

शिडकाव्याकारणे द्रौपदीने आपले नेत्र उघडले, तसा प्रत्येक पांडवाच्या जीवात जीव आला.

तिने नकुलाचा हात धरत उठण्याचा प्रयास केला, किंतु मस्तकावर तीव्र आघात झाल्याकारणे तिच्या मस्तकात एक सणक उठली नि ती पुनः भूमीवर कोसळली.

"सहदेवा! तू हे काय केलंस?" भीम- नकुलाचा एकत्रित प्रश्न.

"मी काय केलंय?" सहदेव विस्मित झाला.

"तुला ज्ञात होते का, तीर्थयात्रेमुळे द्रौपदीला अधिक कष्ट होतील, असे आघात झेलावे लागतील."भीमाने सहदेवाला दोष दिला.

" शांत व्हा." असे त्या तिघांना सूचित करत युधिष्ठिराने महर्षी लोमशांस विचारले, "आता काय करावे?"

" जवळच बद्रिकाश्रम आहे. तेथे पांडवपत्नी द्रुपदनंदिनी विश्रांती घेऊ शकते. तिचे स्वास्थ्य सुधारेपर्यंत आपण सर्व तिथेच निवास करू."महर्षी लोमशांनी म्हटले.

मात्र ऋषींदेखत पांडवांना द्रौपदीला उचलणे उचित वाटत नव्हते, त्यांना संकोच वाटत होता.

अखेरीस नकुलाने कमलपुष्प द्रौपदीच्या नाकासमोर धरून तिला शुद्धीवर आणायचं ठरवलं. त्याने द्रौपदीच्या नाकासमोर कमळ धरलं.

त्याच्या सुगंधाकारणे द्रौपदी हळूहळू शुद्धीवर आली व ती उठली, त्याचा हात धरून.

“तू चालू शकशील का?” नकुलाने चाचरत विचारले.

“म्हणजे आम्ही तुला धरून चालवू शकतो?” सहदेवाने नकुलाच्या वाक्याचे स्पष्टीकरण केले.

“का? मी तिला उचलून का घेऊ शकत नाही?” भीमाने विचारले.

“भ्राताश्री!आम्हालाही पांचालीच्या सेवेचा अवसर प्राप्त होऊ द्या.”नकुल-सहदेवांनी तिला आधार देत म्हटले.

द्रौपदीने त्यांचे हे शब्द ऐकले खरे, किंतु तिने त्यावर काहीच प्रतिक्रिया दिली नाही. कारण ती त्या अवस्थेत नव्हतीच. तिला यावेळी विश्रांती हवी होती.

तिच्या मौनाचे नकुल- सहदेवांना अर्थातच काहीच वाटले नाही. नकुलाने तिच्या स्कंधांना धरुन, तर सहदेवाने तिच्या कटीला धरून तिला चालविण्यास आरंभ केला.

“चिंता करु नकोस, देवी द्रौपदी! काही पावलांवर बद्रिकाश्रम आहे.” धौम्य ऋषींनी म्हटले.

यावर द्रौपदीने फक्त मान डोलावली.

**ब**द्रिकाश्रमाच्या मंडलात ती वस्त्रांच्या गाठोड्याला टेकून बसली होती. सहदेव तिच्या मस्तकाच्या आघातांवर उपचार करत होता. नकुल तिच्यासाठी औषधी निर्माण करत होता, तर भीम तिला झावळ्यांनी वारा घालत होता. द्रौपदीने त्याचा हात धरून तिला वारा न घालण्याचा संकेत केला.

“मी जाणत आहे, तू निश्चितच सहदेवावर रुष्ट असशील. मात्र तुला कष्ट, पीडा, आघात देण्याचा सहदेवाचा हेतू नव्हता. तो फक्त तुझे मन या निसर्ग सौंदर्यात रमावे, अशीच इच्छा करतो आहे. म्हणून तू सहदेवासारख्या निर्मळ हृदयाच्या मनुष्यावर क्रोध करु नकोस. खरंच! नीलांगीनी, तुझे आघात पाहून सहदेवाच्या मनाला किती यातना होतात, ते पाहा!” नकुलाने द्रौपदीला औषधी दिली.

“आर्य, आपणांस कशावरून वाटले की मी सहदेवांवर रूष्ट असेन?” द्रौपदीने औषधी ग्रहण करत विचारले.

“तू आताही मूक आहेस, म्हणून मी म्हटले.”नकुलाने उत्तर दिले.

“नाही, मी नैसर्गिक आपत्तींकारणे सहदेवांना दोष देऊ शकत नाही अथवा सहदेवांच्या या उपायास ‘अयोग्य’ ठरवू शकत नाही आणि आता माझी पीडाही बव्हंशी कमीही झालेली आहे.” पांचालीने म्हटले.

“तुला स्वस्थ वाटते आहे का, कल्याणी?” युधिष्ठिराने विचारले.

“आर्य, मला अत्यंत स्वस्थ वाटत आहे.” द्रौपदीने उत्तर दिले.

“तर आमच्यासाठी भोजन बनवतील का?'' इति युधिष्ठिर.

“मला भोजन करण्याची आवश्यकता नाही, कारण अक्षयपात्रातून माझे इच्छित असलेले पदार्थ प्रगट होतील.” असं म्हणून द्रौपदीने अक्षयपात्र धरुन मंत्राचे उच्चारण करण्यास आरंभ केला नि भोजनाचे विविध पदार्थ उत्पन्न झाले.

पांचालीने पत्रावळयांमध्ये पांडवांना त्यांना प्रिय असणारे पदार्थ दिले.

पदार्थ ग्रहण करून संतुष्ट झालेल्या पांडुपुत्रांनी म्हटले, ” आम्ही सर्व मृगया, तसेच समिधाकाष्ठाच्या शोधार्थ वनात जात आहोत. याशिवाय ऋषीवर व त्यांचे शिष्यही उचित तपस्थळी जाऊन तपश्चर्या करणार आहेत. त्यांच्या आणि आमच्या अनुपस्थितीत ह्या वस्त्र-पात्रे तथा शस्त्रांचे रक्षण कर.” तिघा पांडवांचे हे शब्द ऐकून भीमाने म्हटले, ”ती शस्त्रे, वस्त्रे, पात्रांचे संरक्षण करेल अन् मी तिचं रक्षण करेन.”

“मात्र तू माझी सहायता करणार नाहीस, मला समिधा काष्ठे एकत्रित करण्यात?” युधिष्ठिराने विचारले.

“नाही, भ्रात्या! मी पांचालीचे रक्षण करेन. कारण ती अस्वस्थ आहे. तिला या अवस्थेत सोडून येणे मला उचित वाटत नाही. मी तिच्याजवळच राहतो.” भीमाने म्हटले.

“मला कळतंय, तू नीलांगनीजवळ राहत का आहेस ते! या महाकाय भीमाला कोमलांगी नीलांगनीला बाहुपाशात घेण्याची ओढ लागलेली आहे!” नकुल पुटपुटला.

“मी त्या भावस्थितीत नाही, नकुला!”

“भीमसेना! मला ज्ञात आहे, तूच फक्त द्रौपदीच्या प्रशंसेचा पात्र होऊ पाहतोस. तुला द्रौपदीने केलेली प्रशंसा अत्यंत प्रिय वाटते.” नकुलाने त्याच्या मनाची तार छेडली.

भीम लज्जित झाला, ” कुणाला प्रेमाचे, प्रशंसेचे दोन शब्द आवडत नाही?”

“जशी तुझी इच्छा.” असे म्हणून युधिष्ठिर आवश्यक असणारी साधने घेऊ लागला.

“ऋतानृते, स्वतःची काळजी घे.” सहदेवाने द्रौपदीच्या गालांवर हात फिरवत म्हटले, ” विश्रांती घे.”

नकुल-सहदेवांनी आपल्या तलवारी द्रौपदीकडे सोपवल्या अन् आपापली धनुष्य घेऊन वनाच्या दिशेने त्यांनी प्रस्थान केले.

ऋषींनीही आपल्या तपस्येकरिता तपस्थळीं प्रयाण केले.

आता बद्रीकाश्रमात केवळ ती व तो. उभयंताही एकटेच. अन्यत्र कुणीच नव्हतं. जणू परिस्थितीने त्यांना एकांत दिला होता.

“भीमसेन!” पांचालीने भीमाचा बलदंड बाहू धरत म्हटले, “मी तुमची प्रशंसा केलेली तुम्हांला खरंच आवडते का?”

“कुणा पुरुषाला त्याच्या पत्नीनं केलेली प्रशंसा सुखावत नाही? त्याकारणे त्याचा मान- सन्मान अभिमान दुणावतो, पांचाली.”

“मी आत्ता तुमची प्रशंसा करू का? जेणेकरून आपली चिंतातुर भावस्थिती प्रसन्नतेत बदलेल.”

“नाही, प्रशंसा करावी असं काही केलेलं नाही आम्ही. जिने सिंहासनावर विराजमान होऊन मान-सन्मान प्रतिष्ठेने चक्रवर्ती सम्राज्ञीचे पद भूषवावे, तिचा आम्ही भरसभेत अपमान सहन केला होता. फक्त साहचार्य प्राप्त व्हावे म्हणून तिला पांचालदेशाच्या राजमहालात न पाठवितां आम्ही तिला या वनात आणलंय. वनांतही तुलाच सर्व कार्ये करावी लागतात, तेही अविश्रांत. याशिवाय यात्रेत- अरण्यांत तुला विविध नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागत आहे, तुला कष्ट, पीडा, आघात, वेदना झेलाव्या लागतात. तू काहीच बोलत नाहीस, आपल्या कष्टांची आम्हांला जाणीव होऊ देत नाहीस, तू सदैव हसतमुख असतेस, याचा अर्थ तुला पीडा होत नाही, असे नाही.” भीम दुःखी व पश्चातापदग्धही झाला.

तो दुःखी झालेला पाहून द्रौपदीलाही खेद वाटला. आपल्या संरक्षण- अनुरंजनाकरिता थांबलेले भीमसेन केवळ आपल्या दुःख, पीडेमुळे विषण्ण झालेत. आपल्याला त्यांना प्रसन्न केलेच पाहिजे, म्हणजे त्यांचं दुःखही दूर होईल, व किर्मिर-जटासुरवधाच्या वेळी

ज्याप्रमाणे त्यांच्या पुरुषार्थाची प्रशंसा तिने केली होती, तशीच त्यांच्या कोमल हृदयाचीही प्रशंसा झालीच पाहिजे.

"आर्य......." द्रौपदीने म्हटले, " असं दुःखी होऊ नका. तुमच्यासारख्या सामर्थ्यशाली पुरुषाला असं शोक करणं मुळीच शोभत नाही." द्रौपदीने त्याला समजाविले.

" पांचाली, परंतु दुःख का होणार नाही? आमच्यासारखे सामर्थ्यवान पुरुष तुझे पती असूनही तुला या पीडा झेलाव्या लागताहेत......"

"आर्य, पुरे! या प्रसन्नतेच्या घडीला दुःखाचा विषय काढू नका." द्रौपदीने स्तंभाच्या नक्षीदार भागावर मस्तक टेकवले.

" प्रसन्नता?"

"आर्यपुत्र, आज मला झालेल्या पीडांपेक्षा माझी तुम्हांला चिंता वाटते. इतकंच नव्हे, तुम्ही माझी सेवा करण्यासाठी प्रवृत्त झालात, याचाच मला आनंद आहे, प्रसन्नता आहे. आर्य, आज मला खरोखरच ना भूतकाळातील वेदनांचे दुःख आहे, ना भवितव्याची चिंता." द्रौपदीने भीमाच्या भरदार स्कंधाचा आधार घेतला.

"मी जाणत आहे, तुझी प्रवृती. तू दुःखातही सुख शोधतेस." भीमाचा स्वर अजूनही हताश होता. द्रौपदीच्या प्रसंशेची मात्रा त्याच्यावर लागू पडली नव्हती.

कोणत्या युक्तीचा प्रयोग करून त्याच्या नेत्रांत आनंद पाहता येईल, त्याला प्रसन्न करता येईल याच विचारांत ती मग्न झाली.

तितक्यात स्वतःच्या कनिष्ठ पुत्राला आणि स्वतःच्या पुत्रवधूला जणू प्रसन्न करण्यासाठीच वायुदेवाने पांचालीला एक उपहारच दिला!

वायुवेगाने एक सहस्त्र दलांचे सुंदर, मायावी, दिव्य व तेजःपुंज कमळ पांचालीच्या चरणांशी येऊन पडले.

नेत्र मिटून बसलेल्या द्रौपदीला सर्वप्रथम सुगंध आला. तिला पुन्डीरिक, रक्तकमल, इन्दीवर अशा विभिन्न कमलांचे गंध परिचित होते. परंतु हा गंध तिच्याकरिता अपरिचित होता. असे असले, तरी तो गंध दिव्य होता, त्या गंधाने तिला मंत्रमुग्ध केले होते, तो गंध तिच्या गात्रगात्रांत, रोमारोमांत दिव्य आनंदानुभूती- अनुसंवेदना प्रवाहित करू लागला. त्याचा सुगंध तिला घेतच राहावासा वाटला. क्षणभर तिला वाटलं, या दिव्य मनोरम परिमलापुढे तिच्या शरीरावरील नीलकमळांचा सुगंध काय!

“आर्य, हा गंध किती दिव्य आहे, तो माझं चित्त आकर्षित करत आहे.”

“अगं, का आकर्षित करणार नाही, पद्मगंधे, उत्पलगंधे? तो तुझ्याच शरीराचा गंध आहे.”

“आर्यपुत्र! नाही, माझ्या कायेला येणारा सुगंध वेगळा आहे अन् हा दिव्य गंध वेगळा आहे.”

द्रौपदीने आपले नीरजनयन अलगद उघडले. त्याक्षणी तिच्या नेत्रांसमोर तिच्या चरणांशी पडलेले सहस्त्रदलांचे कमळ दिसले.

ते खरोखरच दिव्य, अपूर्व व अद्वितीय कमलपुष्प होते. त्याच्या कडा स्वर्णिम होत्या, क्षणार्धात त्याच्याही छटा बदलल्या, त्या पाकळ्यांवर द्रौपदीला प्रिय असणारा व नीलकमळाचा आभास करणारा नील रंग चढला, क्षणभरात श्वेत रंगाच्या पुन्डीरिकाच्या छटा त्यावर उमटल्या, काही क्षणात ते रंगहीन पारदर्शीही दिसू लागले.

आपल्या विभिन्न रंगाचे, छटांचे प्रदर्शन केल्यानंतर त्या कमळाने इंद्रधनुष्याच्या सप्तछटांचे मोहक रंग धारण केले आणि अखेरीस त्या कमळाने आपले मूळ रुप- रंग प्रकट केले. त्याची प्रत्येक पाकळी विभिन्न छटेची- रंगाची होती.

त्या मोहक, रमणीय कमळाला पांचालीने आपल्या ओंजळीत धरले, “हे कमळा! तुझे उचित स्थान माझ्या चरणांत नव्हे, तर माझ्या ओंजळीत आहे.”

“अतिसुंदर! तुझ्याचप्रमाणे अतीव व नितांत रूपवंत आहे हे कमळ, हे पद्मिनी!”

“नाथ, काहीतरीच आपलं?”

“अगं, खरंच!”

“भीमसेन! आपल्याकडे मी एक इच्छा व्यक्त केली, तर तुम्ही ती पूर्ण कराल ना?” द्रौपदीच्या मनात ती कमलपुष्पे प्राप्त करण्याची कामना निर्माण झाली होती.

“आजपर्यंत आम्ही तुझी इच्छा -अभिरुची विचारात घेतली का?आम्हाला जे प्रिय वाटले, बहुमोल वाटले, जे सुंदर वाटले, त्याच वस्तू आम्ही तुला उपहाररूपात दिल्या आहेत, तुझ्या अभिरुचीचा विचार न करता! आजपर्यंत तू आमच्याकडे काहीच मागितले नाहीस, आपल्या इच्छा- आकांक्षाचे दमन केले आहेस. किंतु आज तू निःसंकोचपणे आपली इच्छा व्यक्त कर, तुझी इच्छा पूर्ण करण्यासाठी हा भीम उपस्थित आहे. तू फक्त आज्ञा दे!”भीम प्रसन्नचित्त झाला. कारण त्याच्याकडे पांचाली तिच्या इच्छेनुरुप काहीतरी मागणार होती. अन् हे भाग्य भीमालाच लाभले होते.

“आर्य, मला हे कमलपुष्प अत्यंत आवडले आहे. मात्र मी हे कमलपुष्प स्वयं धारण करणार नाही. मी धर्मराजांस हे पुष्प अर्पण करेन. कारण हे पुष्प एकच आहे आणि आपणा पाचांनाही अशी पुष्पे अर्पित अर्पित करून त्या पुष्पांच्या माला निर्माण करून आपणा सर्वांच्या कंठात धारण करण्याची माझी निरातिशय इच्छा आहे. आपण ती इच्छा पूर्ण कराल?” द्रौपदीने अनिमिषपणे भीमाच्या नेत्रांत पाहत म्हटले. असं

म्हणताना तिच्या हृदयात तिच्या पतींचा विचार होता. या कमलपुष्पांकारणे फक्त भीमसेन प्रसन्न झाले, तर तो पक्षपात ठरेल. माझ्या प्रसन्नतेपेक्षा माझ्या पतींची प्रसन्नता महत्त्वाची आहे, या कमलपुष्पांनी आपल्या प्राणवल्लभांचे पूजनही होईल अन् ते प्रसन्नही होतील, अशा विचाराने तिने अशी इच्छा व्यक्त केली होती. त्यातून तिचे पातिव्रत्य व पतिप्रेम दोन्हीही प्रतीत होत होते.

पांचालीच्या शब्दांवर भीम सर्वप्रथम खळखळून हसला, "स्वतःसाठी कधीतरी निदान, एकदा काहीतरी माग ना."क्षणार्धात तो भावनाविवश झाला, "पांचाली, कमलपुष्पे तू मागितलीस खरी, परंतु स्वतःच्या शृंगाराकरिता नव्हे, तर आमच्या पूजनाकरिता. कृपया स्वतःसाठी इच्छा कर ना."

"ही इच्छा माझ्या स्वतःकरिता नसली, तरी ही इच्छा माझी स्वतःची आहे, नाथ."

" तुझी शब्दचतुरता अपूर्व असली, तरी यातून तुझी पतीनिष्ठा व पतिप्रेम व्यक्त होते. तुझ्या या इच्छेकारणे मी प्रसन्न झालो आहे. मात्र त्याहून अधिक, तुझ्या या इच्छेने मला अंतर्मुख व विचारप्रवृत्त केलेले आहे. परंतु तुझी इच्छा पूर्ण करणे हे तर माझं कर्तव्यच आहे. कारण देवी सीतेच्या इच्छेपायी अयोध्येचा राजपुत्र राम कांचनमृगापाठी गेला. मला

फक्त ही सहस्त्रदलांची कमलपुष्पे शोधण्याकरिता जायचे आहे.” भीम गर्वाने म्हणाला.

“आर्य, हे अत्यंत दुष्कर कार्य आहे.”द्रौपदीने म्हटले.

“पांचाली, हे कार्य दुष्कर असले, तरी अशक्य नाही.” भीमाच्या स्वरात आत्मविश्वास होता.

“हा आत्मविश्वास सदैव राहू द्या. परंतु गर्व नव्हे.”द्रौपदीचे शब्द पूर्ण होतात न् होतात, भीमसेन आपली दिव्य गदा घेऊन त्वरेने वनाच्या दिशेने निघून गेला.

द्रौपदी बद्रिकाश्रमाच्या एका मोठ्याशा सोपानाच्या मध्यभागी बसून त्याची प्रतीक्षा करू लागली.

**सू**र्य पश्चिमेच्या दिशेने कलू लागला होता. आकाशावरील पीतरंग कषाय रंगात परिवर्तित होऊ लागले होते. संध्यासमय निकट येत चालला होता.

ज्याप्रमाणे संध्येकारणे बद्रिकाश्रमाच्या परिसरात उगवलेल्या वृक्षवल्लींच्या पर्णावर दवबिंदू उमटले होते, त्याचप्रमाणे परिवेशातील

(पर्यावरणातील) उष्णतेकारणे तसेच चिंतेकारणे पांचालीच्या सुंदरशा श्यामल मुखावर स्वेदबिंदू उमटले होते.

तिच्याकरिता कमळे आणायला गेलेला भीम संध्याकाळपर्यंत परतला नव्हता. त्याच्या सामर्थ्यावर विश्वास असला, तरी पांचालीला त्याची चिंता वाटतच होती. याशिवाय मृगयेकरिता गेलेले नकुल-सहदेवही कधी परत येतील या विचाराने ती अस्वस्थ होत होती. युधिष्ठिर अद्यापही समिधा एकत्रित करून परतायला हवे होते, असा विचार मनी आल्यानंतर ती अजूनच चिंतित झाली.

तिला वाटलं, मी आपली इच्छा भीमापुढे व्यक्त करून व त्यांना अज्ञातस्थळी पाठवून चूक तर नाही केली ना? हा कौरवांचा डाव तर नव्हे, पांडवांच्या प्राणांस- माझ्या सन्मानास हानी पोचविण्याचा?

अन्य पांडव आल्यानंतर, त्यांनी प्रश्न विचारल्यानंतर आपण काय उत्तर द्यावं?

असे असंख्य विचार पांचालीच्या मस्तकात घोंघावत होते. ती अस्वस्थतेने पायऱ्यांवरुन उतरली अन् दूरवर दृष्टिक्षेप टाकू लागली.

तितक्यात तिच्या दृष्टीस युधिष्ठिर, नकुल-सहदेव आणि ऋषीगण पडले.

"आर्य……" तिने युधिष्ठिर, नकुल-सहदेवांना अभिवंदन करून त्यांच्या व ऋषीगणांच्या आसन-जलपानाची व्यवस्था केली.

“कल्याणी! भीमसेन कुठे आहे? कुठे दिसत नाही म्हणून विचारलं.” युधिष्ठिर सौजन्यपूर्वक स्वरात म्हटलं.

यावर द्रौपदी निरुत्तर राहिली.

”द्रौपदी, कुठे आहे तुझे लक्ष? युधिष्ठिर काहीतरी विचारतोय, त्याच्या प्रश्नाचं उत्तर दे.” तिच्याशी वार्तालाप करताना कधी नव्हे तो, आज सहदेवाचा स्वर अत्यंत कठोर झाला होता.

द्रौपदीला वाटले, सहदेव आपल्यावर रुष्ट आहेत. याचाच अर्थ, त्यांना सर्वकाही कळलेले दिसतंय. आता मूक राहण्यात अर्थ नाही.

“आर्यपुत्रहो! मला क्षमा करावी. मीच भीमसेनांस पाठविले आहे, मला प्रिय असलेली सहस्त्रदलांची कमलपुष्पे आणण्याकरिता!”

“कुठे पाठविले आहेस तू त्याला?” नकुलाच्या निळयाशार नेत्रांवर आठ्या उमटल्या होत्या.

“मला ज्ञात नाही, आर्यपुत्र!”

“तुला ज्ञात नाही? तूच त्याला पाठविलेस ना?” युधिष्टिर क्रुद्ध झाला.

“तू आमच्या भ्रात्याला कुठे पाठविलेस? सांग आम्हाला.” सहदेवाने द्रौपदीला स्कंध धरून हलविले, गदागदा.

“मला वाटतं, ते अज्ञात सरोवर असावं व ते एखाद्या पर्वतशिखरावर असावं. कारण कमलपुष्पे सरोवरातच उमललेली असतात अन् ते कमलपुष्प उंचावरून पवनाच्या झुळकीने आलं होतं आर्य!”

“तू भीमाला अज्ञात स्थळी पाठविलेस, तुला तुझ्या पतीपेक्षा कमलपुष्पे महत्त्वाची वाटली? ती कमळे तुझ्या तुला इतकी प्रिय व इच्छनीय वाटली की तू आमच्या भ्रात्याला विपदेत लोटून दिलंस?” युधिष्ठिराने द्रौपदीला घटिताचा दोष दिला, ”अन् व्रतस्थ असूनही तुला सहस्त्रदलांच्या कमळांचा मोह कसा झाला?”

“ही कौरवांची योजना अथवा कारस्थान असू शकते, याचा विचार तरी तुझ्या मनी आला का? इतकी सूज्ञ व विचारी आहेस ना तू, तर आज काय झालं?” नकुलाने तिला विचारले.

“अगं, स्वर्णमृगाचे प्रलोभन दाखवून सीतेपासून रामाला दूर करणे अशी रावणाची योजना होती, मात्र त्याची कल्पना सीतेला नसणे साहजिकच होते. कारण हे सर्व घडण्यापूर्वी राम-रावणाचे शत्रुत्व संभवलेच नव्हते. मात्र तुला याचा विचार करायला हवा होता. तू सीतेसारखी चूक पुन्हा केलीस. सीतेने ती चूक अजाणतेपोटी केली होती. मात्र तुला तर सर्व काही ज्ञात होते ना...... कौरव- पांडवांच्या शत्रुतेविषयी! त्यांनी रचलेला कट असला तर ....... अथवा भीमाच्या

प्राणांस धोका संभवला तर.... याचं उत्तरदायित्व कुणाचं?" सहदेवाचा मानसिक तोल ढळला होता.

"कल्याणी, सहदेवाच्या शब्दांत तथ्य आहे. तू कमळांच्या क्षणभंगुर मोहापायी आपल्या पतीला अज्ञात स्थळी पाठवून दिलेस? त्याचे प्राण, त्याच्या जीवनावर तुझ्यामुळेच संकटही कोसळू शकते!" युधिष्ठिर प्रक्षुब्ध झाला.

"नीलांगिनी, तू त्याचा स्वभाव, प्रवृत्ती जाणतेस ना! त्याला त्याच्या क्रोध संयत करणे शक्य नाही. त्याचा क्रोध एकच व्यक्ती शांत करू शकते, ती म्हणजे अर्जुन. मात्र तो तर तपश्चर्येत रत आहे. त्यामुळे भीमसेन संतापाच्या भरात आपल्यावर नव्या विपत्तीस आमंत्रित करू शकतो." नकुलाने म्हटले. ते तिघेही तिला अद्वातद्वा बोलू लागले .

"हे काय राजपुत्रहो! तुम्हाला सामाजिक शिष्टाचारांचे ज्ञान तसेच स्थळकाळाचे भान नाही का?" लोमश ऋषींनी विचारले.

"राजा युधिष्ठीरा! हे तुझे अंत:पुर नव्हे, जिथे तू व तुझे भ्राते तुझ्या पत्नीशी वाद- विवाद करू शकतात. हे पवित्र स्थळ आहे. येथे कुठलाही प्रकारचा संघर्ष शोभनीय नव्हे." शौनक ऋषींनी सूचित केले.

"उचित म्हणालात आपण, ऋषिवर! द्रौपदीशी वादावादी करण्यापेक्षा आपण सर्वांनी भीमसेनाला शोधले पाहिजे, भ्रातेहो!" नकुलाने म्हटले.

"आर्य......." आतापर्यंत पश्चातापाभावनेकारणे मूक असलेल्या पांचालीने म्हटले. ती आतापर्यंत मूक होती. कारण ती व्यथित, चिंतित व पश्चातापदग्धही होती. त्यातही त्या तिघांच्या क्रुद्ध शब्दांकरणे तिला वैषम्य, खेद व भीमाविषयी चिंता वाटू लागली होती. म्हणून तिने त्या तिघां पांडवांसह भीमाला शोधण्याचा निश्चय केला....

"आर्य! मी आर्यपुत्र भीमसेनांना असं अज्ञातस्थळी पाठवून चूक केली, आता त्याच चुकीचे परिमार्जन करण्यासाठी भीमसेनाच्या शोधार्थ मीही तुमच्यासह येते." पांचालीने म्हटले, मर्यादेने.

"इदमस्तु! तू दीपदंड निर्माण कर नि चल." युधिष्ठिराने आज्ञा दिली.

....संध्यासमयीच्या किरमिजी किरणांच्या प्रकाशात त्या चारही आकृत्या दीपदंड हाती धरून गंधमादन पर्वताच्या दिशेने चालू लागल्या.

"**स**हदेवा! तुझ्या खात्रीने, तो निश्चितच गंधमादन पर्वतावर गेला?" युधिष्ठिराने म्हटले.

“माझा वेध कधी चुकीचा ठरला आहे का?” बोलताना दीपदंडाच्या प्रकाशात सहदेवाचे अर्धे मुख उजळले होते.

“तेथे तर गंधर्व, असुर आणि यक्षगणांचं वास्तव्य आहे ना? नीलांगिनी, तू फक्त भीमसेनाचे प्राण संकटात टाकलेस नाही, तर त्या गंधर्व, असुर यक्षगणांचेही प्राण संकटात टाकलेस.”नकुलाने म्हटले.

“कदाचित भीमसेनाने त्यांचा संहार केला तर.....”युधिष्ठिर भयाक्रांत झाला.

“तर यक्षाधिपती कुबेराचा कोप आपल्यावर होईल.” सहदेवाने म्हटले.

“हे सर्व कल्याणीकारणे घडत आहे. तिने भीमसेनाला जर गंधमादन पर्वतावर पाठवले नसते तर, भीमासह आपण तिघेही संकटात सापडलो नसतो.” युधिष्ठिराच्या शब्दांनी पांचाली अजून चिंताग्रस्त झाली. कुबेर तसेच यक्षांसह भीमसेनांचे युद्ध झालं तर......?

जखमी शरीर, पर्वतावर आरोहण करत असल्याकारणे क्लांती, उच्च शिखरांवरील वायुच्या अभावाकारणे श्वसनात येणारा अडथळा, आणि कठीण वळणांचा- वळणांचा मार्ग---त्यावर कंटक, पाषाणखंड, ---वेळप्रसंगी पाकोळी व सर्पसुद्धा अशा कीटक, सरीसृप प्राण्यांपासून सावध राहत चालणे याकारणे पांचाली अत्यंत ग्लांत झाली होती. मात्र

आपल्या पतीची चिंता तिला दुष्कर पर्वतावर चढण्याकरिता प्रवृत्त करत होती.

आता ते सर्व मध्यशिखरावर येऊन पोहोचले होते. त्यांच्यासमोर सहस्त्रदलांची कमलपुष्पे व स्वर्ण कमलांनी सुशोभित असलेले सुंदर, दिव्य, चमकत्या जळाचे सरोवर होते.

परशुराम कुंडाप्रमाणे तेही काहीशा प्रमाणात रक्तरंजित झालेले होते. त्याच्या आजूबाजूला निळे शिलाखंड आणि मनोहर पुष्पांनी सजलेले वृक्षही होते.

त्याचक्षणी सुंदरता व बीभत्सता एकत्रितच सर्वांच्या दृष्टिक्षेपात पडली. त्या सुंदरशा सरोवराच्या तीरावर यक्षगण तसेच राक्षसांची रक्तलांछित प्रेते पडलेली होती. भीमसेनाचे बलदंड शरीरही रक्ताळलेले होते. तो जसा कमलपुष्पे घेण्यासाठी झुकला, तशी पांचाली आवेगाने त्याच्याकडे धावत गेली, अन् त्याचे हात हाती घेत तिने विचारले, "आपण कुशल आहात ना?"

"अगं, तुझ्यासारखी पतिनिष्ठ, पतिव्रता स्त्री असल्यावर मला काय होणार आहे?"भीमसेनाने म्हटले, " एक क्षण थांब!" असे म्हणून त्याने कमळे तोडली आणि पांचालीच्या हातात सोपवली.

"ही पुष्पे रक्तरंजित आहेत." युधिष्ठिराचे शब्द ऐकून भीमसेनाने ती कमळे सरोवराच्या निर्मळ जलाने धुतली.

“माझ्या म्हणण्याचा असा अर्थ आहे की, तू फक्त त्या पुष्पांकरिता असंख्य यक्षगणांचे प्राण घेतलेस. म्हणून ही पुष्पे संहाराच्या रंगाने भरलेली दिसताहेत भीमा!”

“माझ्या पांचालीने कधी नव्हे, तर आज एकदाच माझ्याकडे आपली इच्छा व्यक्त केली, ती पूर्ण करण्यासमयी परिस्थिती व नियतीने विरोध केला, या निर्बुद्ध राक्षसांनी माझा प्रतिकार केला, त्याचाच परिणाम आहे हा!” भीमसेनाचा श्वास फुलत होता, तो उत्तेजित झाला होता.

फक्त आपल्याच इच्छेकरिता भीमसेनाने इतक्या कुबेरसैनिकांचा संहार केला हे पाहून पांचाली स्तिमित झाली व तिला पश्चातापही वाटला.

“भीमसेना! द्रौपदीची इच्छा पूर्ण करण्यात काहीच आपत्ती नाही. मात्र कुबेराचा रोष ओढवून घेण्यात निश्चितच आपत्ती आहे.” सहदेवाने म्हटले.

“भ्रात्या, कमळे तोडण्यापूर्वी तू कुबेराची संमती घ्यायला हवी होतीस!” नकुलाने सहदेवाच्या शब्दांचे समर्थन केले.

“आता जर कुबेरदेव आपल्याला आपल्यावर क्रुद्ध झाले, तर हे कल्याणी! तूच त्यांची क्षमायाचना कर.” युधिष्ठिराने म्हटले.

“तिने का? तिचा काय अपराध आहे? तिने का क्षमायाचना करावी? मीच या यक्षांचा-राक्षसांचा संहार केला आहे. म्हणून मीच कुबेराची मनधरणी करेन.” भीमसेन दंड थोपटत म्हणाला.

“तू नकोसच करूस. तू केलेली मनधरणी म्हणजे आर्जव नव्हे, तर युद्धाचे बिगुल आहे. म्हणून मधुरभाषिणी शुभाच कुबेराची मनधरणी करेल.” नकुलाने म्हटले.

“नाही, मीच कुबेराची मनधरणी करतो. मात्र आजपर्यंत कुठल्याही वस्तूची अभिलाषा न धरणाऱ्या कल्याणीने आणि आतापर्यंत आपल्या विवेकयुक्त क्रोधाचा परिचय देणाऱ्या भीमसेनाने लोभवश होऊन युक्त-अयुक्त, उचित- अनुचिताचा विचार केला नाही, हेच मला रुचले नाही.” युधिष्ठिराच्या शब्दांनी पांचालीला लज्जा वाटू लागली, आपल्या चुकीची.

“हे काय चाललंय? हा कसला कोलाहल आहे? मला काही समयापूर्वी कोणाचे चित्कार ऐकू येत होते?” असा धीरगंभीर, काहीसा संतप्त स्वर सर्वांच्या कानी पडला.

अकस्मात स्वर्ण कांतीचा, हिऱ्यामोत्यांच्या अलंकारांनी मंडित आणि रत्नजडित , मृदू वस्त्रे परिधान केलेला, स्वर्णिम कमलदंडक हे शस्त्र धारण केलेला धनपती कुबेर प्रकटला होता.

तत्क्षणी पांडुपुत्र तसेच त्यांची प्रिया पांचाली त्याच्या दृष्टिक्षेपात पडली.

तो चकित झाला. मित्र धनंजयाचे अन्य भ्राते आणि देवी द्रौपदी? स्वयं आपल्या सुप्रिय सरोवराच्या तीरी?

आश्चर्य आहे! या सर्वांच्या अकस्मात् आगमनाचे कारण?

"अरे धर्मराज, भीमसेन व नकुल-सहदेव! देवी पांचाली, आपण सर्व माझ्या सरोवराच्या तीरावर कसे उपस्थित झालात? मित्र धनंजय कुठे आहे? तो अन्यत्र कुठे गेला आहे का?" कुबेराने प्रश्नांवर प्रश्न विचारले. त्यावर पांडव निःशब्द राहिले.

"कुबेरराज......" त्याक्षणीच त्याला आपल्या यक्षगणांचे, राक्षसगणांचे विव्हळते स्वर ऐकू आले.

आपल्या यक्षगणांची, राक्षसांची रक्तलांछित प्रेते कुबेराने पाहिली. त्याचा क्रोध अनावर झाला. तो आपल्या कमलदंडाचा भूमीवर प्रहार करत कडाडला, "कुणाचे इतके धारिष्ट्य की माझ्या सरोवराच्या सीमारेखेत येवून माझ्याच सैनिकांचा वध करावा? यक्षगणांचा संहार करावा? कुणी केलं हे? कुणी केलं असं दुस्साहस? कुणी माझा प्रकोप जागृत केला?"

"मीच केला या सर्वांचा संहार." भीम उत्तेजित झाला, " माझ्या प्राणप्रियतमेने- द्रुपदराजनंदिनी पांचालीने माझ्याकडे आज एकच कामना

व्यक्त केली, तेही पतिसेवेकरिताच. तर मला विरोध करणाऱ्या या यक्ष-राक्षसांचा वध करावा लागला व ही कमलपुष्पे घ्यावी लागली.''

''भीमसेना!जर देवी द्रौपदींना कमळे हवी होती, तर तू माझे आवाहन करायला हवे होते. मी माझ्या स्वामित्त्वाखाली असलेली सर्व बहुमोल कमळे देवी द्रौपदींकरिता तुला देऊ केली असती. इतका रक्तपात घडलाच नसता.'' असे भीमास सूचित करणारा कुबेर मनोमन भयभीत झाला होता. कारण त्याला ज्ञात झाले होते, भीमाला सहस्त्रगजांची शक्ती प्राप्त झाली असून त्याला आता हनुमंताने-त्याच्या ज्येष्ठ भ्रात्याने आपलीही दिव्य शक्ती प्रदान केली आहे.

''क्षमा करावी भीमसेनाच्या या अविवेकाला, यक्षाधिपती कुबेरा! आम्ही तिघे पांडव या घटितापासून अनभिज्ञ आहोत. यदाकदाचित मी येथे आलोच नसतो तर, फारच मोठा अनर्थ घडला असता. भीमसेनावर क्रोध केल्याकारणे तुझाही धर्म नष्ट झाला असता व त्याकारणे तुझ्या मित्राच्या- अर्जुनाच्या तपश्चर्येत विघ्न आले असते. मात्र या प्रमादाची क्षमायाचना कल्याणीच करेल. कारण स्वतः ज्ञानी, विदुषी व सूज्ञ, विचारी असूनही प्रमद्वरा पांचाली त्या सहस्त्रदलांच्या कमळांच्या मोहात बद्ध झाली. अन् त्यातच हित-अहित, उचित-अनुचित, लाभ-हानी तसेच धर्म, ज्ञान व विवेक विचारांचे तिला विस्मरण घडले. तिच्या या उत्तम, सुगंधित व दिव्य वस्तूप्रति स्त्रीसुलभ आकर्षणामुळे आमच्यावर आपत्ती

कोसळली असती, अनर्थ घडला असता. मी श्रुत आहे, याज्ञसेनी अन्य स्त्रियांपेक्षा श्रेष्ठ असून ती कामनेपासून पराङमुख आहे. मात्र आज……” यापुढे युधिष्ठिराचे शब्द अडले. ते शब्द पूर्ण झाले नसले, तरी……त्याचा मतितार्थ तिच्या लक्षात आला. युधिष्ठिर तिच्या महत्तेवर प्रश्न करीत होता. त्याकारणे ती अधिकच लज्जित झाली. कारण इतक्या वर्षांनी युधिष्ठिराला पुनः तिच्या आचरणात दोष सापडला होता.

तिचे नेत्र सजल झाले. मात्र ती स्वतःला सावरत कुबेराला प्रणाम करत म्हणाली, ” मला क्षमा करावी, यक्षाधिपती लोकपाला! माझ्या मनात कमलांची कामना होती, मात्र स्वतःकरिता नव्हे. माझ्या पतींच्या सेवेकरिता ती इच्छा व्यक्त केली अन् भीमसेनांनी उत्तेजित व उन्मेषित होऊन यक्षगणांचा संहार केला. यदाकदाचित मी…… कमलपुष्पाची इच्छा धरली नसती……”

“ देवी द्रौपदी, आपण निष्कारण पश्चाताप व खेद करता आहात, जर आपणांस सहस्त्रदलांची मायावी, दिव्य, सुगंधित पद्मे हवी होती तर, आपण स्वतः नकुल अथवा सहदेवाकरवे निरोप/ संदेश पाठवायला हवा होता. मी सर्वच कमळे दिली असती. एवमस्तु! आताही आपणास सन्मानित करण्याचा अवसर नष्ट झालेला नाही. कारण आपण साक्षात देवी ‘श्री’ आहात, इंद्राणी (शची) आहात. मुख्य म्हणजे महान पतिव्रता आहात. आपल्या आगमनाने माझे सरोवर आणि सरोवरविश्रामस्थली

अधिक सुंदर, तेजांकित नि पवित्र झाली आहे. त्याकारणे आपण क्षमायाचना करू नका. देवी पांचाली! आपल्या मनास भावलेली ही सर्वच सुंदर सहस्त्रदल पद्मे- जी भीमसेनाने स्वपराक्रमाने, बळाने प्राप्त केलेली आहेत- त्या कमळांवर आपलाच अधिकार आहे. याशिवाय आपल्या सन्मानाप्रीत्यर्थ अमरावतीतील माझ्या प्रासादात उमलणारी तसेच सदोदित टवटवीत असणारी बहुमोल, शतदल दशलक्ष स्वर्णकमले मी आपणांस प्रदान करत आहे.'' कुबेराच्या शब्दांत आदर होता.

''इतकी सर्व अमूल्य कमळे देऊन आपण मला आणखी पश्चातापदग्ध करू पाहताहेत, कुबेरदेव! मी या कमळांचा स्वीकार करू शकत नाही.''

''देवी, आपण ही कमळं न स्वीकारून अनातिथ्याचे पाप माझ्या मस्तकावर अंकित करताहात.'' कुबेरही आपल्या शब्दांवर ठाम राहिला.

अशी ही संभ्रम, द्विधांची परिस्थिती निर्माण झालेली पाहून भीम पुढे झाला, ''मी काही बोलू शकतो, लोकपाला वैश्रवणा?''

''बोल, भीमसेना!'' कुबेराने म्हटले.

''धनपती कुबेरदेवा! तू पांचालीला दशलक्ष स्वर्णकमळे देत आहेस. मात्र ती इतक्या स्वर्णकमळांचं काय करणार आहे? कारण ती व्रतस्थ व वनवासिनी असल्याकारणे तिने धन, रत्ने, सुवर्णमयी वस्तूंपासून अलिप्त राहण्याचा निश्चय केला आहे. याशिवाय आम्ही त्या कमळांच्या

विनिमयमूल्याने जरी दान करण्याचा अथवा मंदिरे बांधणे, विहिरी बांधणे अशा स्थापत्यकार्यांसाठी- जनसेवेसाठी धनाचा प्रयोग करण्याचा विचार केला, तरी ते अनुचित ठरेल. कारण आम्ही ही सर्व कार्ये धनाविना करू शकतो. म्हणून तू फक्त सहस्त्र स्वर्णकमले.......”

भीमसेनाच्या शब्दांस रोखत पांचालीने म्हटले, ”कुबेरदेव! आपण फक्त पन्नास ते शत सुवर्ण कमळे द्या, किंबहुना त्याहूनही अल्प. यदाकदाचित आपली इतकीच इच्छा असेल तर.”

“देवी द्रौपदी, उचित आहे! जशी आपली इच्छा. किंतु देवी! आपण आपल्या ज्येष्ठ पतीच्या आरोपाचे खंडन केलंत, ह्या निस्वार्थी शब्दांनी. फक्त पतीच्या आग्रहास्तव आपण ही स्वर्णिम पुष्पे स्वीकारताहात. यातच माझी प्रसन्नता आहे.” कुबेराने आपले दोन्ही हात वर धरले, ओंजळीच्या रूपात, अन् त्यांतून दिव्य प्रकाश बाहेर आला, त्या प्रकाशातून एक सुंदर अशी पेटी.

ती पेटी कुबेराने पांचालीच्या हाती सोपवली, “देवी, हा उपहार स्वीकृत करा.”

द्रौपदीने ती पेटी स्वीकारत ती श्रद्धेने भाळाला लावली.

“आपण सर्वजण सरोवरविश्रामस्थलीस येऊन माझं आतिथ्य घेऊ शकता.” कुबेराने म्हटले.

“नाही, लोकपाला!”पांडवांनी नकार दिला.....

“मात्र तू विषण्ण होऊ नकोस, धनपती कुबेरदेवा! आम्ही या तीर्थयात्रेत गंधमादन पर्वतावर यदि निवास केला, तर आम्ही तुला निश्चितच भेटण्याचा प्रयास करू .” युधिष्ठिराने त्याला आश्वस्त केले.......

**स**र्व बद्रिकाश्रमात परतले.

“भ्रात्या! कुबेरासमोर मी तुला काही बोललो नाही. म्हणून माझ्या पांचालीवर तू वाटेल ते, अतार्किक आरोप केलेस. तिला सर्वांदेखत लज्जित का केलेस?” भीमाने युधिष्ठिराला खडसावून विचारले.

“हे काय आहे, भीमसेना? पांचाली फक्त तुझीच नव्हे, आमचीही आहे. त्याकारणे आम्हालाही तिच्यावर क्रुद्ध होण्याचा अधिकार आहे.” सहदेवाने असे म्हणून स्वतःहून भीमाचा रोष पत्करला होता.

“नीलांगिनीही आपल्यावर क्रुद्ध होते ना, आम्ही एकदा तिच्यावर जरासा क्रोध केला, तरी तुझ्या अकांड- तांडवास आरंभ होतो.” नकुलाने म्हटले.

हे ऐकून भीमसेनाने नकुलसहदेवांना आपल्या बाहूंमध्ये जखडत म्हटले, ” जुळयांनो! तुम्हीदेखील निष्कारण पांचालीवर क्रोध केलात. ज्या क्षणी तुम्ही तिघे जण तिच्यावर एकत्रितच क्रुद्ध झाला असाल,

त्याक्षणी ती दुःखी, खेदित, पश्चात्तापदग्ध झाली असेल अन् लज्जितही! अन् तिची काय चूक झाली रे? कधी नव्हे, तिने आज माझ्याकडे कमलपुष्पे मागितली, तीही स्वतःच्या शृंगाराकरिता, स्वतःच्या केशसज्जेकरिता नव्हे, तर आपल्या सर्वांच्या पूजनाकरिता. आणि तुम्ही तिच्यावर क्रुद्ध झालात."

भीम व माद्रीपुत्रांत पूर्वग्रह निर्माण झालेले पाहून त्या पूर्वग्रहांचे निवारण करण्यासाठी पांचालीने त्या तिघांत हस्तक्षेप केला, "आर्यपुत्र भीमसेन! आर्यपुत्र नकुलसहदेवांना सोडून द्या. ते फक्त पांडुकुलाच्या तसेच तुमच्या चिंतेकारणे माझ्यावर क्रुद्ध झाले. मला दुखावण्याचा त्यांचा मूलतः हेतू नव्हताच. त्यांना क्षमा करा."

पांचालीचे सौम्य शब्द ऐकून भीमसेनाने नकुल-सहदेवांना आपल्या बाहुबंधनातून मुक्त केले, "पाहिलंत, नकुल-सहदेवहो! तुम्ही जिला दोष दिला, तुम्हीच जिच्यावर क्रोध केला, तीच पांचाली तुमचाच पक्ष धारण करून मला सूचित करत आहे. तिलाही पांडुकुलाची चिंता आहे, तिलाही पांडवांची चिंता आहे, तुमच्या उभयंतापेक्षाही! तुम्ही काहीच विचार न करता दोषारोप केलात."

"आर्यपुत्र भीमसेन! नकुल- सहदेवांवर क्रुद्ध होऊ नका. ते तुमचे अनुज आहेत."द्रौपदीच्या शब्दांनी भीमसेन शांत झाला, मात्र तो युधिष्ठीराकडे वळला "भ्रात्या! तू तिला कुबेरादेखत दूषणे दिलीत! तू

म्हणालास, की पांचाली क्षणभंगुर मोहात धर्म-अधर्म, लाभ-हानीचा विचारच विसरून गेली. तिचं पद्माकर्षण आम्हां सर्वांवरच्या विपत्तीस कारणीभूत ठरले असते असं तू म्हणालास, मात्र तिला अशा उत्तम, दिव्य तसेच स्वर्णमयी- रत्नजडित वस्तूंचा मोह नाही याचे तुला विस्मरण घडले. यदाकदाचित तुझे शब्द सत्य असते, तर पांचालीने आपल्यासारख्या निर्धन व आपल्या अधिकारांपासून वंचित असणाऱ्या राजपुत्रांना पतीरूपात स्वीकारले नसते. विवाहानंतर खांडवप्रस्थासारख्या भयानक, निबिड व मायावी सर्पांचे वसतीस्थान असलेल्या वनात तिने निवास केला नसता. जर आपल्याविषयीचे प्रेम, चिंता आणि पांडूकुलाच्याविषयी आस्था वाटत नसेल, तर तिने आपल्याकरिता इतका अपमान सहन करून आपल्याकरिताच त्या अंध राजाकडे आपल्या स्वतंत्रतेचे वर मागितले नसते, अन् आजही अशा विकट स्थितीत कष्ट, पीडा झेलत ती आपल्यासह वनांत नसती. भ्रात्या! द्रुपदराजनंदिनी याज्ञसेनीने अनेक दुःखे, कष्ट, पीडा सहन केली, आपल्याकरिता त्याग केला, तिने एखाद्या पुष्पाची इच्छा केली, तर तिची काय चूक झाली?"

यावर युधिष्ठिर मूक राहिला, विचारमग्न झाला. त्याच्या मनात विचार आला, आपण द्रौपदीला पणाला लावलं, ते उचित होतं का? शकुनीच्या उत्तेजनाकारणे आपण अनुचित केलं? जे काही द्यूतसभेत

घडले, त्याचं सर्वस्वी कारण आपणच होतो ना? आपल्यामुळेच द्रौपदीला दुःख, वेदना व कष्ट सहन करावे लागते, हे सत्य आहे का?

“ आर्यपुत्र, आपण भोजन ग्रहण करून घ्यावे, तोपर्यंत पुष्पांच्या माला माळते.” द्रौपदीने एव्हाना पत्रावळ्या मांडल्या होत्या.

“ऋषिवरहो, भोजनाचा समय झाला आहे. आपण सर्वांनी मुख्य मंडलात यावे.” युधिष्ठिराने ऋषीवरांना साद घातली, तसे मध्य मंडलात ध्यानस्थ असलेले ऋषी शौनक, धौम्य आणि लोमश शिष्यांसह मुख्यमंडलात आले.

द्रौपदीने सर्वांना भोजन वाढले आणि मूकपणे तिने कमलपुष्पांच्या माला गुंफण्यास प्रारंभ केला.

आज भोजन करतानाही पांडव मूक होते. नेहमीप्रमाणे त्यांनी अधिक भोजनपदार्थ मागितले नाही. तिला वाटले, एकतर पांडुपुत्र आपल्यावर रूष्ट आहेत अथवा घडलेल्या घटनांविषयी विचारमग्न तरी आहेत. आपल्याला दूषणे दिल्याकारणे ते पश्चातापदग्धही असू शकतात.

तिने सर्वप्रथम नकुल- सहदेवांकडे पाहिले. नकुलाने तिच्याकडे अनिमिषपणे पाहिले, अन् भोजन करण्यास आरंभ केला. परंतु त्याचे लक्ष भोजनातच नव्हते. तो दही चावून चावून ग्रहण करण्याचा प्रयत्न करत होता.

त्याच्या त्या आचारणावरून असे वाटत होते की तो अस्वस्थ झाला आहे.

“आर्यपुत्र नकुल!” द्रौपदीच्या शब्दांकारणे नकुल भानावर आला.

“काय झाले, नीलांगिनी?”

“आर्य! भोजनाकडे लक्ष द्या.” द्रौपदीने नकुलाला म्हटले.

तसा नकुल लक्षपूर्वक भोजन करू लागला. त्यानंतर सहदेवाकडे तिने पाहिले. सहदेव एक घास ग्रहण करत होता व एक घोट जल ग्रहण करत होता.

त्याची ती कृती विचारांच्या भोवऱ्यात सापडलेल्या मनमत्स्याप्रमाणे चंचल व विचलित वाटत होती.

“आर्य, आपणही भोजनाकडे लक्ष द्या.” द्रौपदीने सहदेवाला म्हटले.

भीमसेन भोजन करताना अधिक पदार्थ मागत नव्हता म्हणून द्रौपदीने त्याच्या पत्रावळीत अधिकतर दही वाढले.

“नको, पांचाली! इतकंच भोजन पत्रावळीत असू दे. अधिक भोजन वाढू नको.” भीमाने म्हटले.

“आर्य भीम! आपल्या महाकाय, विशाल देहाला इतकंसं भोजन शोभून दिसत नाही.” द्रौपदीने असे म्हणून नकुलाच्या पत्रावळीतदेखील पायस वाढले.

“तू भोजन करणार नाहीस? पांचाली?”

“चारदोन घास ग्रहण करीन.” द्रौपदीने माला गुंफत म्हटले.

“तू भोजनानंतर औषधी घ्यायला विसरू नकोस.” नकुल आपल्या थाळीवरून उठला.

त्याच्या हातांवर जळ घालत पांचालीने म्हटले, “मी अवश्य औषधी घेईन.”

त्यानंतर सर्व पांडवाचे भोजन झाल्यानंतर द्रौपदीने सांडलेले अन्न-पत्रावळ्या आवरून शाकपत्रांची आसने अंथरली.

सर्व पांडव आपापल्या आसनांवर पहुडले. ऋषीवरांनीही आपली आसने ग्रहण करून रात्रिसाधनेस आरंभ केला.

द्रौपदीने फलाहार केला आणि तिने अक्षयपात्र धुवून ठेवले. तिने आपले मृगचर्म पांडवांच्या चरणाशी अंथरले अन् ती पहुडून निद्रेची प्रतीक्षा करू लागली.

**आज** जे प्रसंग घडले होते, अकस्मात् आलेले वादळ, पांचालीचे अस्वास्थ, तिने भीमसेनाला अज्ञात स्थळी पाठवणे, त्याने केलेल्या अनेक यक्ष-राक्षसांचा संहार, त्यानंतर कुबेराचा क्रोध, पांचालीची क्षमायाचना, त्यानंतर भीमाशी वाद-विवाद, या प्रसंगांमुळे पांडव अत्यंत

अस्वस्थ झाले होते. त्यांच्या नेत्रांवर निद्रा नव्हती पण मनावर शेष तणाव होता.

त्यांची तणावग्रस्त अवस्था द्रौपदीला त्यांच्या स्पर्शातून जाणवत होती. अर्थातच स्पर्शातून भावसंक्रमण झाले.

ते अस्वस्थ झालेले पाहून पांचाली काहीशी अस्वस्थ झाली. तिने केलेली कमलपुष्पांची इच्छा पांडवांच्या विनाशासाठी नव्हे, तर त्या निर्दोष- निरपराध यक्ष-राक्षसांच्या संहाराकरिता कारणीभूत ठरली. तरीही कुबेराने तिला क्षमा करून तिला स्वर्णकमळे आणि सहस्त्रदलांची कमळे दिलीही.

या प्रमादाचे आपण प्रायश्चित केलेच पाहिजे. आपण प्रत्येक तीर्थक्षेत्री नदी-कुंडात स्नान करून या पातकाचे क्षालन केले पाहिजे....

या निर्धाराने पांचालीला स्वस्थता लाभली. मात्र पांडव अजूनही अस्वस्थ आहेत हे जाणवून ती उठून बसली.

तिला उठलेलं पाहून सहदेवदेखील उठून बसला, त्याची विवेकबुद्धी सचेत होती. त्यामुळे त्याच्या मस्तकात विचारचक्रे फिरत होती. त्याने पाहिले, द्रौपदी अद्यापिही जागी आहे.

"तू जागी का आहेस? निद्रा घे." सहदेवाने म्हटले.

"आर्यपुत्र मात्र ...." द्रौपदीने असं म्हणताच सहदेवाने तिचे वाक्य तोडत म्हटले, " तू निद्रा घे, ऋतानृते!"

सहदेवाचा आदेशात्मक स्वर ऐकून पांचाली पहुडली.

सहदेवाने स्व-कृतीचे-शब्दांचे परीक्षण करण्यास आरंभ केला. त्याने द्रौपदीला दोष दिला हे कितपत उचित होतं? कदाचित ते उचितच नव्हतं. कारण द्रौपदीने भीमाकडे प्रथम:च एखादी इच्छा व्यक्त करावी, यात तिचा प्रमाद नव्हता. राहिली ती द्रौपदीच्या सन्मानाच्या रक्षणाची दक्षता. तिच्या रक्षणाकरिता आपण जुळ्यांनी तरी बद्रिकाश्रमात थांबायला हवे होते. अन्यथा किर्मिराप्रमाणे अन्य कोणी किंवा किंबहुना कौरवांनी तिचे हरण केले असते. आणि त्यानंतर यक्ष-राक्षसांचा घडलेला संहार. यात द्रौपदीचा काही दोष नव्हता. भीमसेनाने जर कुबेराचे आवाहन केले असते तर, हा रक्तपात टळला असता. भीमसेनाने कधी नव्हे, ते आज अविवेकाने आज आचरण केले होते.

"सहदेवा! अरे सहदेवा!"विचारमग्न सहदेवाला अस्फुट स्वरातील साद ऐकू आली. त्याने शेजारी वळून पाहिले, नकुल त्याचा बाहू धरत त्याला साद घालत होता.

"काय झालं?" सहदेव पुटपुटला.

"तू तोच विचार करतोस का, जो मी विचार करत आहे?" नकुलाने त्याच्या अंगावरील पांघरलेले सुती वस्त्र खेचले.

"निश्चितच तुझे विचार माझ्या विचारांशी जुळतात, यात काहीच शंका....." सहदेवाने आपले वाक्य पूर्ण केले, " नाही."

“याचाच अर्थ, जी विभीषिका माझ्या मनात उद्भवली, ती तुझ्या मनातदेखील उत्पन्न झाली आहे?”नकुलाने विचारले..

“अर्थातच!” सहदेवाने उत्तर दिले, निश्वास टाकत,

“या विभीषिकेचे निवारण कसे होईल, सहदेवा?” “कदाचित या विभीषिकेचे निवारण ऋतानृताच करू शकेल ना….” सहदेवाने संदिग्ध उत्तर दिले.

“म्हणजे?” नकुलाने विचारले.

“ऋतानृते……” सहदेवाने द्रौपदीच्या हातांस स्पर्शून म्हटले.

“आर्य, काय झाले?”

“काही नाही. आम्ही तुझ्यावर ज्या पद्धतीने क्रुद्ध झालो, ते उचित नव्हतं. त्याकारणे आमच्या हृदयात विभीषिका निर्माण झाली आहे, त्याचं तूच निवारण कर.” सहदेवाने म्हटले.

“आज जे काही घडलं, त्याचं विस्मरण होऊ द्या. आर्यपुत्र नकुल व सहदेव! त्याची विभीषिका हदयात ठेवू नका. आपण माझ्यावर क्रुद्ध झालात, त्याविषयी माझ्या मनात अनुक्षोभ अथवा वैषम्य नाही. आपण माझ्यावर भ्रातृप्रेमापायी क्रुद्ध झालात, अन् ती आपली क्षिप्त प्रतिक्रिया होती.” पांचालीने समजूतदारीच्या स्वरात म्हटले.

“आता कुठे आपल्या मनातील विभीषिका नष्ट झाली.” नकुलाने उचित तो प्रतिसाद दिला.

“ऋतानृते, तू युधिष्ठिराविषयी क्रोध करू नकोस. आज न् उद्या त्याच्या मनातील तुझ्याविषयीची कोमल भावना प्रकट होईल.” सहदेवाने द्रौपदीला आश्वस्त केले.

“आज्ञा प्रमाण, आर्य!” द्रौपदीने असं म्हणून कूस बदलली.

सहदेवदेखील आपल्या शय्येवर पहुडला.

आकाशात नक्षत्रांनीही आपले नेत्र मिटण्यास आरंभ केला.

**ती**र्थयात्रेचा पुढचा टप्पा होता ते अतिकठीण मंदार-गंधमादन पर्वतावरचं आरोहण! योगविद्या प्राप्त झालेल्या अर्जुनाने हे पर्वत अत्यंत सहजतेने पार केले होते, किंतु अन्य पांडवांना व पांचालीला हे पर्वत यौगिक सामर्थ्याशिवाय पार करायचे होते.

त्यापूर्वी पांचालीने आपल्याकडील चार पुष्पमाला पांडवांना समर्पित करून एक माला अर्जुनाकरिता राखून ठेवली. आपल्या प्राणवल्लभांना सत्कृत केल्यानंतर तिच्या मनाला रुखरुख लागली, जर आता अर्जुन येथे उपस्थित असते तर.......

तिने तो विचार झटकत स्वतःच्या मनाचे सांत्वन केले, ते परत आल्यानंतर आपण त्यांना ही कमलमाला अर्पण करूया. तसं पाहता, आज ज्या पर्वतांवर अर्जुनाच्या पाऊलखुणा उमटल्या आहेत, त्या पर्वतांवर आरोहण करण्याचं सौभाग्य आपण प्राप्त करणारच आहोत......

द्रौपदीने आपल्या स्कंधावर वस्त्रे- पात्रे घेतली आणि पांडव- ऋषिवरांसह यात्रेस प्रारंभ केला.

आरंभीस आरोहणासमयी पांडवांचा उत्साह असीम होता. परंतु जसे- जसे ते अतिदाबाच्या, अतिउंच कड्यावर चढत होते, तसा- तसा त्यांचा होता- नव्हता तितका उत्साह ओसरू लागला. त्यांच्या श्वसनात अडथळे आल्यामुळे त्यांची चालण्याची स्फूर्ती घटत होती. सतत येणारे वादळीवारे, उडणारे हिमपुंज, शीततेचे वाढते प्रमाण याकारणे पांडवांची गती संथ होत होती. मात्र पांचालीची गती मध्यम होती. तिला या अडथळयांचं काहीच वाटत नव्हतं. कारण तिला अर्जुनाच्या पाऊलखुणांसह प्रवास करत राहणे प्रिय व मनोरम वाटत होते.

तिची ती मध्यम गती पाहून प्रत्येक पांडवाच्या मनात निरनिराळे विचार येत होते. कधी नव्हे, ते आज युधिष्ठिर पुनः द्रौपदीविषयी सहवेदना बाळगून विचार करत होता. कल्याणीने आपल्याकरिता किती कष्ट, अपमान, पीडा झेलली! याशिवाय द्यूतसभेतील अपमानानंतरही

आपल्याविषयी तिने मनीं रोष धरला नाही. आपण दोन वेळा द्यूत खेळलो, तसेच द्रौपदीलाही पणाला लावलं! आतादेखील कल्याणीला उंच तसेच दुर्गम पर्वत चढावे लागताहेत. निबिड व कंटकी अरण्ये पार करावे लागताहेत. आपल्या- तिच्या विचारधारा जुळत नसल्या, तरी ती जुळवून घेण्याचा प्रयत्न करते आणि ती आपल्याशी एकनिष्ठही आहे, इतकं सर्व काही घडूनही. युधिष्ठिर अत्यंत पश्चात्तापदग्ध झाला होता.

उलट, तिची वाढती गती पाहून भीमाच्या मनात अर्जुनाविषयीचा मत्सर उद्भवला. पांचाली अतिवेगाने पावले टाकीत आहे, जणू काही तिला मंदार पर्वतावरच अर्जुन भेटणार आहे! त्याला भेटण्याची तिला किती आतुरता आहे! मी जर तपस्येकरिता प्रयाण, हिंडिबेकडे गमन अशा कोणत्याही कारणास्तव तिच्यापासून दूर गेलो तर, ती मला भेटण्याकरिता अशीच आतुर होईल का? तीदेखील माझ्याकरिता व्रतवैकल्ये, तीर्थयात्रा अशी दुष्कर कर्मे करेल का?

त्याच्या दुसऱ्या मनाने त्याचे ते विचार पुसून टाकले, ‘अरे, भीमा! जर तिला तुझी चिंता नसती, तिला तुझ्याविषयी प्रेम नसते तर, ती अस्वस्थ असूनही गंधमादन पर्वत चढून आली असती का अन्य पांडवांसह?’

परंतु नकुलाच्या मनात द्रौपदी आपल्यावर अन्याय करते आहे, ती आपली उपेक्षा करते आहे असा भाव उत्पन्न झाला. अर्जुनासाठीच

आता कशी पर्वताची कठीण चढण अत्यंत सहजतेने ही नीलांगिनी पार करते आहे! त्याच्यासाठीच ही व्रतवैकल्ये, ही तीर्थयात्रा, ही विरहकाव्याची रचना! आम्हां नकुल-सहदेवांना महत्त्वच नाही तिच्या दृष्टीत. तिच्या अथवा राजमातांच्या दृष्टीत भीम- अर्जुन महत्त्वाचे आहेत. आपल्या उभयंताची सदैव उपेक्षाच होत आली आहे.

आता न्यूनतेचा भाव नकुलाच्या मनात निर्माण झाला तर, सहदेवाने सदैवाप्रमाणे आताही सामतेने सकारात्मक विचार केला.

अर्जुनही ऋतानृतेचा पती आहे. त्याच्याशी भेटण्याची आतुरता, त्याच्या पाऊलखुणांसोबत असल्याची सुखकर जाणीव, भावी विरह साहण्यासाठी त्यातूनच मिळणारे मानसिक बल हे सर्व ऋतानृतेच्या अंतःकरणात असणे स्वाभाविक आहे, असा सहदेवाने विचार केला.

पांचालीची गती काहीशा प्रमाणात वाढली. हळूहळू पर्वतावरील मार्ग हिमाकारणे निसरडा होत चालला होता. ती सावधपूर्वक पावले टाकत चालली होती. मात्र तिच्या नेत्रांवर वारंवार सूर्यप्रकाशाचा प्रचंड झोत यायचा. त्याकारणे तिचे कोमल पाऊल हिमराशीवरून घसरले अन् ती पडली. पडतां- पडतां तिने एक कड्याचे टोक धरून ठेवले आणि पांडवांना साद घातली, “आर्यपुत्रहो!”

तिचा आर्त स्वर ऐकून पांडव वळले. नकुलाने धावत जाऊन तिला हात दिला, द्रौपदीने त्याचा हात घट्ट धरला.

मात्र मध्येमध्ये वाहणाऱ्या वादळावाऱ्याकारणे द्रौपदीच्या मुखावर हिमपुंज येत होते, किंतु तिने ते सर्व हिमपुंज चुकविले, तरीही एक हिमपुंज तिच्या भालप्रदेशातील जखमेवर बसलाच, त्याकारणे तिच्या जखमेतील रक्त गोठले व ज्वराकारणे तिला प्रचंड क्लांती आली. सुषुप्तीच्या अवस्थेतही तिच्या मुखातून एकच शब्द उच्चारला गेला- ज्याचे स्मरण तिला या क्षणी तीव्रतेने घडले होते, त्या अस्फुट स्वरातील शब्द- “अर्जुन....”

तो शब्द ऐकून नकुलाचा हात काहीसा सैलावला. यदाकदाचित तो हात पूर्णच सैलावला असता तर......द्रौपदी त्या उंच कड्यावरून कोसळली असती.

या कल्पनेनेच नकुलाने द्रौपदीचा हात घट्टपणे धरला.

नाही! नाही! असे होता कामा नये! द्यूतसभेत आपण तिचं रक्षणही केले नाही, किर्मिर व जटासुरवधावेळीही आपण तिला पूर्णतःही सहाय्यता करू शकलो नाही; आता आपल्या निष्काळजीपणामुळे तिला काहीही होता कामा नये, अन्यथा आपण स्वतःला कधीच क्षमा करू शकणार नाही.

नकुलाने तिचा हात ओढून तिला पर्वतकड्यावर आणले व तिच्या क्लांत देहाला सावरत त्याने तिला भूमीवर अलगदपणे ठेवले, मात्र आतादेखील तिने त्याचे मनगट घट्टपणे धरुन ठेवले होते.

त्याने तिच्या हातातून आपले मनगट सोडवून घेतले, आणि तिचे मस्तक मृगचर्मावर आसनस्थ असणाऱ्या युधिष्ठिराच्या मांडीवर ठेवले.

“नकुला! कदलीपर्ण आण नि पांचालीला वारा घाल.” भीमसेनाने नकुल-सहदेवांना आज्ञा दिली, “सहदेवा! तिचे चरण चुरण्यास आरंभ कर, जेणेकरून तिला शुद्ध येईल. मी तिच्याकरिता जल आणतो.”

भीमसेनाच्या आज्ञेचे पालन करत नकुल द्रौपदीला वारा घालू लागला तर, सहदेव तिचे कोमल आरक्त चरण चुरु लागला, हळूवारपणे.

“ युधिष्ठिरा, ही औषधी घे नि द्रौपदीच्या भालप्रदेशातील जखमेवर लाव.” सहदेवाने युधिष्ठिराला सूचित केले. त्याच्या सुचनेनुसार युधिष्ठिराने द्रौपदीच्या मस्तकावरील जखमेवर उपचार केले.

“पांचालकन्या आता कुशल आहे ना?” महर्षी लोमशांनी युधिष्ठिराला विचारले.

“ देवी पांचाली शुद्धीवर आली का?” धौम्य ऋषींनी त्यापाठोपाठ प्रश्न केला.

“ सम्राज्ञीकरिता मी काहीशी औषधी- चूर्ण देऊ का, राजा युधिष्ठिरा?” शौनक ऋषींनी म्हटले.

“नाही ऋषीवर, त्याची आवश्यकता नाही. मी जल आणलंय.” भीमाने द्रौपदीच्या मुखावर जल शिंपडले.

द्रौपदीचे नेत्र तसेच अधर हलू लागले होते. तसा पांडवाच्या जीवात जीव आला.

**पां**चालीची मूर्च्छा खंडित होत होती. तिने नेत्र उघडले. तसे तिला आपली सेवा करणारे नकुल-सहदेव दिसले. सहदेवाला आपले चरण चुरताना व नकुलाला वारा घालताना पाहून ती काहीशी लज्जित झाली, संकोचली.

तिने आपले चरण मागे घेत नकुलाच्या हातातील कदलीपर्ण धरत म्हटले, “आर्यपुत्रहो! आपण उभयंता हे काय करताहात?”

“पांचाली! तू स्वस्थ तर आहेस ना?” चारी पांडवांचा एकत्रित प्रश्न.

“मी स्वस्थ आहे.” द्रौपदीने म्हटले. तिच्या लक्षात आले की, तिचे मस्तक युधिष्ठिराच्या मांडीवर होते.

“कल्याणी!” युधिष्ठिर तिच्या केशांतून हात फिरवत म्हणाला, “माझ्याकरिता हे दुःखदायक, पीडादायक आहे की मी राजा द्रुपदास असत्य आश्वासन दिले.”

“काय? कसलं असत्य आश्वासन?आर्य....”

“की तुझी कन्या एखाद्या पद्मिनीप्रमाणे एका सरोवरातून दुसऱ्या सरोवरात प्रवेशलेली आहे. परंतु आम्ही तुला कुठल्या पंकात आणून ठेवलंय! देवी लक्ष्मीप्रमाणे ऐश्वर्य, मानसन्मान, सुखोपभोग, दिव्य वस्तू आणि उत्तम रत्ने प्राप्त करण्याची जिची योग्यता आहे, ती पांचालराजपुत्री निबिड वनात-दुर्गम पर्वतांवर प्रवास करून मूर्च्छित झाली आहे.

जी पूर्वी स्वर्णिम धाग्यांनी विणलेली निर्माण केलेली रत्नजडित व मृदु वस्त्रे धारण करत होती, तिला आज वल्कले, मृगचर्मे कटीभोवती गुंडाळून राहावे लागते. माझ्यामुळेच कल्याणीला अरण्यांत तसेच पर्वतांवर प्रवास करण्याचे परिश्रम घ्यावे लागतात. याशिवाय इंद्रप्रस्थात जिची पावले फक्त न् फक्त मृदूमुलायम वस्त्राच्छादनावर अथवा पुष्पांवर पडायची, मात्र आज तिची पावले कठीण मार्गांकारणे रक्ताळली आहेत. पूर्वी राजमहालात वास करणारी ही महाराणी अपरिमित कष्ट पीडा सहन केल्याकारणे किती खंगली आहे, किती कृश झाली आहे. माझ्यामुळेच तुला या निष्कांचन अवस्थेत जगावे लागते.” युधिष्ठिर पश्चातापाने बोलत होता.

त्याचे ते शब्द ऐकून द्रौपदीचे नेत्र सजल झाले. का होणार नाही? तिच्या ज्येष्ठ पतीला तिची पर्वा होती, तिची चिंता होती, तिला होणाऱ्या यातना- कष्टांविषयी सहवेदना होती, हे तिला जाणवलं होतं.

“आर्यपुत्र युधिष्ठिर!आपण व्यथित होऊ नये. आपणा सर्व पांडवांचं साहचार्य माझ्या यातना, पीडा कष्टांचे हरण करते. मला हा वनवास दुःखदायी वाटत नाही. कारण आपले सर्वांचे सान्निध्यच माझ्याकरिता सुखदायी आहे. आर्यपुत्रहो! मी हस्तिनापुरात राज्यविभाजनावेळी काय म्हटलं होतं, ते लक्षात आहे का? ‘मी आपली सेवा करता-करता वनातही सुखाने कालक्रमणा करेन'. मी असं म्हटलं होतं, ते स्मरणात आहे ना, आर्य?” द्रौपदीने युधिष्ठिराचे हात हाती घेत चारी पांडवांना विचारले.

त्यावर पांडवांनी मान डोलावली.

“याशिवाय आपल्या सर्वांची निष्कांचन अवस्था व वनवासाकारणे झालेली आपणा सर्वांच्या शौर्याची दुरावस्था, आपणा सर्वांचे कष्टोपार्जित वैभव दुर्योधनाने हिरावल्याचे शल्य, आपण सर्व चक्रवती दिग्विजयी सम्राट असूनही आपली झालेली वारंवार वंचना, आपल्यावर झालेले अन्याय याकारणे मी आपल्यावर क्रुद्ध झाले होते, धर्मराज! याचा अर्थ असा समजू नका की मला या वनवासाकारणे कष्ट होताहेत.” द्रौपदी उठून बसली. तिने आपली पीडा लपवण्याचा प्रयास केला होता.

हे पाहून भीम दुःखी झाला. त्याला वाटले, यात द्रौपदीचा काय दोष? तीर्थयात्रेची सूचना तर सहदेवाने केली होती, म्हणून द्रौपदीला हे कष्ट झेलावे लागले. तिने आपली गती वाढवली, ते याच कारणासाठी,

की तिला कष्ट होत नाहीत, ती सहजरीत्या पर्वत पार करत आहे हे दाखवण्यासाठी, किंबहुना आपल्याला दुःख होऊ नये याकरिता.

"पांचाली! हा आज्ञाधारक सेवक उपस्थित असताना तू व्यर्थ का कष्ट घेतेस? तू जर मला सांगितले असतेस, 'मी क्लांत झाले आहे, मला थकवा आला आहे, मी अस्वस्थ आहे' तर, मी तुला उचलले असते. आताही मी तुला उचलू?" ऋषीवरांकडे पाहत भीमसेन संकोचत म्हणाला.

"आर्य, काय हे? मी चालू शकते, मला उचलण्याची आवश्यकता नाही." द्रौपदी उठून उभी राहिली.

"जर पांचालराजकन्येला विश्रांतीची आवश्यकता आहे, तिच्या पतीने तिला उचलून प्रवास केला, तरी ते अशिष्टतेचे लक्षण ठरणार नाही." महर्षी लोमशांनी स्पष्टपणे म्हटले.

भीमाने तिला उचलून आपल्या भरदार स्कंधावर बसविले. तत्क्षणी ती लज्जित झाली व त्याच्या स्पर्शातील प्रेमाकारणे आनंदलीही.

काही अंतर पार केल्यानंतर अन्नाअभावे नकुल-सहदेव नि धर्माला अत्यंत थकवा आला. याशिवाय शिष्यगणांनाही आता पर्वत पार करणे संभव होईना.

"आता काय करावे, भीमा?" थकलेल्या युधिष्ठिराने विचारले.

त्या सर्वांची ती अवस्था पाहून भीम चिंतित झाला. क्षणांत त्याला काहीतरी युक्ती सुचली.

त्याने द्रौपदीला एका शिलेवर बसवले अन् त्याने तीन वेळा उत्तरदिशेला अभिमुख होत साद घातली, “घटोत्कच! घटोत्कच!! घटोत्कच!!!”

....आणि धुळीचा प्रचंड लोट सर्वांदेखत उसळत आला!

. 🌊⛅⛅

**स**र्वांसमोर एक बलदंड महाकाय राक्षसी देहाचा एक युवक प्रकटला.

“तू घटोत्कच आहेस?” युधिष्ठिराने अविश्वासाने विचारले.

“अर्थातच , तातश्री!” घटोत्कोचाने सर्वांना प्रणाम केला.

“सुखी भव!” “यशस्वी भव!” “चिरंजीवी भव!” “कीर्तीवंत भव!” पांडवानी त्याला आशीर्वाद दिले.

“पुत्रा! कित्येक दिवसांनी, तू मला दिसतोस! तुला पाहिल्यानंतर मला द्रौपदेय, माझे प्रिय पुत्र-सुतसोम, सर्वग, साराध्याचे तीव्रतेने स्मरण घडले आहे. अन् ते तुझ्या दर्शनाकारणे निरसणार आहे. कारण तू माझा सर्वात ज्येष्ठ पुत्र आहेस. माझ्या प्रथम पुत्रा!” असं म्हणत भीमाने त्याला आलिंगन दिले.

“तात!आपले दर्शन पुन्हा घडल्याकारणे माझे हे नेत्र धन्य झाले. असं भाग्य माझ्या मातेलाही प्रदान करा.” घटोत्कचाने भावुक होत म्हटले.

“अवश्य! तीर्थयात्रेत ज्याक्षणी हिमालयामध्ये आम्ही प्रवेश करू, त्याक्षणी मी निश्चित हिडिंबेला भेटेन.” भीमसेनाने म्हटले.

“तेव्हा कशाला! तू आत्ताच हिडिंबेला वायुवेगाने येथे आणू शकतोस. म्हणजे ती नीलांगिनीलाही भेटू शकेल.” नकुलाने घटोत्कचाला सूचित केले.

“आता नाही. आपण ऋषी कन्डुमणीच्या आश्रमापर्यंत पोहोचलो नाही आहोत. ऋषी कन्डुमणीच्या आश्रमात आल्यानंतर तू हिडिंबेला येथे आण.” महर्षी लोमशांनी म्हटले.

“ऋषिवर उचित म्हणताहेत. आम्ही अत्यंत थकलेलो आहोत. तू सर्वप्रथम आम्हांला वायुवेगाने त्या आश्रमापर्यंत नेण्याची व्यवस्था कर.”सहदेवाने घटोत्कचाला आदेश दिला.

“पुत्र घटोत्कच!तू स्वयं तुझी माता याज्ञसेनीला उचलून, परंतु कोमलपणे धरुन वायुवेगाने आश्रमापर्यंत प्रवास कर.” भीमाने म्हटले, तसा घटोत्कचाने शिलेवर बसलेल्या द्रौपदीला प्रणाम केला, ”प्रणाम माते!”

“आयुष्यमान भव!कीर्तीमान भव!” द्रौपदीने त्याची हनुवटी धरत म्हटले, ”पुत्रा! मला तर वाटलं, माझा पुत्र सुतसोम आला आहे की काय! तुला पाहिल्यानंतर माझ्या सर्व पुत्रांशी भेटण्याचा आभास होतोय. तसे म्हणजे तू माझाही पुत्र आहेस. तुझे शिष्टाचार, संस्कार पाहून असं वाटतंय की, तुझी माता हिडिंबा राक्षसी नसून आर्यस्त्री आहे. एका आर्याला-क्षत्रियाला शोभतील असे संस्कार तिने दिलेले आहेत. तिच्या संस्कारांचे, तिच्या पतिनिष्ठेचे गुणगान भीमसेन करतात, मला त्याकारणेच सर्व ज्ञात झाले. तरीही तुझ्या मातेला पुनरेकवार भेटण्याची इच्छा आहे. राजसूय यज्ञात ती मला भेटली होती ना!”

“द्रौपदीमाते! मी तुझाही पुत्र नव्हे, तर तुझाच पुत्र आहे.” असे म्हणून घटोत्कचाने द्रौपदीचे हृदय जिंकले.

घटोत्कचाला ही कला आर्यपुत्र अर्जुनांनी शिकवली तर नसेल ना! कारण एखाद्याला आपल्यावर अधिकार असल्याचा विश्वास देऊन त्याच्या हृदयाला हात घालण्याची कला अर्जुनांनाच येते, हा विचार करूनच द्रौपदीला हसू आले, पण ती हसली नाही.

“काय झाले, माते? तुला माझ्या शब्दांचा क्रोध तर.......” घटोत्कच शंकित झाला. त्याचे वाक्य तोडत द्रौपदी म्हणाली, “नाही, मला क्रोध नाही आला, मात्र मी विचारमग्न झाले.”

“माते, अधिक विचार करू नकोस. तुला आता विश्रांतीची आवश्यकता आहे. ये, तू माझ्या स्कंधावर बस, माते!” घटोत्कच शिलेजवळ बसला.

त्याच्या मांडीवर पाय ठेवत द्रौपदी त्याच्या खांद्यावर बसली आणि त्याच्या मस्तकावर हात फिरवत म्हटले, “तू माझाच पुत्र आहे रे, घटोत्कच!”

द्रौपदीच्या स्पर्शातील ममत्व, वात्सल्यभाव जाणवून घटोत्कच मनोमन धन्य झाला, मातृप्रेमाने द्रवित झाला.

त्याने विशिष्ट प्रकारची ध्वनीनिर्मिती करून अन्य राक्षसमित्रांना बोलावले. तसे अन्य राक्षस मित्रही उपस्थित झाले आणि त्यांनी चारी पांडव अन् इतर शिष्यगणांना उचलून घेतले.

घटोत्कच, त्याच्या राक्षस मित्रांनी त्या सर्वांसह प्रवासास प्रारंभ केला.

“तुला द्रौपदीच्या शब्दांवरून काही क्षणांपूर्वी ज्ञातच झालं असेल, की भीमसेन पांचालीसमोर हिडिंबेची स्तुती करून पांचालीला कसा भंडावून सोडवतो ते!” नकुलाने भीमाची चेष्टा केली.

“खरं का, तात?”

“काहीही हं!आर्यपुत्र नकुल! आर्यपुत्र भीमसेन मला कधीच भंडावून सोडत नाहीत. आर्यपुत्र भीमसेनांना देवी हिडिंबेचे स्मरण

स्वाभाविकपणे घडत होते व ते तिच्या गुणांचे वर्णन करायचे.” द्रौपदी भावुक झाली, “प्रथम प्रेम असंच असतं, आपण कितीही ठरवलं, तरी त्या प्रेमाची आपल्या मनात- रोमारोमांत खोलवर रुजलेली पाळेमुळे उखडून काढू शकत नाही आणि देवी हिडिंबा हे भीमसेनाचे प्रथम प्रेम आहे!”

असं म्हणताना द्रौपदीला अर्जुनाच्या प्रथम शराचे प्रकर्षाने स्मरण घडले, ज्या शराने त्याने लक्ष्यभेद करून तिला जिंकले होते नि त्यानंतरचा अन्य राजांवर केलेला शरवर्षाव. अर्जुनाच्या रुप, पराक्रम, मितभाषीत्व, धैर्य व विजिगीषूवृत्तीवर मुग्ध होऊन तिने त्याच्या कंठात वरमाला घातली होती. त्याक्षणी तिचे शरीर प्रेमाने कंप पावत होते. ती विलक्षण कोवळ्या स्तरावरची थरथर आज शरीरावर उमटली नाही. कारण ते शरीर, मन फक्त आज अर्जुनाकरिता नव्हते, तो देह, ते मन आता अन्य पांडवांनाही समर्पित आहे!

तिने आपल्या मनातील विचार झटकून टाकले. तिच्या विवाहाला सतरा वर्षे झाली होती. तिचे जे पाची पांडवांत विभाजन झाले होते, त्याची सल अजूनही तिच्या मनात होती. परंतु आता पांडव तिचे लोकाचारबध्द पती आहेत, त्याकारणे ही सल मनात असता कामा नये, असा तिने विचार केला.

भीमसेन, नकुल, धर्मराज, सहदेवही माझी किती काळजी घेतात, माझी चिंता करतात, माझ्यावर किती प्रेम करतात! खरोखरच! पण अर्जुनांची तपस्या सुव्यवस्थित व निर्विघ्न रीतीने पूर्ण होतं असेल ना? त्यांना काही कष्ट, पीडा तर होत नसेल? तिला पुन्हा चिंता वाटू लागली.

तिने आपल्या अन्य पतींकडे पाहिले. नकुलाने धावत येऊन तिला सावरले होते, त्यानंतर युधिष्ठिराने तिचे मस्तक आपल्या मांडीवर घेऊन पश्चाताप व्यक्त केला होता, सहदेवाने तिचे चरण चुरुन व तिला औषधी देऊन तिला स्वास्थ प्रदान केले होते. भीमानेही तिला प्रवासात कष्ट होऊ नये म्हणून तिला सर्वप्रथम स्वतः उचलले. त्यानंतर घटोत्कचाकरवे तिचा प्रवास सुकर केला, अर्थातच तिच्या प्रत्येक पतीला तिची पर्वा, चिंता आहे अन् तिलाही त्यांची पर्वा अन् चिंता आहे.......

"माते, कन्डुमणींचा आश्रम आला आहे."

सर्व राक्षसांनी पांडवांना तर, घटोत्कचाने द्रौपदीला खाली उतरविले.

ऋषी कन्डुमणींच्या आश्रमाचा मनोरम परिसर आता सर्वांच्या दृष्टिक्षेपात स्पष्ट होता, निवळशंखपणे!

“ **मी** हिडिंबामातेला येथे घेऊन येतो.”असे म्हणून घटोत्कच वायुवेगाने अन्य राक्षसांसह लुप्त झाला. हिडिंबेला भेटण्याकरिता भीमसेन अतिशय अधीर व उत्सुक झाला होता.

इतक्या मासांनी हिडिंबा आपल्याला भेटणार आहे! ती आपल्यावर रूष्ट, क्रुद्ध असेल का? अकस्मात् मीलन घडल्यानंतर तिची प्रतिक्रिया काय असेल? या विचारांत भीम होता.

“पाहिलंस, नीलांगिनी! तू भीमसेनासह असतानाही तो हिडिंबेचाच विचार करतो आहे, त्याचं तुझ्यापेक्षा अधिक उत्कृष्ट प्रेम हिडिंबेवर आहे.”नकुल द्रौपदीला मत्सराने ज्वलित करण्याच्या हेतूने म्हणाला.

यावर द्रौपदी भीमाला हिडिंबेवरून छेडत म्हणाली, “आर्यपुत्र भीमसेन! आपण हिडिंबेचा विचार करताहात?”

“तुलाही अर्जुनाचे तीव्रतेने, वारंवार स्मरण घडत नव्हते का? तर मी हिडिंबेचा विचार केला, त्यात कुठलीही आपत्ती आहे?”भीमसेन रुष्ट झाला.

“मी केवळ परिहास केला, आर्य!”

“अस्सं! मी मात्र परिहास नाही केला.” भीमाने म्हटले.

“हिडिंबा येईल इतक्यात.” युधिष्ठीराने म्हटले,

”तत्पूर्वी आपणा सर्वांच्या आसनांची व्यवस्था कर, सहदेवा!”

“आर्य, मी आसनांची व्यवस्था करते.” पांचालीने ऋषीवरांसहित पांडवांच्या आसनाची व्यवस्था केली.

सर्वांनी निवांत बसून फलाहार केला आणि ते सर्व ऋषि कन्डुमणींची ध्यानधारणा समाप्त होईपर्यंत प्रतीक्षा करू लागले.

तत्क्षणीच वायुचा प्रचंड झोका आला, तसे सर्व पाहातच राहिले. आपल्या मातेला- हिडिंबेला स्कंधावर घेऊन घटोत्कच प्रकटला होता. त्याने आपल्या मातेला- हिडिंबेला स्कंधावरून खाली उतरविले.

हिडिंबेने त्या सर्वांना प्रणाम केला, ”प्रणाम, मी हिडिंबा- घटोत्कचाची माता व भीमसेनाची भार्या आपणा सर्वांस प्रणाम करते आहे.”

ऋषीवरांनी स्मित करून तिला शुभाशीर्वाद दिले. “प्रणाम, देवी हिडिंबे!” द्रौपदीने तिचे चरण शिवले, तसे हिडिंबेने तिला आलिंगन दिले, “अखंड सौभाग्यवती भव! पांचालराजकन्ये!”

“प्रिये! तू कशी आहेस?” भीमाने तिच्या स्कंधांवर हात ठेवले.

“भीमसेन, माझी प्रकृती उत्तम आहे. मात्र अर्जुन कुठे दिसत नाहीये! तो भोजनाची व्यवस्था करायला गेलाय का?” हिडिंबेने म्हटले.

“नाही, तो तपश्चर्या करायला गेलाय. तो कधीपर्यंत परतेल, ह्याची यत्किंचितही कल्पना नाही.” युधिष्ठिराने म्हटले.

“तपश्चर्या?” हिडिंबेने आश्चर्याने विचारले,

“ते कशासाठी?”

“त्या दुष्ट कौरवांना दंडित करण्यासाठी उपयुक्त असणाऱ्या दैवी अस्त्रे प्राप्त करण्याकरिता.” भीम उद्गारला.

“ कौरवांनी तुमच्यासह द्यूत खेळून तुमच्या सर्वस्वाचे हरण केले होते ना?”

“होय, हिडिंबे!”भीम उसासे टाकत होता.

“हिडिंबे व घटोत्कचा! तुम्ही उभयंतांनीही आमच्यासह आसन ग्रहण करा.” युधिष्ठिराने विषयांतर केले.

हिडिंबा व घटोत्कचाने आसन ग्रहण केले. हिडिंबा द्रौपदीकडे पाहत होती. चार वर्षांपूर्वी पांचालीला तिने पाहिले होते, राजसूय यज्ञासमयी! त्यावेळी ती जितकी सुंदर, तेजस्वी दिसत होती, आज तितकंच तिचं रूप, लावण्य आजही सात्विक तेजाने झळाळत होतं. मात्र तेव्हा ती मध्यम अंगयष्टीची होती, किंतु आता तिची कोमल काया कृश झाली होती. तेव्हा तिच्या मुखावर अभिमानासह प्रसन्नता होती, परंतु आज मात्र कौरवांचा विषय निघाल्यावर तिच्या नेत्रांत क्रोध व दुःख एकत्रित आलं होतं. असं का? याशिवाय तिचे केशही मुक्त आहेत.

द्रौपदीला जसं कळलं की हिडिंबा तिचे निरीक्षण करते आहे, तसे तिने आपले नेत्र झुकवले, आपले सजल नेत्र हिडिंबेला दिसू नये म्हणून.

आपल्या राकट व खरबरीत हात द्रौपदीच्या कोमल गालावर फिरवत हिडिंबेने विचारले, “मात्र राजकन्ये! तुझी प्रकृती स्वस्थ तर आहे ना?”

“नाही, मी स्वस्थ आहे, देवी!”

“तुला तर ज्वर चढला आहे आणि तू कृशही झाली आहेस, राजकन्ये!”

“अशा हिमवर्षेत ज्वर चढणे नैसर्गिक आहे, अन् व्रतवैकल्यांमुळे मी कृश झाले आहे, तसं चिंता करण्याचे काहीच कारण नाही. असा ज्वर साधारणतः चढतोच.” द्रौपदीने स्पष्टीकरण दिले.

“आणि तुझे केश मुक्त का? द्रुपदकन्ये?” हा प्रश्न ऐकून भीम मांडीवर मुष्टी आपटू लागला. नकुल आपल्या तलवारीची धार तपासू लागला. सहदेवाने ग्रंथ वाचण्यास प्रारंभ केला. युधिष्ठिरही अस्वस्थ झाला.

द्रौपदी क्रुध्द झाली व कंपितही, “ देवी! दु:शासनाने ज्या बाहुंनी माझा कोमल बाहू तसेच माझे पवित्र केश धरुन सभास्थानी फरपटत नेले, माझ्या पावन शरीरास आपला अभद्र स्पर्श करण्याचे दु:साहस केले, माझे वस्त्रहरण....... करण्याचा प्रयास..........”

पुढे द्रौपदी काहीच बोलू शकली नाही. एक उसासा टाकत तिने शांतपणे मात्र त्वेषपूर्ण स्वरात म्हटले, ”याशिवाय ज्याने मला प्रताडित करून माझा- पांडवाचा उपहास केला, त्याच्या भुजा उखडून तसेच

त्याच्या वक्षाचे विदारण करून, त्याच्या रक्ताने माझे केस धुतले जातील अन्यथा, ते मोकळे राहतील असा माझा निर्धार आहे.”

हे सर्व ऐकून हिडिंबेला धक्काच बसला.”काय, द्रौपदी? त्या कौरवांनी तुझं वस्त्रहरण करण्याचा प्रयत्न केला? तुझा अपमान करून तुला त्रस्त केले? हे असं सतिसत्यम घडलं होतं? याचाच अर्थ, आम्हाला अपूर्ण वार्ता प्राप्त झाली होती का? माझा तर विश्वासच नाही बसत.”

“हिडिंबे! तू प्रवासाकारणे थकली असशील, तू फलाहार कर, तुझा थकवाही……दूर होईल.”युधिष्ठिर आतादेखील विषयांतर करत होता.

“भ्रात्या! तिला सत्य सांगितलंच पाहिजे. कुणाच्याही तोंडून हा प्रश्न ऐकून आम्हांला लाज वाटेल, तरीही तुला सत्य कळलं पाहिजे म्हणून मी तुला सांगतो.” असे म्हणून भीमाने सर्व काही वृत्तांत सांगितला , मन घट्ट करून.

“काय?आताही माझा विश्वास नाही बसत, की उत्तम गदाधर, बलिष्ठ, प्रतापी असलेल्या भीमसेनांनी- माझ्या पतीने पांचालीचे रक्षण केले नाही? अन् विवेकी धर्मराजांनी कसे काय पांचालकन्येला व तुम्हां सर्वांना पणाला लावले? इतर शूरवीर पांडव अघटित पाहत राहिले? त्यांनी काहीच विरोध नाही केला?”हिडिंबेने विचारले.

यावर चारही पांडवाची मुखे दुर्मुखली आणि अतिवर्षेकारणे कमलपुष्पाचे देठ मोडावे त्याप्रमाणे त्यांची मुखे झुकली.

भीमाचेही इतके नैतिक धैर्य नव्हते की त्याने आपल्या पट्टराणीच्या नेत्रांस नेत्र भिडवावे! भविष्यज्ञाता सहदेवही निशब्द होता. त्याप्रमाणे नकुल-युधिष्ठिरही मूक होते.

त्यांची ती शांतता पाहून द्रौपदी प्रक्षुब्ध व उद्विग्न झाली. तिने एक जळजळीत कटाक्ष पांडवांवर टाकून मान फिरवली.

"आर्यपुत्रहो! त्या दिवशीप्रमाणेच आजही आपण शांत आहात! कौरवसंहाराची भाषा बोला, आर्य! असे शांत बसू नका. फक्त तुमच्यासाठीच अन् तुमच्यासाठीच धनंजय पाशुपतास्त्रादि दैवी अस्त्रे प्राप्त करण्याकरिता महाकठीण तपस्या करताहेत आणि तुम्ही सर्वजण शांत आहात?" द्रौपदी परिवेशाचे भान राखत खालच्या स्वरात मात्र तप्त स्वरात म्हणाली.

यावर चारही पांडव मूक राहिले. आता त्या शांततेतही ऋषींचे खर्जातील स्वर, पांडव -द्रौपदीचे अस्वस्थ निःश्वास व हिडिंबा-घटोत्कचाची स्तब्धताच जाणवत होती.

त्या शांततेचा भंग करत हिडिंबेने निराश स्वरात म्हंटले, "भीमसेन! तुमच्याकडून ही अपेक्षा नव्हती, हे सर्व ऐकून माझा अपेक्षाभंग झाला. याशिवाय मी दुखावलेही गेले आहे. आपण पांचालीचे रक्षणही केले नाही. दु:शासन तिच्या वस्त्रांस हात घालताना तरी तुम्ही निदान गदा

धारण करावयाची होती.” हिडिंबेच्या स्वरात आत्यंतिक दुःख होते अन् सुप्त अनुक्षोभही होता.

यावर पांडव मूक राहिले. काही क्षणांनी भीमसेनांनी म्हटले, “जे काही घडलं, ते अघटितच घडलं आहे. त्यात आता परिवर्तन असंभव आहे. किंतु त्या दुष्कर्मांचा आम्ही अवश्य प्रतिशोध घेऊ. त्या दुष्टांना क्षमा नाही. तेरा वर्षानंतर निश्चितच मी स्वतःच्या हातांनी द्रौपदीच्या केशांना दु:शासनाच्या रक्ताचे सचैल स्नान करून तिची वेणी बांधेन. अन् त्या दुर्योधनाचाही ऊरुभंग करेन.”

भीमसेनाचा उच्चरव ऐकून तिन्ही ऋषींचा ध्यानभंग झाला अन् कन्डुमणीही आश्रमातून बाहेर आले.

आपल्याकारणे ऋषीवरांचा ध्यानभंग झाल्याकारणे भीम पश्चातापदग्ध झाला. त्याने चारही ऋषींची क्षमायाचना केली, ”क्षमा असावी, ऋषीवर! माझ्याकडून हा प्रमाद घडायला नको होता. परंतु मला क्रोध आवरत नाही म्हणून मी उच्चरवात बोलून गेलो. त्याकाळचे आपला ध्यानभंग घडला.”

त्यावर ऋषी कन्डुमणींनी सर्वांना आशिर्वाद देऊन भीमास म्हटले, ”पुत्रा, मी तुला क्षमा केले आहे. तू आपल्या भार्यासह, भ्रात्यासह व अन्य ऋषीगणांसह आश्रमात प्रवेश करु शकतोस. मी आपणा सर्वांचे या आश्रमात स्वागत करत आहे.”

तेव्हा भीम वगळता अन्य पांडव, द्रौपदी व महर्षी धौम्य, लोमश, शौनकांसह आश्रमात प्रवेशले. कारण हिडिंबेने आपल्या मजबूत बाहूने भीमाचा बलदंड बाहू घट्टपणे धरुन ठेवला होता.

"मला काही क्षणांसाठी भीमसेनांशी वार्तालाप साधायचा आहे." हिडिंबेने धर्मराजाला उद्देशून म्हटले, "अनुमती असावी."

"अवश्य."

१११

"**म**ला का थांबवलेस? तुला माझ्याशी काय बोलायचे आहे?" भीमसेनाने आपला बाहू हिडिंबेच्या हातांच्या पकडीतून सोडवत म्हटले.

"अर्थातच! भीमसेन! आपण म्हणालात की घटितात परिवर्तन असंभव आहे, तर तुम्ही ते घटितच का घडू दिलं? द्रौपदीला व आपणांस आता असे कष्ट झेलावे लागले असते का? याशिवाय तुमचा- द्रौपदीचा गेलेला सन्मान आणि कीर्ती परत मिळवणे शक्य आहे का? तुम्ही कौरवांचा वध करून त्यांचा प्रतिशोध घेणार आहात ना? तर द्यूतसभेतच का प्रतिशोध घेतला नाही?"

"राक्षसांच्या व आर्यांच्या रीतीत भेद असतो, प्रिये! राक्षसांच्या सभेत शस्त्राघात करणे समुचित मानले जाते. याशिवाय तेथे युद्ध करणे निषिद्ध नसते. मात्र आर्यांच्या सभेला अनेक मर्यादा, नैतिक बंधने असतात. आर्यांच्या सभेत शस्त्रे उचलणे व युद्धप्रवृत्त होणे हे एका

प्रकारचे अपराध असतात. म्हणून आम्ही त्या मर्यादेचे उल्लंघन केले नाही.”

“वृकोदर! हे काय म्हणणं झालं? एका स्त्रीचा अपमान करणे ही सभेची नैतिक मर्यादा असते का? आपल्या भार्या, बंधूंना डावाला लावणे हेही अनुचित……” हिडिंबा भीमाच्या आरक्त मुखाकडे पाहत चाचरत म्हणाली. तिला वाटलं, आपण अनुचित तर केले नाही ना....

”प्रियतमे! तुझ्या शब्दांत तथ्य असले तरी, तू एक सत्य समजून घे ना! जे काही घडलं, ते घटित बदलू शकत नाही, ते आमच्या हातातही नाही. मात्र....” भीमाचे शब्द रोखून हिडिंबेने आपला मुद्दा पुनः मांडला, ”भीमसेन, मात्र ते घटित घडू न देणे हे तुमचं त्याचक्षणीचं कर्तव्य होतं, हेच मी म्हणत आहे.” हिडिंबेच्या या शब्दांवर भीमाने म्हटले, “आता हे म्हणण्यात काय अर्थ आहे? जे घडायचं होतं ते घडून गेले आहे.” भीमाचा स्वर हताश होता, “किंबहुना, ते अटळच होतं.”

“आर्य…….” अकस्मात त्या उभयंतांच्यामध्ये हस्तक्षेप करणारा स्वर त्यांच्या कानी पडला. त्यांनी वळून पाहिले, द्रौपदीने त्या उभयतांमध्ये हस्तक्षेप केला होता.

“आर्यपुत्र! मला क्षमा करा. मला आपल्या उभयंताच्या वार्तासंवादामध्ये हस्तक्षेप करायचा नव्हता. मला आपणा दोघांच्या

एकांताचा भंग करायचा नव्हता. मात्र ऋषी कन्डुमणींनी आपणांस बोलावले आहे.” द्रौपदीने मर्यादेचे भान राखत म्हटले.

“असू दे, पांचाली! तू क्षमा मागण्याची आवश्यकता नाही.” भीमसेनाने म्हटले, स्मित करत.

“देवी हिडिंबे! आपण व भीमसेन माझ्या वस्त्रहरणाविषयीच बोलत होता ना? आपण भीमसेनांवर कृपया क्रुद्ध होऊ नये. कारण तुमच्या व माझ्या अनुत्तरित प्रश्नांची उत्तरे त्यांच्याकडे नाहीत. त्यांच्याचकडेच नव्हे तर, अन्य पांडवांकडेही नव्हेत. कारण संचित जर भयावह व दुःखद असेल, तर आपण ना त्याची कारणे शोधू शकत, ना त्या कारणांची मीमांसा करु शकत.” द्रौपदीच्या स्यपक्व स्वरातही अस्पष्टसे दुःख होतं.

“चल, द्रौपदी! आपण ऋषी कन्डुमणींच्या आश्रमात जाऊया.” हिडिंबेने द्रौपदीचा हात धरला.

तिने भीमसेनाकडे पाहत रोषाने म्हटले, “मी काही क्षणांसाठी ऋषी कन्डुमणींशी वार्तालाप केल्यानंतर आपल्या पुत्रासह प्रयाण करणार आहे.” असे म्हणून ती द्रौपदीसह निघून गेली. भीमसेनाने हिडिंबेच्या रोषाचा कित्येक वेळा उपशम केलेला असला तरी, या रोषाचा उपशम करणे त्याला शक्य नव्हते.

## द्वितीय बंध

"**मा**ते! हा श्रुतकर्मा किती चपळपणे धावतो आहे. आपण रथाला अश्वाऐवजी त्यालाच जोडूया......"

"माते! हा सुतसोम असाच माझी चेष्टा करत असतो."

"मातेला त्रास देऊ नका. चला, गदायुध्दास प्रारंभ करु."

"माते! हे पहा, शतानीकानं कसलं पुष्प आणलं ते!" "अरे, हे तर पारिजातकाचे दिव्य पुष्प आहे. "

"माते! हे पुष्प तू केशांत माळ."

"अर्थातच तुला हे पुष्प अत्यंत शोभून दिसेल."

"अरे, नाही! या सुतसोमाने पुनः मोत्यांची माला तोडली!"

"माते! या सुतसोमाला चांगलीच शिक्षा दे. माझी चेष्टा करतो कसा!"

"अरे, थांबा. सर्वप्रथम भोजन करा. त्यानंतर शस्त्राभ्यास करा, पुत्रांनो!"

"माते! मी तुझ्या केशांत हे पुष्प माळतो."

"माते! तू खूप सुंदर दिसतेस, ही पुष्पे माळल्यानंतर!"

"तुम्हीदेखील अतिशय सुंदर दिसता, अगदी माझ्याप्रमाणेच!" त्यानंतर तिचं अत्यंत समाधानकारक संतोषपूर्ण स्मितहास्य. पाचही पुत्रांना एकत्र आलिंगन.

"ज्येष्ठ माते! आम्हांलाही पायास दे."

"अवश्य, माझ्या पुत्रांनो!"

सपत्नींच्या पुत्रांचेही हट्ट. त्यांनाही प्रेमाने जवळ घेणे.

विशेषतः तो बालक अभिमन्यू. सुभद्रेची हुबेहूब गौरवर्णीय प्रतिकृती, अर्जुनाचे लक्ष्यभेदी डोळे अन् कृष्णाचे अवखळ हास्य उतरलं होतं त्याच्यात! त्याकारणे तिला तो सर्वांत अधिक प्रिय होता.

याशिवाय सहदेवाची पुत्री – 'होत्रवाहिनी' – ती सुंदर कन्याही तिला विशेष प्रिय होती.

त्याचं कारण तसंच होतं, इतक्या सर्व पुत्रांनंतर त्या कन्येचा जन्म झालेला होता. पाण्डुकुलात इतक्या वर्षांनी एका कन्येची पावलं खेळली होती, लक्ष्मीची पावले उमटलेली होती. राजमाता कुंतींनाही कोणी पुत्री नव्हती. वंशवर्धन व राज्यविस्ताराकरिता त्यांनी फक्त पुत्रांची अपेक्षा केली होती.

मात्र कृष्णाला अनेक कन्या आहेत, तसेच मामाश्री वसुदेवनादेखील दोन-तीन पुत्री आहेत.

कृष्णाच्या पुत्रींवरून आठवलं, कित्येक दिवस झाले, केशव आपल्याला भेटायला आला नाही.

" कृष्णे, सखे......" त्याचा नि:शब्द स्वर तिच्या कानी पडला.

"सख्या! तुला निरवतेतही संवाद करता येतो तर! मला ज्ञात आहे."

"तुझी इच्छा लवकरच पूर्ण होणार आहे. मी, तुझी भगिनी- सुभद्रा व तुझा पुत्र- अभिमन्यूही तुला भेटणार आहे, सखे..."

" खरोखरच?" तिचा प्रश्न.

नि:शब्दतेतही त्याचा स्पष्ट होकार.

"नीलांगिनी! माझा कंठ शुष्क पडला आहे." तृष्णेची जाणीव होऊन नकुलाने पांचालीला आज्ञा दिली, "मला जल दे."

तशी पहुडलेल्या पांचालीची तंद्री भंगली. "आज्ञा, आर्य!" असे म्हणत पांचाली नकुलाच्या जलपानाची व्यवस्था करू लागली. तिला हिडिंबेच्या प्रयाणाचा वृत्तांत तीव्रतेने स्मरला.

ज्या क्षणी ऋषी कण्डुमणीशी काहीसा वार्तालाप झाल्यानंतर हिडिंबा आपल्या पुत्रासह- घटत्कोचासह आपल्या निवासस्थानी वायुवेगाने परतत होती, तत्क्षणी तिच्या अन् भीमसेनाच्या नेत्रांत वैषम्य व एका प्रकारचे भावनिक दुखरेपण होते. इच्छा असूनही द्रौपदी त्या उभयंतांमधील तेढ / अंतर दूर करू शकली नाही. किंबहुना तिने तसे प्रयास केलेही नाही. कारण पती-पत्नींमधील तेढ कालांतराने दूर होतेच,

त्या उभयंतांमध्ये हस्तक्षेप करता कामा नये, हा तिचा स्वतःचा अनुभव व मत होते. तिचे पती नि तिच्या नातेसंबंधातही वस्त्रहरणानंतर जे अंतर निर्माण झाले होते, काही काळानंतर ते अंतर मिटले होते.

“नीलांगिनी! जल...... तू अजूनपर्यंत जल आणलं नाहीस? मला सत्वर जल दे.” नकुलाच्या शब्दांनी पुनः पांचालीची तंद्री भंगली.

“आणते हं.”असे म्हणून द्रौपदीने त्याला जल दिले.

“सख्याला भेटण्याची मला प्रकर्षाने इच्छा झाली आहे.” द्रौपदीने त्याच्या हातातून जलपात्र घेत म्हटले.

“मला नाही वाटतं, कृष्ण आपल्याला भेटू शकेल, द्रौपदी!”

“का, आर्य?”

“पांचाली! कृष्णाचे सर्वांत अधिक सख्य अर्जुनाशीच आहे आणि अर्जुन तर तपश्चर्येला गेलाय. त्यामुळे कृष्ण आपल्याला भेटू शकणार नाही.”

“आर्य, त्याने मला स्वतःहून सांगितले होते की तो सुभद्रा, अभिमन्यूसह मला भेटणार आहे.”

“कधी, पांचाली?”

“अगदी आत्ताच.”

“काहीतरीच! अगं, हे कसं शक्य आहे?त्याने कसे सांगितले? येथे नसतांही?’’

“आर्य, कृष्ण कुठे नाही, हे सांगा. कृष्ण यत्र तत्र सर्वत्र आहे. याशिवाय तो आपल्या सखीशी निःशब्दतेतही संवाद साधू शकतो!”

“नि:शब्दतेतही संवाद साधणे कसे शक्य आहे? संवादाकरिता शब्द आवश्यक असतात, पांचाली.”

“आर्य, दैहिक संभाषणाकरिता शब्द आवश्यक असतात. मात्र आत्मिक तसेच मानसिक स्तरावरील संवादाकरिता आत्मसंलग्नतेची आवश्यकता असते. मनाची सूत्रे जुळल्यानंतर शब्दांविनाही संवाद करता येतो.”

“विदुषी आहेस तू, परंतु माझ्याइतकी नव्हे. कारण मी तुझं हे उत्तर आधीच जाणलं होतं.”

“आर्यपुत्र! आपणही ना.... अजूनही तसेच आहात.” द्रौपदीचा स्वर लाडिक होता.

“अस्सं! आता सांग मला, या सुभाषिताची समस्या-पूर्ती तू कशी करशील? मृगात् सिंह पलायेत्।। सिंह मृगापासून दूर पळाला? का व कसा?” नकुलाने तिचे अनुरंजन केले.

“अ.....” द्रौपदी विचारांत पडली. हे कसं शक्य आहे? सिंह आपला मूळ गुणधर्म- पराक्रम अथवा मृगया विसरला का? की त्याची

काहीतरी योजना होती का? तो मृगापासून दूर का पळाला? मृगांच्या समूहाने त्याला वेढले होते का?

“कालांतराने उत्तर दे. आत्ता सध्यातरी माझे चरण चुर. मला उत्तम निद्रा लाभेल.”

“परंतु या समस्येचे उत्तर आपणांस ज्ञात आहे का?”

“नाही, तेच उत्तर शोधण्याचा प्रयत्न चालू आहे.”

द्रौपदीला वाटले, सखा येथे असल्यास, त्याने क्षणार्धात समस्यापूर्ती केली असती, नाही का?

**ती**र्थयात्रेची अनेक क्षेत्रे पांडव- द्रौपदी पार करत होते. भागीरथी कुंड, नंदा-अलकनंदा, विश्वामित्रांचा आश्रम, कौशिकी कुंड, ऋषी कश्यप तसेच ऋषीशृंगाचे आश्रम, हेमकूट पर्वत इत्यादी तीर्थक्षेत्राचे मनोभावे दर्शन घेऊन पांडवांनी प्रभासक्षेत्राकडे प्रवास करण्यास आरंभ केला.

प्रभासक्षेत्र हे कुरुक्षेत्राप्रमाणेच पुण्यतीर्थ. त्या पवित्र तीर्थस्थानी जप-तप, अनुष्ठान केल्यास ते सफल होते अशी कीर्ती होती त्या मोक्षद तीर्थस्थलीची.

त्याच तीर्थस्थलीवर पांडव अन् त्यांच्या प्राणतमेचे- पांचालीचे प्रथम पाऊल पडले. तत्क्षणी प्रत्येक पांडवाला- पांचालीलाही अर्जुनाचे तीव्रतेने स्मरण घडले. तो कदाचित आपल्यासह या स्थानी असता तर, त्याने त्याच्या व सुभद्रा- चित्रागंदेच्या प्रथम भेटीचा वृत्तांत निश्चित सांगितला असता.

"प्रियजनांचे स्मरण घडवणारी क्षेत्रे आपल्याला संयतपणे पार करावी लागतात. कधी मनोभूमीवर तर, कधी तीर्थभूमीवर, राजा युधिष्ठीरा!" लोमश ऋषींच्या शब्दांकारणे सर्वांची विचारधारा खंडित झाली.

"गंगेत स्नान करुनही आमच्या पापांचे क्षालन झाले नाही, आमचा विचार असा आहे की या प्रभासक्षेत्री मधुविलेत स्नान करुन पापमुक्ती करावी." युधिष्ठिराने भीमाकडे पाहत म्हटले.

"राजा, तू कुबेराच्या यक्षसैनिकांच्या व राक्षसांच्या संहाराच्या पापाविषयी बोलतो आहेस ना? ते पाप नव्हते, ते पुण्य होते." शौनकऋषींनी आश्चर्यकारक स्पष्टीकरण दिले, "कुबेर एकदा आपल्या यक्षराक्षसगणांसह अगस्त्य ऋषींच्या आश्रमाजवळ विपश्यंती नदीच्या

तीरावर जलविहाराकरिता गेला असता, त्याच्या यक्षराक्षसांनी उन्मादाच्या भरात अगस्त ऋषींच्या यज्ञात वारंवार विघ्न आणले. त्यामुळे त्यांनी त्या यक्ष- राक्षसांना शाप दिला, "सेवा कर्तव्य /रक्षण कर्तव्ये करत असतांही निष्कारण यक्ष राक्षसांचा संहार होईल, तेही एका मनुष्याकडून." तत्क्षणी कुबेराने त्यांचे चरण धरून अनंत वेळा क्षमा याचना केली, तेव्हा कुठे अगस्त्यांचा क्रोध शांत झाला, "त्या राक्षसांना -यक्षांना त्यांच्या पातकांपासून व तुला तुझ्या पश्चातापापासून मुक्ती तो मनुष्यच देईल आणि महान धर्मात्मांच्या तसेच सर्वयोषिद्वरेच्या चरणांनी तुझी सरोवरस्थली पावनही होईल."

"त्याकारणेच धर्मराजा! कुबेर तुम्हा सर्वांना - द्रौपदीला सत्कृत करू पहात होता. तो आणि त्याचे यक्ष-राक्षसगण त्या पातकांपासून मुक्त झाले आहेत." धौम्य मुनींनी म्हटले.

"त्या घटनेचे स्पष्ट कारण सांगितल्याबद्दल धन्यवाद ऋषिवर! त्या कारणे माझ्या मनावरचा पश्चातापाचा भार कमी झाला. खरंतर मीच पश्चातापाने अधिक ग्लांत झाले होते." द्रौपदीला मुक्ततेची जाणीव झाली.

"द्रुपदराजकन्ये! आता तुझ्या मनावरील पश्चातापाचा भार घटला, मात्र तुझा आनंद वृद्धिंगत करणारे वृत्त मी सांगतो." लोमशमुनींनी म्हटले.

“ते वृत्त आमच्या अर्जुनांविषयी आहे का?” द्रौपदीने आत्मीयतेने विचारले. मात्र तिने ‘माझ्या’ या शब्दाचा प्रयोग टाळला होता, हे चारही पांडवाच्या लक्षात आल्यावाचून राहिले नाही.

“अर्जुन निश्चितच इंद्रभवनी स्वर्गीय सुखे उपभोगत असेल, आम्हा सर्वांचे त्याला विस्मरण घडलं असेल ना!” युधिष्ठिराने म्हटले.

“तो खरंच अमरावतीत आहे का?”भीमसेनाचा प्रश्न

“त्याला दैवी अस्त्रांची प्राप्ती झाली आहे का?”नकुलाची उत्सुकता अर्जुनाच्या गांडीवच्या प्रत्यंचेपेक्षा अधिकच ताणली होती.

“तो उर्वशी, मेनका, रंभा अशा देवांगनांसह गांधर्ववेदाचे प्रशिक्षण घेतो आहे ना?” सहदेवाने द्रौपदीकडे पाहत नेत्रपल्लवी केली.

ते ऐकून द्रौपदी संभ्रमित झाली. हे काय मध्येच गांधर्ववेदाचे प्रशिक्षण? धनंजय तर दैवी अस्त्रांच्या प्राप्तीकरिता तसेच धनुर्वेदार्जनाकरिता गेले आहेत ना!तर गांधर्ववेदाच्या प्रशिक्षणाचे काय औचित्य?

“ऋषिवर, आर्यपुत्र सहदेव म्हणताहेत, ते सत्य आहे का?” द्रौपदीने लोमशऋषींना पृच्छा केली.

“सहदेवाचे शब्द त्रिकालसत्य आहेत. पार्थ आपल्या पित्याच्या-इंद्राच्या आज्ञेनुसार इंद्रभवनी निवास करत असून तो तुमच्या विरहाकारणे खंडित चन्द्रकलेप्रमाणे झाला आहे. तुम्ही या प्रभासक्षेत्री

त्याच्या पीडानिवारणाकरिता ‘दुःखसंहारक’ अनुष्ठान करा.” असे म्हणून लोमशमुनी द्रौपदीकडे वळले, “तुला ज्ञात असेलच, पांचालराजनंदिनी! अर्जुनाला गांधर्व वेदात विशेष रुची आहे.”

त्याचे ते शब्द ऐकून द्रौपदीला इंद्रप्रस्थातील तो सुखद काळ आठवला. ज्याक्षणी वाणाचे वादन करत अर्जुनाने द्रौपदीकडे प्रेमाने पहात अनुरक्त काव्यपंक्ती गायल्या होत्या,

“*नेत्रौ यस्या सुन्दरौ, सा वरवर्णिनी |*

*सा सस्यश्यामला, मित्रा कृष्णस्या च मे संड्गिनी ||*

*सा अस्माकना प्राणेशा |*

*याम् प्राप्तुव्यम् वयम् च द्वेषे ज्वलिताः नैका नरेशाः||*”

आपल्या दुर्भाग्याने व त्या अप्सरांच्या सुभाग्याकारणे ते सुस्वर आपल्या नव्हे तर, त्या देवांगणाच्या कर्णपटलांना प्रसन्नता देत आहेत.

द्रौपदी अत्यंत खिन्न झाली.

“तर राजकन्ये, म्हणूनच त्याच्या आनंदासाठी त्याची विरहपीडा दूर करण्यासाठी इंद्राने गांधर्ववेदाची व्यवस्था केलेली आहे.” लोमशऋषींच्या शब्दांनी द्रौपदीचे मनपरिवर्तन झाले. अर्जुनांचे दुःख दूर करण्यासाठी जर इंद्रदेवांनी ही योजना केली असेल तर, या दुःखमयी परिस्थितीत त्यांना काहीशी प्रसन्नता मिळू दे.

“महर्षी, तुम्ही कितीही कारणे द्या, तरीही अर्जुनाचे व इंद्राचे हे आचरण उचित नाही. एकतर आम्ही तसेच आमची अर्धांगिनी पांचाली कष्ट सोसत हे वनवासी जीवन जगत आहोत, याशिवाय द्रौपदीही व्रतस्थ राहून सर्व सुखांना- उत्तम वस्तूंच्या उपभोगाला तिलांजली देत आहे, तर अर्जुन स्वर्गात सुखविलासांचा उपभोग घेत देवांगनांसह गांधर्ववेदाचे प्रशिक्षण घेत आहे, हे न्यायोचित आहे का?” भीमाने क्रोधाने म्हटले.

“मला कसा म्हणाला तो, वनकन्येशी विवाह करू नकोस! स्वतः मात्र अप्सरांसह नृत्य-गायन करत आपला अधिकाधिक समय व्यतीत करत आहे?” नकुलाच्या मनात अर्जुनाविषयी मत्सर जागृत झाला.

“मला वाटतं, अर्जुन आपल्या परमध्येयापासून परावृत्त होता कामा नये. इंद्रानेही आपल्या पुत्राला अत्याधिक विलासी, भोगी व स्त्रीरमण बनवता कामा नये. अर्जुन केवळ इंद्राचा पुत्र, पाण्डुपुत्र, आम्हां पांडवांचा भ्राता, द्रौपदीचा प्राणेश अथवा कृष्णाचाही सखा नव्हे तर, तो धर्मसंस्थापना व दुष्टसंहाराकरिता बाध्य असलेला वीरपुत्र तसेच लोककल्याणार्थ जन्मलेला नरऋषींचा अवतार आहे. हे त्याने सदैव लक्षात ठेवायला हवे. याशिवाय द्रौपदीचे प्रताडन त्याच्या स्मरणात असायला हवे. अन्यथा तो स्वर्गात निवास करून आम्हांलाच नव्हे, तर समस्त जगतालाच विसरेल. ऋषीवर, मी जे जे काही बोललो, ते तुम्ही इंद्रभवनी प्रयाण करुन अर्जुनास कथन करावे.” सहदेवाने आपला संदेश

पूर्णपणे कथन केला, "अर्जुनाने निदान आमची नाही तरी, त्या कौरवांची नि कर्णाची आठवण सदैव ठेवावी, इतकीच आम्हा पांडव- पांचालीची अपेक्षा आहे." सहदेव उद्वेगाने द्रौपदीचा बाहू धरत म्हणाला. त्याच्या स्वरात तीव्र असंतोष व उपरोधही होता.

सहदेवाच्या शब्दांशी द्रौपदी सहमत झाली. केवळ अर्जुनाने नव्हे, तर अन्य पांडवांनीही आपल्या परमोद्दिष्टापासून वंचित होता कामा नये.

मात्र तिला सहदेवाच्या शब्दातील कटुता व उपरोध रुचला नाही. परंतु एखाद्या व्यक्तीच्या हृदयातील वन्ही चेतविण्यासाठी अशा औपरोधिक अन् असंतोषपूर्ण भाषेचा उपयोग करावा लागतो. त्याशिवाय ती व्यक्ती पेटून उठत नाही, अधिक संवेगाने कार्य करत नाही. सहदेवाप्रमाणे तिची हीच तत्त्वप्रणाली होती.

"**ही**च ती मधुविला अर्थात समंगा नदी! या नदीच्या पात्रातच प्रवेशूनच सती सुकन्येच्या पतीला- च्यवनभार्गवास सुंदर व तेजःपुंज युवकाचे रूप लाभले होते व त्यांना पूर्वीच्या उत्साह, ऊर्जा देणारी औषधी- ' प्राश' अश्विनीकुमारांनी या नदीच्या तीरावर दिली होती. त्या

औषधीने तसेच नदीनेच च्यवनाला त्याचे नेत्र अन् यौवन परत दिले होते. याशिवाय याच नदीत किशोर अष्टावक्रास आपले अव्यंग रुप प्राप्त झाले होते. कदाचित या नदीत तुम्हाला तुमचे तेज पुन: लाभेल. अन् पांचालकन्ये! तुझीही शक्ती अधिक वृद्धिंगत होऊ शकेल.'' लोमशऋषींनी त्या स्थानाची महती सांगितली, ''ही मधुविला नदी नर्मदेचा एक स्त्रोतच मानला जातो.''

पांडव- द्रौपदीने त्या नदीत स्नान केले अन् त्यांना खरोखरच शक्ती- सत्त्व- तेज प्राप्त झाल्याचा आभास झाला.

''आपण सर्वांनी काही दिवसांकरीता नरनारायणांच्या आश्रमात- तो आश्रम सध्यातरी रिक्त आहे - आणि राजर्षी वृषपर्वाच्या आश्रमात निवास करा. धौम्य तसेच शौनकऋषी- तुमचे राजगुरू व राजपुरोहित तुमचे मार्गदर्शन करतील. मी सहदेवाचा संदेश घेऊन पुन: अर्जुनाकडे इंद्रभवनी प्रस्थान करतो.'' लोमशऋषींनी सर्वांना आशीर्वाद देत निरोप घेतला.

लोमशऋषींनी अमरावतीकडे प्रयाण केल्यानंतर पांडवांनी नर - नारायणाच्या आश्रमात प्रवेश केला.

आश्रमात पालापाचोळा, धूलीकण, जाळी, निर्माल्य होते. द्रौपदीने संपूर्ण आश्रमाची स्वच्छता केली. नकुल-सहदेवांनी पुष्पलतांनी

आश्रमास सुशोभित केले. भीमाने काष्ठांची योजना केली. धौम्य-शौनक ऋषींनी यज्ञकुंडाची व यज्ञवेदीची निर्मिती केली.

आश्रमाची पुरेशी स्वच्छता झाल्यानंतर तसेच वस्तू मांडून झाल्यानंतर पांण्डुपुत्रांनी आपल्या सहधर्मिणीसह यज्ञाच्या तसेच व्रताच्या अनुष्ठानाचा संकल्प धारण केला व तप आरंभ केले.

त्यांच्या कठोर तपाची ती वार्ता आपसूकच वणव्यासारखी सर्वत्र पसरली. यादवांच्या राज्यसभेपर्यंत ही वार्ता पोहोचली.

ती वार्ता ऐकून कृष्ण आपल्या आसनावरून तसाच ताडकन उठला आणि लगबगीने रथागाराकडे निघाला. त्याला तसं त्वरेने सभात्याग करताना पाहून यादवांचे अग्रणी- सात्यकी, कृतवर्मा व यादवांची राजपुत्री- सुभ्रदेनेही आपल्या किशोर पुत्रासह सभेतून रथागाराकडे प्रयाण केले.

"काय झालं, भ्रात्या?" सुभद्रेच्या प्रश्नाला उत्तर न देता कृष्णाने दारूकाला तसेच चारुमतीला सर्वांचे रथ सज्ज करण्याची आज्ञा दिली.

"केशवा, तू चारुमतीला रथ सज्ज करायला का सांगितलास?"

"पांडवाच्या श्रमाचा- दुःखाचा परिहार करण्यासाठी आपल्याला लवकरात लवकर प्रस्थान करायचे आहे. मी सखी द्रौपदीला तसे वचन दिले आहे." कृष्ण आपल्या रथावर चढला व त्याने सुभद्रेला रथावर चढवण्यासाठी हात दिला.

सुभद्रा अभिमन्यूसह कृष्णाचा हात धरून रथात चढली. अन् तिला आठवले, याच रथात अर्जुनाने तिचे हरण केले होते, तेही यादवांचे सेनापती चेकितान सात्यकी व हार्दिक्याच्या सहाय्याने. यादवांच्याच राजकुमारीविरुद्ध इंद्रप्रस्थाच्या राजपुत्राला त्यांनी हात मिळवला होता, तेही आपल्या भ्रात्याच्याच सूचनेनुरुप.

सर्वप्रथम तिला हे अपहरण मान्य नव्हते, मात्र नंतर तिने त्या अपहरणाला संमती दिली. कारण जर आपला विवाह आपल्या आतेभावाशी- अर्जुनाशी झाला तर, आपल्याला पृथाआत्या, अन्य पांडवबंधू व भानुमतीसारख्या यादवकुलीन भगिनीच्या रूपाने जणू मातृगृहच पुनर्प्राप्त होईल अशी तिची बाल्यसुलभ कल्पना होती. तसं म्हणजे, युक्त-अयुक्ताचा विचार करण्याइतकी तेव्हा ती अनुभवी नव्हती, विचारीही नव्हती.

मात्र देवी द्रौपदी- भ्राता कृष्णाची सुप्रिय सखी रुष्ट होईल, याची जाणीव कुणालाच नव्हती. अर्जुनांनी आपल्यालाच सर्वप्रथम इंद्रप्रस्थात पाठविले, गोपवेश धारण करण्याची आज्ञा देत त्यांनी म्हटले होते, ”मी द्रौपदीची दासी आहे अशा मधुरभाष्याने द्रौपदीचे हृदय जिंकून घे.”

मला तर आश्चर्य वाटलं होतं, द्रौपदी देवी भ्रात्याची जीवकंठश्च सखी असूनही तिचा आमच्या विवाहाला आक्षेप का होता? तिचा आमच्यावर

रोष का होता? तिला असे वाटले होते का, माझ्याशी विवाह झाल्यानंतर अर्जुन तिच्याकडे लक्ष देणार नाहीत?

फक्त मला याच बाबीचा विस्मय वाटला नव्हता, तर अजून या संयोगाचाही विस्मय वाटला होता. द्रौपदी देवींच्या इतर चार पतींनी अर्जुनांपूर्वी अन्य विवाह केले होते, मात्र तिने त्यांच्यावर रोष धरला नाही. असे का?

याशिवाय एखाद्या राजाने अनेक स्त्रियांना जिंकून गृहात आणले तरी, पट्टराणी राजधर्मानुसार- तथाकथित परंपरानुरूप त्यांच्याबाबत आक्षेप घेऊ शकत नाही. परंतु द्रौपदीदेवींनी रोष धरला होता नि अर्जुनांना व मला तिचा रोष अखेर दूर करावा लागला होता.

मात्र तिने किती सहजतेने आपल्याला भगिनीरूपात स्वीकारले! तसं पाहता, आमच्या वयात, वैचारिक, बौद्धिक स्तरांमध्ये अत्याधिक भेद होता. देवी द्रौपदी अत्यंत श्रांत झाल्यानंतर आपल्या कक्षात यायची अन् आपल्यासह गुज करायची. म्हणायची, ''तुझे निश्चल मन अन् निर्मळ वाणी माझ्या श्रमांचा, कष्टांचा परिहार करते.''

आपण पाहत होतो तिची सुचारू कार्यक्रमणा! आपण सहजपणे सेवाभावाने विचारले, ''देवी, मला काहीतरी कार्य दे. जेणेकरून तुझ्या कष्टाचा भार घटेल, भगिनी.''

यावर अर्जुनांनी हसून म्हटले होते, “तू काहीच कार्य करु नकोस, हेच कार्य कर.”

“मला कुठलंच कौशल्य येत नाही, असे समजू नका, आर्य! मला उत्तमोत्तम आभूषणे निवडता येतात.” आपण अभिमानाने म्हटलं होतं. आपल्या या शब्दांवर अर्जुनांसह बंधू माद्रेयही हसले होते.

“खरंच? तू नियमितपणे माझ्याकरिता, राजमाता व अन्य पांडव स्त्रियांकरिता उत्तम तसेच यज्ञादि देवकार्यांकरिता शोभणारे अलंकार निवडून दे. कार्यव्यस्त असणाऱ्या माझी नि अन्य सपत्नींची चिंता मिटली.” देवी द्रौपदीने आपल्या या ‘कौशल्याचा’ उत्तम उपयोग केला होता.

पूर्वीच्या स्मृतींनी सुभद्रेच्या गडद गुलाबी अधरांवर हास्य उमटले, परंतु आता तरी सुखाचे विशेष क्षण उरले नाहीत.

ज्याक्षणी देवी द्रौपदीचे वस्त्रहरण घडले, त्याक्षणांपासून खरोखरच आनंद, सुख, भाग्य तसेच वैभव पांडवपरिवारापासून विभक्त झाले.

सुभद्रेचे किरिमिजी नेत्र भरून आले, त्या स्मरणमात्रेही! कृष्णाने तिच्या नेत्रांतील अश्रू पुसले, ”अनुजे, काय झालं? हा शोक का? हे दुःख का?”

“भ्रात्या, तू जाणतोसच ना? पांडवांवर ही वनवासाची आणि देवी द्रौपदीवर अपमानाची विपत्ती कोसळल्यापासून पांडूपरिवार पूर्णतः

विभाजित झालेला आहे. मला माझ्या कुटुंबापासून विभक्त होऊन द्वारकेत निवास करावा लागतो, याचेच दुःख होत आहे.”

“का?अर्जुनाचा विरह सहन होत नाही का?”

“मला अर्जुनांपेक्षा मला अधिकतम आत्या, अन्य पांडव बंधू व देवी द्रौपदीचे प्रकर्षाने स्मरण घडते. आत्याची ममता अन् देवी द्रौपदीच्या साहचर्ययुक्त प्रेमाकरिता मी अधीर झाले आहे, भ्रात्या!”

“तेही प्रेम तुला लाभेल, सुभद्रे. प्रतीक्षा कर.”

“अवश्य, बंधो केशवा!”

“**आर्य**! आज केशव येणार आहे.”

“हे तुला कसं कळालं? इंद्रसेनाने तुला काही वार्ता दिली का?”

“नाही, आर्यपुत्र युधिष्ठिर! माझं- त्याचं सख्य इतकं पुरातन, अखंड व अतूट आहे की त्याच्या आगमनाचा मला आभास होतो, पावले कितीही कोसो दूर वाजत असो.” द्रौपदीच्या प्रत्यक्ष शब्दांना तिच्या हृदयंगताने मनोमन सहमती दर्शवली, ’’ज्याप्रमाणे त्याच्या आगमनाचा आभास होतो, त्याचप्रमाणे त्याच्या सख्याचीही पावले स्वर्गातून भूमीवर पडण्यापूर्वीच तुझ्या मनोभूमीवर उमटतील.”

तिने त्या हृदयंगतास संयत केले आणि नित्यकर्मे करण्यास प्रारंभ केला.

“पांचाली, काही रथ प्रभासक्षेत्रात प्रवेश करताहेत. ते यादवांचे असावेत, अशी वार्ता मित्रसेनाने दिली आहे.” भीमसेन उत्तरीयाने आपला स्वेद पुसत म्हणाला.

“इंद्रावती, पत्रावळयांची व्यवस्था कर, मी भोजनाची व्यवस्था करते.” द्रौपदीने विस्तवात काष्ठे घालत म्हटले, “आज विशेष भोजन केले पाहिजे, माझी भगिनी सुभद्राही येणार आहे, माझ्या पुत्रासह.”

“काय, सुभद्राही येणार आहे?” सहदेवाने टाक दौतात बुडवला व पुनः ‘अग्निस्त्रोता’च्या लिखाणास आरंभ केला.

“कदाचित नीलांगिनीला हे सर्व पूर्वीच ज्ञात असेल, तिचं आपल्या गुप्तचरांवर आपल्यापेक्षा अधिक नियंत्रण आहे.” नकुलाने भोजपत्रावरील सालीचा भाग छाटत म्हटले.

“गुप्तचर केवळ स्थलीची वार्ता देऊ शकतात, अंतरीची वार्ता नव्हे, आर्य!” द्रौपदीने खीरीमध्ये मंजिरी घालत म्हटले.

“वा! तू माझं सुप्रिय मिष्टान्न- खीर करते आहेस.” भीम तर भोजन करण्याच्या सज्जतेतच पाटावर आसनस्थ झाला.

“आह! ” पांडवांना आश्रमाचं कवाड करकरल्याचा आवाज आला, “अहाहा! या आश्रमात निश्चितच माझी सखी कृष्णा माझ्याकरिता खीरीसारख्या मिष्टान्नाची व्यवस्था करते आहे!”

युधिष्ठिर लगबगीने उठला व त्याने द्वार पूर्णतः उघडले.

“कृष्णा? रोहिणीनंदना? नि अन्य यादव? अकस्मात् आपण सर्वजण? या प्रभासक्षेत्री?”

“भ्रात्या! हा कुठल्याही प्रकारचा योगायोग नव्हता. राजसभेत असताना मला खीरीचा सुवास आपसूकच आला. त्याकारणे क्षुधा प्रबळ झाली. म्हणूनच प्रवास करून तुमच्या आश्रमात आलो आहे.” कृष्ण क्षणार्धात दुसऱ्या पाटावर जाऊन आसनस्थ झाला.

“कृष्णा, सर्वप्रथम अन्य यादवसह मधुविला नदीवर शूचिर्भूत होऊन ये. त्यानंतर एकत्रित भोजन करूया.”युधिष्ठराने कृष्णाला सूचित केले.

“भ्राताश्री! आपल्या आज्ञेनुसार मी शूचिर्भूत होऊन येतो. पुढच्या वेळेस मात्र मी मुळीच शुचिर्भूत होणार नाही. कारण आश्रमात फक्त द्रौपदी असतानाच मी भोजनाकरिता येईन.” कृष्ण हसत हसत पाटावरुन उठला.

“चला, मी तुम्हा सर्वांना मधुविलेपर्यंतचा मार्ग, तर सुभद्रेला स्नानगृहाचा मार्ग दाखवतो.” नकुलाने कृष्ण- सात्यकीच्या स्कंधावर हात ठेवले.

नकुल- कृष्णासह अन्य यादवांनी मधुविलेकडे प्रस्थान केल्यानंतर द्रौपदीने युधिष्ठिराला म्हटले, “आर्य आपण कृष्णादि यादवांना स्नानाकरिता पाठवलंत, हे उत्तम केलंत. मी पूर्णतः भोजन निर्माण केलेलं नाही. मला काहीच समय हवा होता, तो प्राप्त झाला.”

द्रौपदीने काहीशा प्रमाणातच अन्न बनविले आणि ते सर्व पदार्थ अक्षयपात्रात ठेवले, मंत्रोच्चारण केले.

अन् आश्चर्य काय! ते पदार्थ प्रमाणापेक्षा अधिक वाढले.

“नवलाची बाब आहे! द्रौपदी, तू तर काही क्षणांत अन्न तयार केलेस!” कृष्ण हात धुवून पाटावर बसला.

“यात काहीच आश्चर्य नाही, सखा! मित्रसेना, पत्रावळ्या मांडून ठेव. मी सर्वांना भोजन वाढते.” कृष्णेने मित्रसेनाला आज्ञा दिली.

“द्रौपदी देवी! भगिनी, मला प्रतीक्षा करवत नाही. मला सर्वांत आधी खीर वाढ.” सुभद्रेनेही आसन ग्रहण केले.

“सर्वांना पर्याप्त- पुरेशी खीर वाढते. झाले तर?” द्रौपदीने सर्वांना खीर वाढली.

“द्रौपदीदेवी! आपण स्वतः का तसदी घेता? इंद्रावती अथवा मित्रसेन भोजन वाढेल ना.......” सात्यकीने म्हटले.

“सात्यकी! मी सकुशल आहे. याशिवाय मी या गृहाची गृहलक्ष्मी आहे, गृहिणी आहे. त्याकारणे अतिथींना भोजन वाढणे हे माझं परमकर्तव्यच आहे, त्यांचं आतिथ्य करणे हा माझा गृहिणीधर्म आहे.” द्रौपदीने उत्तर दिले, इतर पदार्थ वाढताना.

“पार्षती! सात्यकी उचित बोलत आहे. तू इतकं भोजन केलेस. तू विश्रांती घेतलीस तर, चालेल.” बलरामाने प्रथमच आत्मीयतेने तिला सूचना केली.

“नाही, बलदेव! मला विश्रांतीची आवश्यकता नाही. कारण अक्षयपात्राने माझं कार्य सुकर केले आहे.” द्रौपदीने बलरामाच्याही पत्रावळीत कंदाचा पाक घातला.

“का रे, रोहिणीनंदना? तुला का इतकी पांचालीची चिंता? यापूर्वी तर कधीच असे कुशलतेने म्हटले नाहीस.” युधिष्ठिराच्या शब्दांत रोष होता.

“तसं नव्हे, भ्रात्या! आता माझं मतपरिवर्तन झालं आहे.” बलरामाने द्रौपदीला कंदाचा पाक अधिक वाढण्याचे सूचित करत युधिष्ठिराला म्हटले.

“ मतपरिवर्तन! बलरामा, हे मतपरिवर्तन कुणाचं झालं आहे? आमच्या मामेभावाचे की दुर्योधनाच्या गुरुचे?” सहदेव क्रोधाने म्हणाला.

“आर्यपुत्र! भोजनसमयी वाद-प्रतिवाद नको. शांतपणे भोजन करा.” द्रौपदीने म्हटले.

तिच्या शब्दांनुसार सर्वजण शांतपणे भोजन करू लागले.

काही क्षणांनी सर्वांचे भोजन झाले.

“कृष्णे! तुझ्या या मुक्त केशांकडे पाहिल्यानंतर ग्लांततंद्री लागून जाते!” द्रौपदीच्या हातातील कलशातील जलाने हात धुत कृष्ण म्हणाला.

हे ऐकल्यानंतर द्रौपदीने स्वतःच्या केसांकडे पाहिले. हे तिचे काळेनिळे केश फक्त केश नव्हते. ते केश म्हणजे तिचं सत्त्व, स्वाभिमान, मान, सन्मान व अस्मिता होते. याशिवाय तिच्या आयुष्यातील प्रणयरम्य आणि सर्वांत घृणित स्मृतीही तिच्या त्या केशांशीच जुळलेल्या होत्या.

युधिष्ठिराचा दृढालिंगनावेळीचा तिच्या केशांवरील घट्ट हात, भीमाचे प्रेमाने- आश्वस्ततेने तिच्या केशांवरून हात फिरवणे, अर्जुनाचे तिच्या केशांतून बोटं फिरविणे, गुंतव्याला हळुवारपणे उलगडवणे, नकुलाचे तिच्या केसांचा मनसोक्त सुगंध घेत राहणं. आणि सहदेव तिच्या केशांच्या बटा तो खेचून त्याच्या बोटांभोवती गोल गोल गुंडाळून

घ्यायचा. म्हणायचा, “तुझे हे केशही माझ्या हृदयाला असेच बांधून ठेवतात.

द्रौपदीला क्षणांत दु:शासनाचा कामुक व हिंस्र स्पर्श स्मरला. आज तिचे केस मुक्त आहेत त्याच्यामुळेच. केशांच्या प्रत्येक बटीला एकत्रित घेऊन व केशांना अर्धवट वळवून त्याने तिच्या केसांना किती जोराचे हिसडे दिले होते, अन् तितक्याच बलाने तिचे केश धरून तिला फरफटतही नेले होते.

आपल्या प्रणयरम्य स्मृतींकारणे ती जितकी पुलकित झाली, त्या घृणित स्मरणांकारणे तितकीच विषण्ण झाली होती.

आर्यपुत्र सहदेव वस्त्रहरणाच्या प्रसंगाविषयी विशेष बोलत नाहीत. ते बोलले असते, तर त्यांनी म्हटले असते, ” तुझे केश आताही आमच्या हृदयाला बांधून ठेवतात, परंतु वेगळ्या प्रकारे!”

“इतकीच जर पीडा होत असेल तर, तू आपली प्रतिज्ञा खंडित करू शकतेस. तू केश बांधून घे.” कृष्णाच्या शब्दांकारणे तिची तंद्री मोडली अन् तिला अत्यंतही क्रोध आला.

तिने एक तीव्र-तीक्ष्ण कटाक्ष कृष्णावर टाकला, “केशवा!” ती कडाडली.

तिच्या या उच्चरवाकारणे युधिष्ठिराला क्षेमकुशल विचारू पाहणारा बलरामही नीरव झाला व तिच्याकडे प्रश्नार्थक दृष्टीने पाहू लागला.

तसेच इतर सर्वांचे लक्ष तिच्याकडे गेलं.

“कितीही पीडा होऊ दे, केशवा! मी हे केश बांधणार नाही. तुला सर्व काही ज्ञात असूनही असा परामर्श देण्याचा अधिकार नाही. कारण माझे केश हे माझा स्वाभिमान, सन्मान तसेच सत्त्वही आहेत. अन् त्यांना झालेला अभद्र स्पर्श --- नाही---- कृष्णा, नाही कितीही पीडा झाली तरी, त्या दुष्टांना दंड प्राप्त झालाच पाहिजे.”द्रौपदी कृद्ध झाली, “ आणि कृष्णा, असा परामर्श तू देतोस तरी कसा? ही अपेक्षा नव्हती तुझ्याकडून.”

“क्षमा कर, सखी, मी तुझा निश्चय जोखून पाहत होतो.”

“केशवा, मी ज्याक्षणी ही प्रतिज्ञा केली होती, त्याक्षणी ही माझा निश्चय अटळ होता. माझा निश्चय आजही तितकाच अटळ आहे, हे तुलाही उत्तमप्रकारे ज्ञात आहे.”

“सखे! तू निष्कारण क्रोध करू नकोस. तुझ्या रुद्रावताराकारणे बिचारी सुभद्रा व किशोर अभिमन्यू भयाक्रांत झाले आहेत.” कृष्णाने द्रौपदीच्या स्कंधास थोपटले.

सुभद्रा व अभिमन्युला भयभीत झालेले पाहून द्रौपदीने स्वतःस संयत केले नि सुभद्रेला आलिंगन दिले.

“भगिनी, तू चिंता करू नकोस. पाण्डुपुत्र अवश्य तुझ्या अपमानाचा प्रतिशोध घेतील.”असा स्वतःच धीर देऊन सुभद्रा स्वतःच अश्रू ढाळू लागली.

“भद्रे, शोक करू नकोस. हेही दिवस सरतील आणि पाण्डवपरिवाराचं भाग्य उजळेल.”

“भगिनी, मला तुझ्या, भ्रात्यांच्या व आत्येच्या सान्निध्यात राहायचे आहे. द्वारकेला मला निवास करायचा नाही. मला अर्जुनांसह- आपल्या परिवारासह राहायचे आहे.”

“सत्य म्हणतेस, अनुजे? तर तू अभिमन्यूसह पाण्डव द्रौपदीच्या आश्रमात निवास करू शकतेस. मी तुला नाही रोखणार.” कृष्णाने म्हटले.

“नाही, मी वनात निवास केला तर, सुकुमार असलेली मी व अभिमन्यू कोमेजून जाऊ.” सुभद्रेने म्हटले, हातांची बोटे एकमेकांत गुंफत.

“त्याहून अधिक महत्त्वाचे म्हणजे अभिमन्यूचं पालन-पोषण तसेच शिक्षण द्वारकेतच संभव आहे.” द्रौपदीने सुभद्रेच्या नेत्रांतील अश्रू पुसले.

“सखे! वनवासातील प्रत्येकच घटनेची वार्ता आम्हांला प्राप्त झालेले नाही. त्याकारणाने घडलेल्या घटनांचा वृत्तांत सांग, म्हणजे

तुम्हाला पुढे काय करायचं आहे, तुमची भावी योजना काय असेल, याबाबत मी मार्गदर्शन करू शकेन." कृष्णाने द्रौपदीला सूचित केले.

"मी सांगतो." असे म्हणून युधिष्ठिराने जटासूर-किर्मिरवध, अर्जुनाची तपस्या, स्वर्णकमळांपायी झालेला कुबेरसैन्याचा संहार, तीर्थयात्रा, तीर्थयात्रेत आलेली संकटे, त्याकारणे द्रौपदीला झालेली पीडा, घटोत्कचाची सहाय्यता इत्यादी घटनांचा वृत्तांत कथन केला.

त्या घटनांचा वृत्तान्त ऐकून बलराम दुःखी झाला व लज्जितही. त्याला वाटले, आपण पाण्डवांना निष्कारण दोष दिला. दुर्योधनाने- आपल्याच शिष्याने त्यांना सपत्नीक इतक्या घोर विपत्तीत, कष्टांत, यातनांत लोटून दिले आहे.

पांडव धर्माचारी आहेत; तर दुर्योधन अधर्मी, अशी सर्वमानसमान्य समज बलरामाच्याही मनात निर्माण झाली. ती समजूत फार काळ टिकणार नाही, बलभद्राच्या हदयातील दुर्योधनाचे स्थान अढळ आहे. पाण्डवांचे दुःख- त्यांच्याप्रति दुर्योधनाने केलेले अन्यायही त्यांचे मनपरिवर्तन अधिक काळापर्यंत करू शकत नाही, हे कृष्ण पूर्णपणे जाणून होता.

"ऐकलंस, भ्रात्या? दुर्योधनाने पांडव- द्रौपदीवर किती अन्याय, अत्याचार केलेत, अन् तू त्यांची स्तुती करत राहा! म्हणजे जर दुर्योधनाने पाण्डवांना पुनः पुनः विष चारले, त्यांना जाळून मारण्याच्या पुनः पुनः

प्रयत्न केला, त्याने द्रौपदीचा पुनः पुनः अवमान केला, तरी तू त्याला म्हण, ''तू जे जे केलंस, ते नीतिमत्तेला, धर्माला धरून होते, दुर्योधना.'' कृष्ण बलरामाच्या जिव्हारी लागेल असं बोलत होता.

"नाही, असं नाही, केशवा!" बलरामाच्या मनातील सर्व काही ढवळून निघालं, ''क्षमा कर, भ्रात्या युधिष्ठिरा! कृष्ण सत्य काही ते बोलला. तू धर्मनिष्ठ असूनही तुझे भ्राते- पत्नी सद्गुणी असूनही वनवासात दुःखकष्टाने दिवस कंठत आहेत आणि तो अधर्मी तुम्हा सर्वांचंच ऐश्वर्य तसेच सम्राटपद उपभोगतो आहे. कोण म्हणेल, धर्माचारणाने ऐहिक कल्याण होते व अधर्माचारणाकारणें नाश होतो? तुम्ही सर्व जणांनी धर्म व सत्याकरिता सत्ता, सुख अन् संपत्तीचा त्याग केला आहे. परंतु त्या दुष्ट दुर्योधनाने सत्ता- सुख तसेच वैभवासाठी धर्म- सत्याचा एव्हानाच त्याग केलेला आहे. त्यामुळेच आपणांसारखे धर्मचारी वनवासात वणवण भटकण्यासाठी प्रवृत्त झाले आहेत. त्या धृतराष्ट्राने पूर्वजन्मी काय पाप केले, हे देवासच ज्ञात! म्हणूनच या जन्मी तो जन्मांध व पुत्रमोहाकारणे अंध झाला. पाण्डवांसारख्या सदाचारी व्यक्तींना त्रस्त करून दुर्योधनाला पुनर्जन्मी कोणते कष्ट झेलावे लागतील, याची त्याला कल्पना आहे का?"

"पुनर्जन्मी? यदाकदाचित दुर्योधनादि दुष्टांचा संहार करण्यासाठी पाण्डवांना- द्रौपदीला वारंवार जन्म घ्यावे लागतील तर, तो धर्माचा

पराजय मानला जाईल. म्हणजे याचा अर्थ दुष्टांना अधिक अधर्म करण्यासाठी प्रोत्साहित करणे हाच होतो ना?" द्रौपदीने बलरामाला विचारले.

"पुनर्जन्मी नव्हे, याच जन्मी त्या कौरवांना आपल्या कर्मांची फळे भोगावी लागतील." भीम मुष्टी आवळत म्हणाला.

"भ्रात्या भीमा! कशाला बलरामाला दुखावतोस? तो कदाचित पुनर्जन्मीच दुर्योधनाला दंडित करणार असेल. काय करणार, या जन्मी तरी दुर्योधन त्याचाच शिष्य आहे." नकुलाने नाक मुरडले.

"असो, कुणाच्यातरी मनात पाण्डवांविषयी सदिच्छा उद्भवली, हीच पांडवांकरिता पुरेशी सांत्वना आहे अन्यथा त्यांना एकट्यानेच संघर्ष करावा लागत आहे, हेच प्रखर सत्य आहे ना?" सहदेवाने आपले लिखाण कार्य थांबवले आणि बलरामाच्या खांद्यावर हात ठेवला, "रोहिणीनंदना! हे विश्व नश्वर आहे अन् हे कालचक्र शाश्वत. या विश्वातील प्रत्येक जीव, तू, मी, तुझा भ्रातादेखील कृष्णही कालचक्रात मिसळून जाणार आहेत. या कालचक्रात आमच्या पीडांचा- यातनांचा तसेच तुझ्या दुर्योधनाप्रतिच्या सदिच्छांचाही अंत होणार आहे. तर तू आत्ताच दुर्योधनाप्रति असलेल्या सदिच्छांचा त्याग केलेला श्रेयस्कर."

"अतिउत्तम, सहदेवा! तत्वज्ञानाकडून तू सरळ राजनीतीवर आलास!" कृष्ण मनोमन म्हणाला.

"कधी नव्हे, ते आज सूर्य पश्चिमेकडे उदित झाला आहे. बलराम आज अत्यंत शुभ आणि हितकर बोलत आहे." सात्यकी बलरामाची स्तुती करत होता की निंदा, हे कळायला मार्ग नव्हता, "पाण्डुपुत्रहो! मी माझ्या मनीचा विचार सांगतो. मी, कृष्णाचे पुत्र-सांब, प्रद्युम्न, कृतवर्मा, हार्दिक्य आणि कृष्ण- बलराम आपल्या वृष्णी , अंधक, दाशार्ह सैन्यासह तत्काल हस्तिनापुरावर आक्रमण करुया. आपल्यासह अर्जुनपुत्र अभिमन्यु येईल, त्यालाही युद्धाचा अनुभव घेऊन दे."

"तू हे काय बरगळतोस? सात्यकी, माझा पुत्र अजूनपावतो किशोर आहे, त्याला युद्धात प्रविष्ट होऊ देणे धर्म्य नव्हे." सुभद्रा अत्यंत क्षुब्ध झाली. तसेच सात्यकीचे हे बोलणे चारी पांडवांना व द्रौपदीलाही खटकले.

"आपल्यासमोर कौरव सेना टिकूच शकत नाही. त्यांचा संहार करून आपण विजय प्राप्त करूया! पांडवांची- देवी द्रौपदींची हा तेरा वर्षांचा संकल्प काल हाल-अपेष्टा भोगत जगण्याची इच्छा असेल तर, त्यांनी आपली प्रतिज्ञा पूर्ण करावी. तोपर्यंत हस्तिनापुरावर-इंद्रप्रस्थावर प्रतिविंध्य तसेच अभिमन्यू राज्यकारभार करतील. अन् वनवास भोगल्यावर पांडवांना युद्ध करण्याचे श्रम करण्याची आवश्यकता पडणार नाही." सात्यकीच्या शब्दांचा पाण्डव-द्रौपदीला क्रोधच आला. हा सात्यकी स्वतःला अतिरथींचा महारथी समजतो काय! हा गर्भितरितीने

असं सूचित करतो की ‘ पाण्डवांनी सपत्नीक हाल-अपेष्टा सोसायच्या असतील, तर सोसाव्या. मात्र आम्ही युद्ध करू. ’ याशिवाय सात्यकी विनाअधिकार, विनासंमतीने इंद्रप्रस्थाचा- हस्तिनापूरचा भावी राजा कसा घोषित करू शकतो? याखेरीज याने आपल्या बाहुबळावर आमचे राज्य जिंकून घ्यावे अन् आम्हांलाच द्यावं, हा तर आमच्या स्वाभिमानावर आघात आहे!

“सात्यकी, तुझी योजना उत्तम व यशस्वी सिद्ध होण्यासारखी आहे. परंतु स्वाभिमानी धर्मराज युधिष्ठिर दुसऱ्याच्या बाहुबलाने जिंकलेल्या राज्याचा स्वीकार करणार नाही. याशिवाय अन्य पाण्डवबंधूच नव्हे तर, मानिनी याज्ञसेनी द्रौपदीदेखील असे अपार्जित व स्वतःच्या पराक्रमाने न जिंकलेले राज्य स्वीकारण्यायोग्य समजणार नाही. राजमाता कुंतीही अशा राज्याला- धनाला स्पर्श करणार नाही.” श्रीकृष्णाने सात्यकीला समजावून सांगितले,

” या पाण्डुपुत्रांचा वनवास संपल्यानंतर आपण कौरवांशी महायुद्ध करून त्यांना पराभूत करू.”

“कृष्णा! तू अगदी माझ्या नव्हे, तर सर्व पांडवांच्याही मनातलेच बोललास. आम्ही हेच- असेच करणार आहोत. खरंच, माझ्या मनातला भाव फक्त कृष्णच जाणतो. अन् आमच्या विपत्तीचा काळ संपला, की पुनः आमचा अभ्युदय होईल. आम्हा सर्वांच्या सामर्थ्याला नवं क्षितिज

प्राप्त होईल." द्रौपदीचे प्रेरक शब्द ऐकून चारही पांडवांनी एकमताने तिच्या मताचे समर्थन केले, " नि आपण सर्व युद्ध करून विजयी होऊ".

"**भान**ुमती कशी आहे?" रथाचा गोपुराप्रमाणे शोभिवंत असलेला भाग धरुन सहदेवाचा प्रश्न.

कृष्ण यावर काहीच उत्तर देऊ शकला नाही. तो काही क्षण गंभीर झाला. म्हणाला, "तुला ज्ञात आहे ना!"

"तरीही......." सहदेवाने अजूनही कृष्णाचा मार्ग रोखून धरला होता.

"तातश्री सहदेव! भानुमती आताही अत्यंत दुःखी व अस्वस्थ आहे. तिला एकटेपणा व अपराधीपणा वाटत आहे." चारुमतीने रथाचे वेग धरत म्हटले, "तुमच्याशिवाय तिला एकटं- एकटं वाटतंच. तरीही ती सुभद्रा आत्या तसेच अभिमन्यूसह आपला वेळ घालवते."

"केशवा, तिला म्हणावं, तिने अपराधीपणाची भावना बाळगू नये. कारण तिच्यात नैसर्गिक दोष असल्याकारणे ती मला पुत्र देऊ शकली नाही. यात तिची काही चूक नाही. आणखी एक, तिने हे सत्य

स्वीकारायला हवे की, ती कधीच पुत्रवती होऊ शकणार नाही. याशिवाय तू तिला अजून एक सांग की तिने अभिमन्यूलाच आपला पुत्र मानावा. सुभद्राही त्याबाबत किंतू बाळगणार नाही.'' सहदेवाने कृष्णाच्या स्कंधावर हात ठेवले.

''आयुष्यभर मी सर्वांचा दूतच बनून राहिलोय, याला संदेश दे- त्याला निरोप कळव, असं!'' कृष्णाने मान हलवली.

''आता सरळ तू द्वारकेला प्रयाण कर, अन् अर्जुन यथावकाश येईलच, तूही त्याच्या मागोमाग येच.'' सहदेवाने स्वतःला भावनावेगातून सावरत कृष्णाचा परिहास केला.

''अवश्य.'' कृष्ण त्याच्या रथात चढणार, तितक्यात त्याची पावले आपसूकच थबकली नि मान मागे वळली, ''सखी.......''

''केशवा, यावेळी सुभद्रेला घेऊन आलास, पुढच्या वेळेस तुझ्या एखाद्या पट्टराणीला घेऊन ये. म्हणजे आम्ही उभयंता स्त्रिया एकमेकांशी आपली सुखदुःखे आपल्या स्मृती वाटून घेऊ शकू.'' द्रौपदीने त्याच्या रथाजवळ येत म्हटले.

''तर मी कुणाला घेऊन येऊ? रुक्मिणी, कालिंदी, लक्ष्मणा की सुदक्षिणेला?''

''कदाचित मला भेटण्याची तीव्र इच्छा जिला असेल, त्या पट्टराणीला.''

“जशी तुझी इच्छा, कृष्णे!” कृष्णाने तिला सूचित केले, “ परंतु तिने तुला असे काही प्रश्न विचारले तर? की ज्याच्यामुळे तुझे मन दुखावले जाईल......”

“नाही, असे काही होणार नाही. जर असे झाले तरी, मी तिच्यावर क्रुद्ध होणार नाही व तिच्या प्रश्नांची उत्तरे देईन, कृष्णा!”

“खरंच, द्रौपदी?”

“अगदी खरंच रे.”

“ठीक आहे. मी आता द्वारकेस चाललो आहे. परंतु एक लक्षात ठेवा, तीर्थयात्रेचे उद्यापन तुम्ही काम्यकवनातच करा. अर्जुन तेथेच येण्याची संभाव्यता आहे.” असे म्हणून कृष्णाने चारुमतीला म्हटले, ”चल, रथाला वेग दे.”

......अन् कृष्णाचा रथ तसाच धावत दूरवर निघून गेला. त्या अश्वांच्या टापांकारणे उडणारी धूळ अर्जुनाच्या परतण्याच्या वार्तेला अधिक प्रसृत करत होती.

काही दिन उलटले व लोमशऋषी अर्जुनाचा संदेश घेऊन आले.

“अर्जुनाचे काही दिवसांत स्वर्गातून पृथ्वीवर आगमन होणार आहे. त्याकारणे आपण सर्वांनी लवकरात लवकर तीर्थयात्रेचे उद्यापन करून काम्यकवनात निवास करावा. अर्जुन तेथेच येणार आहे, पाण्डूपुत्रहो!”

"कृष्णाचे शब्द सत्य ठरले आहेत, कृष्णे! ऋतानृते!" सहदेवाने द्रौपदीला वळून म्हटले.

## ७७

"अर्जुना! काय करतो आहेस?'

"तात! आपली शस्त्रे- अस्त्रे, वस्त्रे- पात्रे तसेच द्रौपदीने दिलेल्या सामग्रीचे पुनः बांधाबांध करायची आहे मला. तेव्हाच द्रौपदीने या सामग्रीची बांधाबांध करून दिली होती. आता तर मलाही या सामग्रीची बांधाबांध करून ठेवावी लागणार!"

"पुत्रा, हे कार्य सेविकाही करतील."

" नाही तात, त्या प्रत्येक वस्तूत द्रौपदीचा स्पर्श आहे." अर्जुन त्या सर्व वस्तू हाताळत भावुक झाला.

" पुत्रा, हे घे." अकस्मात इंद्राने अर्जुनाच्या हातात एक रत्नजडित स्वर्णिम पेटी सोपवली.

"हे काय, तात? या पेटीत काय आहे?"

"स्वयंच उघडून पाहा, पुत्र अर्जुना!"

अर्जुनाने ती पेटी उघडून पाहिली अन् तो चकित झाला. कारण त्या पेटीत अत्यंत सुंदर अलंकार, रत्ने व मृदू नक्षीदार वस्त्रे होती.

“हे सर्व कशासाठी, तात? आपण तर मला रत्नांनी नखशिखांत अलंकृत केलेले आहे?”

“अर्जुना! ही वस्त्रे, अलंकार, ही रत्ने तुझ्याकरिता नव्हेत.”

“तात?” अर्जुनाला शंका आली की हे वस्त्रालंकार त्याच्या भार्यांकरिता तर नव्हेत?

“अर्जुना! हे वस्त्रे, आभूषणे माझी प्रिय व ज्येष्ठ पुत्रवधू-द्रौपदीकरिता आहे. हा मी द्रौपदीकरिता परंपरेनुसार दिलेला उपहार आहे.”

“परंतु, तात! हे कशाकरिता?”

“पुत्रा, हा उपहार वधूकरिता असतो, परंपरेनुसार. त्याकारणे तू कृपया प्रश्न करु नकोस आणि हा उपहार अस्वीकार करू नकोस.” असे म्हणून इंद्राने मातलीला आज्ञा दिली, “मातली, ही पेटी अर्जुनाच्या रथात ठेव.”

“नको, तात! द्रौपदीला उपहारस्वरुपातील रत्ने, अलंकार दिलेले आवडणार नाही. ती मानिनी आहे तसेच ती हा उपहार स्वीकारणार नाही.”अर्जुनाने इंद्राला म्हटले.

“तर तू तिला सांग की, ' ही माझ्या पित्याची- इंद्राची इच्छा आहे, आज्ञा आहे. ’ हे सांगूनही तिने ह्या उपहाराचा स्वीकार केला नाही तर,

तू तिला म्हणावेस, ‘ही माझी विनंती आहे. ’” इंद्राने अर्जुनाला अजून एक स्वर्णपुष्पांनी सुशोभित असलेली पेटी दिली.

“यात काय आहे? तात……” अर्जुनाने पेटी उघडण्याचा प्रयत्न केला.

“चुकूनही पेटी उघडू नकोस, पार्था! हा उपहार सहदेवाकरिताच आहे. हा अत्यंत विशिष्ट असा उपहार आहे. अश्विनीकुमारांनी मला काही काळापूर्वी ही विशिष्ट, दिव्य व अद्वितीय वस्तू दिली होती. परंतु ही वस्तू मी सहदेवाकरिता राखून ठेवली ठेवली होती. ही वस्तू त्याला दे.” इंद्राच्या शब्दांकारणे अर्जुनाला काहीशी ईर्ष्या झाली, “अन् माझ्याकरिता? कुठलाच उपहार नाही?”

“अर्जुना, मी तुला माझा रथ आणि मला प्रिय असलेली कल्पपुष्पांची सुगंधित माला प्रदान करत आहे.” असं म्हणून इंद्रदेवाने अर्जुनाच्या कंठात कल्पपुष्पांची माला धारण केली.

“अन् तुमचा रथ कुठे आहे? तात.”

“इंद्रपुत्रा अर्जुना! हा पाहा, तुझा अर्थात् तुझ्या पित्याचा रथ मी सज्ज केला आहे.” मातलीने अर्जुनाला ‘इंद्रपुत्रा’ याच नावाने संबोधित केले.

अर्जुनाने त्या रथाचे सुव्यवस्थित निरीक्षण केले. तो रथ अत्यंत सुंदर होता. त्या रथाचा मंचक मृदू असून नक्षीदार होता. रथाच्या कलशाला

दोन घंटा होत्या. याशिवाय रथावर सुंदर चित्रे कोरलेली, अन् जोडलेल्या रत्नाच्या-पुष्पांच्या मालाही रथाला सुशोभित करत होत्या. रथाच्या स्तंभांना विविध शृंखलाही लटकलेल्या होत्या.

आणि रथाला स्वर्ण-मोत्यांनी सजलेले व पुष्ट श्यामवर्णी अश्व जोडलेले होते.

अर्जुनाला तो रथ आवडला, मात्र त्याला श्यामवर्णी अश्वांची जोडणी आवडली नव्हती. स्वाभाविक बाब होती ती. अर्जुनाचे एक नाव 'श्वेतवाहन' असे होते. कारण त्याच्या रथाला त्याचे प्रिय असलेले श्वेतच अश्व सदैव जोडलेले असत.

“तात, हे अश्व नको. मला श्वेत अश्व प्रिय आहेत.”

“पुत्रा, हे अश्व तुझ्याप्रमाणेच श्यामवर्णी आहेत म्हणून मी ते अश्व रथाला जोडले आहेत.” इंद्राने अर्जुनाला स्पष्टीकरण दिले.

“ठीक आहे. मी हा रथ स्वीकार करत आहे.” असे म्हणून अर्जुन रथावर चढला. त्याने मातलीला आदेश दिला, “मातली, रथाला आवेग दे.”

“अर्जुना! देवपुत्रा! मी निश्चितच रथाला वेग देईन. किंतु तत्पूर्वी तू इंद्ररथाची आश्चर्यकारक विशेषता जाणून घे, इंद्ररथाला वेग दिल्यानंतर मेघ, अशनी, संवर्तक, विद्युत हे चारही श्यामअश्व तसेच रथाची वायुवेगवान चक्रे इतक्या गतीने दौडतात की, या रथात आसनस्थ

असणाऱ्या व्यक्तीला उभे राहणे अथवा रथमंचकावर बसणे सुद्धा अशक्यप्राय होते, फक्त देवेंद्राला व मला वगळता.” मातलीने अश्वाचे दोर घट्टपणे धरले.

“तू फक्त रथाला वेग दे.” अर्जुन आत्मविश्वासाने म्हणाला.

“देऊ?” तरीही मातलीने अजून एकदा खात्री करून घेतली, “रथाला वेग देऊ, इंद्रपुत्रा?”

“मातली, रथाला वेग दे असं म्हटलं ना.....” अर्जुन क्रुद्ध झाला, ”तर रथाला वेग दे.”

मातलीने अश्वांचे वेग खेचले आणि रथ प्रचंड वेगाने धावू लागला.

परिणामी अर्जुनाला धक्के बसत होते, मात्र एकाच ठिकाणी पाय रोवून तो स्थिरपणे उभा होता. मातलीला याच बाबीचं आश्चर्य वाटलं. त्याने न राहवून विचारलं, “पार्था! तू स्थिर उभा आहेस?

अहो आश्चर्य!”

“हे स्थैर्य, धैर्य मला कृष्णेकारणे प्राप्त झाले आहे. तिने जर व्रतवैकल्ये, गृहस्थी व संकटमय परिस्थितीतही स्थिर राहून तसेच धैर्य राखून अगदी माझ्या यशाची कामना केली नसती, तर तपश्चर्येत असो वा इंद्ररथात, मी स्थिर राहू शकलो नसतो.” अर्जुन भावनाविवश झाला.

“तुझ्या अनेक भार्या असल्याचे मी श्रुत आहे. तरीही राजकुमारी कृष्णा म्हणजे द्रौपदी तुझी विशेष प्रियतमा आहे अन् तुझ्या अन्य प्रियांविषयी मी ज्ञात करू शकतो का?” मातलीने सौजन्याने म्हटले.

“सर्वप्रथम तू सांग, की तुला किती पत्नी आहेत? आणि तुला त्यातील कोणती अर्धांगिनी अधिक प्रिय आहे?” अर्जुनाने विचारले.

“माझ्या दोन भार्या आहेत. प्रथम पत्नी- गरुडपुत्री गुणकेशी नि दुसरी पत्नी- गुणकेशीचीच सहचरी मित्रसाधना. मित्रसाधना माझी प्रियतमा पत्नी आहे.” मातलीने सर्व काही सांगितले.

“मला ज्ञात आहे, तुझ्या व गुणकेशीच्या विवाहाकारणे इंद्र- गरुड युद्ध झाले होते, मातली!”

“पार्था, तू तुझं सांग.” मातली संकोचत म्हणाला.

“मला चार भार्या आहेत. पांचाली, उलुपी, चित्रांगदा अन् सुभद्रा. कृष्णा व सुभद्रा या दोन्ही माझ्या अत्यंत प्रिय प्राणेश्वरी आहेत.” अर्जुनाने मंदस्मित केले.

“एक प्रश्न; इतक्या सहजपणे निवातकवच राक्षसांचा, साक्षात इंद्राचा पराभव केलास तर, तू द्यूतसभेत कौरवांचा संहार का केलास नाहीस?” मातलीचा प्रश्न एखाद्या तीराप्रमाणे जणू अर्जुनाच्या हृदयात रुतला.

“मातली, काही प्रश्नांची उत्तरे परिस्थितीच देते. अथवा तू असंच समज, सर्वच प्रश्नांची उत्तरे मनुष्याकडे नसतात.” अर्जुन दुखावल्या स्वरात म्हणाला.

“म्हणजे या प्रश्नाचे उत्तर तुझ्याकडे नाही, असं मी समजू, धनंजया?”

“तू तसं समजू शकतोस, मातली!” अर्जुनाने दुःखाने म्हटले, “मात्र माझ्या प्रियजनांकडे परतण्याच्या वेळी कृपया असे प्रश्न करू नकोस, त्याकारणे माझी मनस्थिती खिन्न होईल, माझ्या प्रियजनांना त्याचा त्रास होऊ शकतो. द्रौपदीला अधिक पीडा होईल. तिला या वनवासाकारणे काही कमी दुःख झालेले नाही. निष्कारण माझ्यामुळे ती विषण्ण नको व्हायला.”अर्जुनाच्या स्वरात पश्चाताप होता.

“जशी तुझी इच्छा, अर्जुना!” मातलीने रथाचा वेग अधिक वाढवला, “मी आता काहीच बोलणार नाही. तरीही एक प्रश्न;”

“मातली, अरे मातली! तू एकदा म्हणतोस की तू काहीच बोलणार नाहीस आणि आता अजून एक प्रश्न विचारतोस?”

“हा प्रश्न अत्यंत साधारण आहे; द्रुपदराजकन्या तुम्हां पाण्डवांसमवेत वनांत राहते आहे ना?”

“हे तू विचारतोस की खात्री करून घेतोस, मातली?”

“ज्ञात आहे, तरीही मी विचारले. कारण इतर उपपत्नी असूनही तुम्हा पाण्डवांना जी सर्वाधिक प्रिय असल्याचे मी ऐकले आहे, त्या पांचालकुमारी द्रौपदीचे रूप, गुण- आचरण प्रत्यक्षात पाहण्याची इच्छा आहे, इंद्रतनया अर्जुना!”

“तू तिला पाहूच शकत नाहीस. कारण तिचे सौंदर्य, तेज तुझ्या नेत्रांतच मावूच शकत नाही, असे विधात्याने तिला घडविले आहे आणि गुण-आचरणाबद्दल म्हणशील तर, परमेश्वराने सर्व सद्गुणी व पतिव्रता स्त्रियांचे गुण वेचून वेचून द्रौपदीत ओतले आहेत.”

“मला ज्ञात आहे, देवी द्रौपदी स्वर्गलक्ष्मीचा अवतार आहे. म्हणून तिचे दर्शन मलाही व्हावे, याकरिता मी औत्सुक्याने इच्छा व्यक्त केली.” मातलीचा मंत्रमुग्ध स्वर अचानक सश्रद्ध झाला.

“काय सांगतोस? द्रौपदी स्वर्गलक्ष्मीचा अवतार आहे? म्हणजे साक्षात देवी ‘श्री’?” अर्जुन चकित झाला, ” मला तर हे ज्ञातच नव्हतं.”

“तुला ज्ञातच नाही? याशिवाय तू राजकुमारी द्रौपदीला परिजातकांची माला देणार आहेस, तर मी तुला एक सांगतो. ज्याक्षणी राजकन्येने वायुपुत्र भीमाला दिव्य कमलपुष्पांची इच्छा व्यक्त केली होती, त्याक्षणी आपल्या ज्येष्ठ भ्रात्याच्या- हनुमानाच्या आलिंगनामुळे अधिक शक्तिशाली झालेल्या भीमाने कुबेरसैन्याचा संहार केला…... अर्जुना!”

"काय? विवेकी भीम असं करु शकत नाही! मातली...."

"मात्र त्याकारणेच लोकपाल कुबेर अगस्तींच्या शापातून मुक्त झाला, अर्जुना! म्हणूनच लोकपालाने देवी द्रौपदीला श्रीरुपात पाहून कमलांनी सत्कृत केले." मातलीच्या परिपूर्ण संज्ञानाने अर्जुनाला अधिकच विस्मित केले.

"हे तुला कसे ज्ञात, मातली?"

"अश्विनीकुमारांकडे लोकपाल आपल्या जखमी सैनिकांना घेऊन आला होता, हे मला अश्विनीकुमारांच्या सारथ्यांकडून कळालं." मातलीच्या तोंडून कमळांचा वृत्तांत ऐकून अर्जुनाच्या मनात भीमाविषयी मत्सर उद्भवला व द्रौपदीविषयी क्रोधही.

आपण तिचा प्रिय हृदयेश्वर असूनही तिने भीमाकडेच का इच्छा व्यक्त केली? जर काही मास प्रतीक्षा केली असती, तर तिला स्वर्गीय पुष्पे प्राप्त झाली असती, त्या कमलांची इच्छा तिला झालीच नसती.

"मात्र या मत्सरापेक्षा पांडवांच्या सामर्थ्यातील झालेल्या वृध्दीचा आनंद महत्त्वाचा नाही का? पार्था, द्रौपदीला तशी इच्छा झाली नसती, तर भीमाची शक्ती वृध्दिंगत झालीच नसती."

"कोण माझ्याशी बोलत आहे?" या विचाराने अर्जुनाने वळून पाहिले.

तर एका तेजस्वी मेघावर पहुडलेला कृष्ण त्याच्याशी बोलत होता.

“द्रौपदी सदैव भीमाकडेच आपली इच्छा व्यक्त करते, माझी उपेक्षाच करते.” अर्जुनाचा स्वर परिवादात्मक होता.

“तू बालक आहेस का, असा तर्कहीन परिवाद करायला? पार्था?” अर्जुनाला त्याच्या स्कंधामागून स्वर आला. त्याने मागे पाहिले, कृष्ण त्याच्या स्कंधावर हात रेळून रथमंचकाच्या वरच्या भागावर बसला होता.

“मला तुझा भास होतो की तू खरोखरच येथे आहेस, कृष्णा?”

“ ते महत्त्वपूर्ण नाही, अर्जुना! द्रौपदीने जर कमळाची इच्छा व्यक्त केली नसती, तर हनुमंताने भीमाला असे वचन दिले नसते की, मी तुझ्या अनुजाच्या- अर्जुनाच्या रथाच्या शिखरावर आरूढ होऊन त्याचे सदोदित रक्षण करेन.”

हे ऐकून अर्जुन अत्याधिक प्रसन्न झाला व त्याच्या मनातील द्रौपदीविषयीचा रोष कमी झाला. मात्र त्याची शंका तशीच अनुत्तरीत होती.

“तू येथे कसा, केशवा?”

“मी द्वारकेतील कृष्ण नव्हे. मी तुझ्या मनोमस्तिष्कात वसणारा तुझा सखा. तुझा अत्यंत जवळचा मित्र-माधव आहे.” त्या कृष्णाने अदृश्य होत म्हटले.

“तू जर माझ्या मनोमस्तिष्कात वसत असशील तर, माझ्या संज्ञानात नसलेला हनुमंताच्या वचनाचा वृत्तांत तू कसा सांगितलास?”

“हाच प्रश्न सहदेवाला विचार, पार्था! किंतु सध्यातरी प्रवासाकडे तसेच गंतव्याकडे लक्ष दे.”

“इंद्रपुत्रा! कुंतीनंदना! हे पहा, आपल्या वसुंधरेच्या पवित्र व निसर्गरम्य भूमीवर उतरतो आहोत.” मातलीच्या शब्दाकारणे अर्जुनाचा मनोसंवाद खंडित झाला.

“मातली, जरा रथ थांबव, काही क्षणांकरिता.” अर्जुनाच्या आज्ञेनुसार मातलीने रथ थांबवला.

“क्षामे माम् देवी धरित्री समुद्रवसने पर्वतस्तनमंडले!” अशी प्रभातप्रार्थना करुन अर्जुनाने आपली पादत्राणे उतरवली नि अनवाणी पावलांनी तो मृदु दर्भावर उतरला.

त्याला प्रसन्नतेची अनुभूती झाली, पुनः धरतीवर उतरल्यानंतर. त्याच्या पावलांना कित्येक दिवसांनी, मासांनी अशा लुसलुशीत गवतांचा स्पर्श झाला होता.

अर्जुनाने आपले उत्तरीय स्कंधावरून काढले अन् पृथ्वीवरील सुगंधित वायूच्या झुळुकींना स्वतःच्या अंगावर आदळू दिले.

कित्येक वर्षांनी पृथ्वीवरील पवन त्याच्या अंगावर आदळत होता. ते आदळणंही त्याला सुखावत होतं.

अकस्मात त्याला नीलकमलांचा सुगंध आला. त्याने पाहिले की, समोरच्या सरोवरात सांध्यकालीन आकाशाप्रमाणे निळी व केशरी दिसणारी कमळे फुललेली होती.

अर्जुनाने नीलकमले हातात धरून मनसोक्त हुंगली. "प्रियतमे! कृष्णे! तू लक्ष्मीचा अवतार आहेस. अन् लक्ष्मी तर कमळांमध्येही वास करत असतेच. त्याप्रमाणेच नीलकमळेही तुझ्या अस्तित्वाचाच एक भाग आहे. इन्दीवरे तुझ्या रोमारोमांत फुललेली असतात, आपल्या गंधरुपात! परंतु माझं दुर्भाग्य पाहा, अशी नीलकमले फक्त पृथ्वीवर उमललेली असतात, स्वर्गावर नव्हे! नाहीतर, तू नीलकमलांच्या रुपाने सदैव माझ्यासमीप राहिली असतीस."

अर्जुनाने ती पुष्पे पुन्हा सरोवरात ठेवली आणि निकटच्या वृक्षावरुन सुवर्णचंपाची पुष्पे तोडून घेतली.

"ही पुष्पे कशाकरिता, पार्था?" मातलीचा प्रश्न.

"द्रौपदीकरिता." असं म्हणून अर्जुनाने त्या पुष्पांना परिजातकांत गुंफले, नि मातलीला म्हटले, "रथ अधिक वेगाने चालव. अन्य चार पांडव पांचालीसह माझी प्रतीक्षा करत असतील."

"अवश्य, अर्जुना!" मातलीने अश्वाचे वेग खेचले आणि रथाची गती वाढवली.

अर्जुनाने हातात सुवर्णचंपा- परिजातकांची माला घेतलेली होती. तिचा सुगंध थेट काम्यकवनातील पाण्डव- द्रौपदीच्या आश्रमापर्यंत दरवळत होता.

# तृतीय बंध

"इतका साजशृंगार का करतेस?" सरोवराच्या जलात पाहून पुष्पालंकारांनी भूषित होणाऱ्या पांचालीला सहदेवाने विचारले.

"आर्य, आपल्याला ज्ञात आहे ना!" द्रौपदीने आपल्या कानांत कर्णफुले अडकवत म्हटले.

"तरीही जाणून घेणे हा माझा अधिकार आहे." सहदेवाने तिच्या मुखावर आलेली केशांची आलेली बट बाजूला सारली.

"आर्यपुत्र सहदेव, धनुर्धर पार्थांचे आगमन होणार आहे." द्रौपदीने स्वतःच्या बाहूवर पुष्पांचा केयूर बांधला.

"ही वार्ता तुला इंद्रसेनाने दिली का? की तुला स्वतःलाच आभास झाला?" असे सहदेवाने विचारताच द्रौपदीचे श्यामल गाल आरक्त झाले, "आभास झाला."

"म्हणून तर तू स्वतःच्या शृंगारासह आश्रमाचाही शृंगार केला आहेस." सहदेवाने संपूर्ण आश्रमाचे निरीक्षण केले. आश्रमाचे द्वार-गवाक्ष पुष्पांच्या मालांनी सुशोभित होते. आश्रमाची पर्णकुटी सुंदर चित्रांनी सुसज्ज होती. अंगणात सदैवप्रमाणे सडासंमार्जन केलेले होतेच, सुगंधित पुष्पांच्या पाकळ्यांनी भूमीवर रंगावली रेखाटली होती.

याशिवाय द्वाराच्या दोन्ही बाजूला कृष्णागरुसारख्या पवित्र धूपचा सुगंध पसवरणारी- मनाला आल्हाद देणारी दोन ताम्र पद्माकर धुपपात्रे ठेवलेली होती.

“तुला जितकं शक्य आहे, तितकी भव्यदिव्य, राजस सज्जता तू अर्जुनाच्या स्वागतार्थ केली आहेस.” सहदेवाने न राहवून पांचालीची प्रशंसा केली.

“म्हणजे आम्हां जुळ्यांनाही तपश्चर्या करायला दूर- दूर जावे लागणार.”नकुलाने काष्ठे आणली होती. आश्रमाची सुसज्जता पाहून त्याने ती काष्ठे खाली टाकून दिली.

“आर्य, मी समजले नाही.” पांचालीने काष्ठे उचलून घेतली.

“नीलांगिनी, आम्ही दूरवर प्रयाण करून तपश्चर्या केली तर तू अशीच, किंबहुना यापेक्षाही अतिउत्कृष्ट रीतीने आमच्या स्वागताची सुसज्जता करशील, हो ना?” नकुलाने आपले खड्ग बाजूला ठेवले.

त्याचे शब्द ऐकून द्रौपदीला दुःख वाटले. ती मनोमन उद्वेलित झाली, ” आर्यपुत्र, हा काय प्रश्न झाला? आपण पाची पांडव माझे पंचप्राण आहांत, जशी मी आपणा सर्वांची बहिश्चर अंतरात्मा आहे. माझ्यापासून माझा एकही प्राणेश्वर दूर गेला तरी, मला तितकीच विरहपीडा होते, हे आपण जाणत असूनही असे का म्हणताहात?”

किंतु तिच्या विवेकाने तिच्या भावुकतेवर विजय मिळवला. संकल्पकाल- वनवास पूर्ण झाल्यानंतर कौरव-पांडवात एक महायुद्ध होणार आहे. त्या कारणाने यदाकदाचित भीमसेन तसेच माद्रीपुत्रांना शस्त्रे व शक्ती- सामर्थ्याचे अर्जन करण्यासाठी आपल्यापासून दूर जावे लागले तरी, आपल्याला पूर्वीप्रमाणेच मन घट्ट करुन विरहपीडा साहावी लागणार. तेव्हा असं भावनाविवश होऊन उचित नव्हे.

“जर आपणास महर्षींची आज्ञा असेल तर, आपणही तपश्चर्या करू शकता. माझ्या शुभकामना आपल्यासमवेत सदैव असतील.” द्रौपदीने स्थिर स्वरात म्हटले.

“याचाच अर्थ, तुला भावी विरहाचे तसेच आपली पती आपल्यापासून दूर जातील या दुःखाचे काहीच वाटत नाही?” नकुल रुष्ट झाला.

“आर्य, असं नाही की मला भावी विरहाचे अथवा ‘त्या’ पीडेचे काहीच वाटत नाही. किंतु यदाकदाचित भावी महायुध्दाकरिता आपल्यालाही शस्त्रार्जन, शक्ती अथवा विद्येच्या प्राप्तीकरिता माझ्यापासून दूर जाणार असाल तर, मी पांडू परिवाराच्या कल्याणार्थ आपणास रोखणार नाही, मी आपला विरह सहन करीन हाच माझा आशय होता.”द्रौपदीने स्पष्टीकरण दिले.

“ठीक आहे. आम्ही तपश्चर्या करणारच नाही, जेणेकरून तुला पतीविरह सहन करावा लागणार नाही.” नकुलाने असा अभिनय केला, जणू त्याला विरहातही फरक पडणार नाही. मात्र द्रौपदीशिवाय नकुलाचंच काय, अन्य पांडवाचंही पान हलणार नाही, इतके पांडव द्रौपदीच्या सान्निध्याचे अभ्यस्त झाले होते, हे द्रौपदी चांगलीच जाणून होती.

“धन्यवाद, आर्य.” ती हसत म्हणाली.

“काय झालं? आज तितका वार्तालाप का करताहात? किती कार्ये पडलीत, हे ज्ञात आहे ना! द्रुपदकन्ये, आणि नकुल-सहदेवहो! चला, आपापली कार्ये करा.” अकस्मात तेथे आलेल्या धर्मराजाने म्हटले.

“होय, पंचारतीची, नदीच्या पवित्र जलाची व्यवस्था करायला हवी, मित्रसेना! नदीचे पवित्र जल आण.” द्रौपदीने मित्रसेनाला आज्ञा दिली.

“कुणाच्या स्वागताची सज्जता चालू आहे, पांचाली?” धर्मराजामागे भीमसेनदेखील आश्रमात आला.

“कुणाच्या म्हणजे माझ्या!” अर्जुनाचा स्वर सर्वांच्या कानी पडला.

“आर्यपुत्र अर्जुन!” अर्जुनाला पाहून द्रौपदीच्या प्रसन्ननतेला पारावर राहिला नाही. तरीही तिला तिच्या नेत्रांवर विश्वासच होत नव्हता. तिची दृष्टी अर्जुनावर स्थिरावली होती. ज्याप्रमाणे सूर्याच्या प्रकाशामुळे

हिरा झळाळतो, त्याप्रमाणे अर्जुन तपश्चर्याकारणे व स्वर्गात निवास केल्याकारणे अधिक रूपवान, तेजवान दिसत होता.

अन् शुध्द सुवर्ण अग्नीच्या शलाकांत तावून सुलाखून निघालेल्या 'कुंदन'च्या रूपात प्रदीप्त व तेजस्वी दिसते, तशीच व्रतवैकल्ये व तीर्थयात्रेकारणे कृश झालेली पांचाली ओजस्वी दिसत होती. तिच्या मुखावरील झळाळत्या कांतीवरुन अर्जुनाची दृष्टी हलत नव्हती.

मात्र मीलनाच्या आनंदाकारणे नेत्रांत आलेल्या अश्रूंमुळे द्रौपदीच्या दृष्टीतील अर्जुनाची प्रतिमा अस्पष्ट झाली.

"काय झालं, कृष्णे? स्वागत नाही करणार आहेस माझं?" अर्जुनाने तिच्या समीप येत तिच्या गालांवर हात ठेवले.

"अर्जुना......." युधिष्ठिराला ते दृश्य पाहवलं नाही. भीमसेनाने मात्र क्षणार्धात कृती केली. त्याने धावत जाऊन पार्थाला आलिंगन दिले.

"भ्रात्या! अर्जुना! तुला भेटून अत्यंत आनंद झाला. त्याचं काय आहे, की तुझं अकस्मात आगमन झालं आहे, त्यामुळे आम्ही तुझे स्वागत करू शकलो नाही."

"तर भीमा, ही सुसज्जता कशासाठी?" भीमाच्या आलिंगनातून मुक्त होत अर्जुनाने सुशोभित आश्रमाकडे अंगुलीनिर्देश केला.

"अर्जुना! ही सुसज्जता द्रौपदीनेच केलेली आहे. तुझ्या आगमनाच्या आभास झाला होता तिला." सहदेवाने म्हटले.

“शुभे, तुला आभास झाला. तू माझ्यासाठी इतकी सुसज्जता केलीस, तरी तू माझे स्वागत करत नाहीस? असे का?” अर्जुनाने तिचे हात धरत म्हटले.

मातलीही आश्चर्याने द्रौपदीची स्तब्धता पाहत होता. त्याचे नेत्र विस्फारले होते, द्रौपदीचे रूप, तेज पाहून. मात्र त्याला कृष्णेची स्तब्धता विस्मयकारक वाटली.

“आर्य, मला विश्वासच नाही बसत, की आपण परतलात, नि आपण माझ्या नेत्रांसमोर आहात.”

या शब्दांमुळे अर्जुन चकित झाला.

“अगं, पांचाली! नेत्र स्वच्छ करून घे अन् स्वच्छ नेत्रांनी पाहा, मी खरंच परतलो आहे.”

तिने आपले नेत्र पुसले नि अर्जुनाकडे पाहिले.

“अजूनही मला हे सर्व सत्य वाटतंच नाही, आर्य!”

“अगं, पांचाली! परंतु का?”

“कारण आपल्या आभासाने कित्येकदा मला फसवलं आहे, गेल्या पाच वर्षात!” द्रौपदी पुटपुटली.

“म्हणजे तू गेली पाच वर्षे माझी प्रतीक्षा करत होतीस!” अर्जुनाचा कंठ दाटून आला, प्रेममयी गहिवराने.

तत्क्षणीच द्रौपदीला त्या कमलपुष्पांच्या मालेचे स्मरण घडले, जी पुष्पमाला तिने खास अर्जुनाकरिता राखून ठेवली होती.

ती लगबगीने आश्रमात गेली. तिच्या त्या लगबगीकारणे पाण्डुपुत्र अन् मातली चकित झाले. ही कृष्णा स्वागत करणार होती ना, तर ती आश्रमात का गेली?

काही क्षणांत ती बाहेर आली तेव्हा तिच्या हातांत सहस्त्रदलांच्या तसेच सुवर्णाच्या कमळांनी गुंफलेली माला होती.

‘‘ही कमलपुष्पे भीमसेनाने तुला दिली होती का?’’ अर्जुनाने वेध घेतला.

‘‘आर्य, आपणांस हे कसे ज्ञात?’’ पांचाली विस्मित झाली.

‘‘मला तो संपूर्ण वृत्तांत इंद्रसारथी मातलीने सांगितला, कृष्णे!’’

‘‘परंतु अर्जुना! ती पुष्पे पांचालीने स्वतःच्या केशांत माळण्याकरिता गुंफली नव्हती, तर आपल्या सर्वांना अर्पण करण्यासाठी गुंफली होती.’’ भीमाने म्हटले.

‘‘ही पुष्पे अर्थातच- तुझ्याकरिता राखून ठेवलेली कमळांची ही माला शुष्क पावली नाही. कारण तिचे पतिप्रेम, पतिनिष्ठा तसेच पातिव्रत्याच्या सत्त्वानं या मालेला कधीच कोमेजू दिलं नाही.’’ सहदेवाने द्रौपदीकडे प्रभावित दृष्टीने पाहत म्हटले.

या संपूर्ण वार्तालापात द्रौपदीने कधीच अर्जुनाच्या कंठात कमलपुष्पांची माला परिधारण केली होती. भीमाच्या- सहदेवाच्या तोंडून सत्य ऐकल्यानंतर अर्जुनाच्या नेत्रांतील द्रौपदीविषयीचे प्रेम अधिक वृद्धिंगत झाले व आदरही.

तितक्यात द्रौपदीने त्याच्या भालप्रदेशावर तिलक रेखून त्याला पंचारतीने ओवाळले आणि त्याच्या चरणांवर जल ओतले.

"आर्यपुत्र, आपले स्वागत असो." द्रौपदीने पुष्पांच्या पायघडीकडे निर्देश केला.

अर्जुन अनवाणी पावलांनी पुष्पांच्या पायघडीवरुन युधिष्ठिराकडे चालत गेला अन् अर्जुनाने त्याचे चरण शिवले.

"आयुष्यमान भव! कीर्तीवंत भव! विजयी भव!" युधिष्ठिराने त्याला अनंत आर्शीवाद दिले. त्याला आनंद झाला होता. अर्जुन कृतास्त्र होऊन परतला होता म्हणून. आता धर्माला कर्णाचे भय वाटणार नव्हते.

"भीमा, तुला द्रौपदीने पुरेसे भोजन दिलेले दिसत नाही? काहीसा कृश झालास वाटतं." भीमाला प्रणाम करून अर्जुन त्याचा दंड दाबत म्हणाला.

"उचितच म्हणालास, अर्जुना! आता द्रौपदी तुझ्या वाट्याचेही मला भोजन देणार." भीमाने हसत हसत अर्जुनाला जवळ घेतले, "बरं,

पांचाली तुझ्या वाट्याचे भोजन मला देण्यापूर्वी तू मला स्वर्गातील विशिष्ट उपहार दे.”

हे ऐकून अर्जुन विचारांत पडला. तातांनी फक्त सहदेवाकरिताच उपहार दिला आहे, तर आता भीमाला कसा उपहार द्यावा?

अर्जुनाने रथातील सामुग्री काढून पाहण्यास आरंभ केला. तेव्हा त्याच्या हातात त्याची गदा लागली. परंतु ही गदा नको. भीमसेनाकडे यापेक्षाही सुंदर, दिव्य व मायावी असलेली अन् मयासुराने दिलेली गदा आहे.

तितक्यात त्याच्या हाताला त्याची शिदोरी लागली. इंद्राने ती शिदोरी दिली होती. त्यात अमरफले होती. त्या फळांमध्ये शीतल सोमाचा स्वाद असल्याकारणे मनाला परमतृप्तीचा आनंद मिळायचा.

अर्जुनाने प्रवासात त्यातील फक्त दोन- चारच फळे खाल्ली होती.

अर्जुनाने ती शिदोरी घेतली आणि भीमाच्या हातात सोपवली.

“यात काय आहे, पार्था?”

“यात अमरफले आहेत, ही फळे ग्रहण केल्यानंतर परमतृप्तीचा हर्ष प्राप्त होतो.” अर्जुनाने म्हटले.

“अन् आपल्या ज्येष्ठ भ्रात्याकरिता- धर्मराजाकरिता काय आणलेस?” युधिष्ठिराने अर्जुनाला विचारले.

अर्जुनाने रथातील रत्नांची स्वर्णिम पेटी उचलली, जी इंद्राने त्याला प्रथमतः दिलेली होती, तरीही त्याने ज्या रत्नांचा विशेष उपयोग केला नव्हता, ती रत्ने युधिष्ठिराला दिली.

"स्वर्गातील रत्ने? किंतु ही रत्ने तर आपल्या इंद्रप्रस्थातील रंग बदलणाऱ्या मायावी रत्नांसमोर निस्तेज आहेत!" युधिष्ठिराच्या स्वरात असंतोष व स्वतःची संपत्ती गमावल्याचे दुःख होते.

तसा इंद्रप्रस्थातील प्रसन्नतेचा, सुखाचा काळ सर्वांनाच प्रकर्षाने स्मरला, त्याकारणे सर्वजण अत्यंत प्रक्षुब्ध झाले.

"पार्था, " स्वतःला पूर्व घटनांच्या स्मरणातून सावरत नकुलाने मिश्कीलपणे म्हटले, " तुझ्याशिवाय आम्ही चारही पाण्डुपुत्र विझलेल्या होमकुंडाप्रमाणे जगत होतो, तुझ्याकरिता व्रतवैकल्ये करत होतो."

"अरे, खरंच? मला माहीतच नव्हतं! द्रौपदीने म्हटले होते की, ती स्वतः व्रतवैकल्ये करणार आहे. मात्र तिच्याऐवजी तुम्ही स्वतः व्रतवैकल्ये केलीत." अर्जुन सर्व काही जाणत असूनही हसत म्हणाला, यावर द्रौपदीदेखील हसली.

"तर मला काय देशील?" नकुलाच्या प्रश्नावर अर्जुन पुनः संभ्रमित झाला. आता या नकुलाला काय द्यावे? तलवार देणेच सयुक्तिक ठरेल. अर्जुनाने हिरेजडित साखळ्यांनी सजलेल्या स्वर्णिम म्यानाने सुशोभित

असणारी तलवार नकुलाला दिली, जी तलवार इंद्राने देवता- मनुष्याच्या साहचर्याचे प्रतीक म्हणून अर्जुनाला दिली होती.

"भ्रात्या! म्यानातील तलवार कशीही असो, मात्र म्यान अतिशय सुंदर आहे." नकुलाने ती तलवार हाती घेतली.

"माझ्याकरिताही विशिष्ट उपहार आहे तुझ्याकडे, अर्जुना! तुझ्या पिताने माझ्याकरिताही उपहार दिला आहे, फक्त मलाच." सहदेवाने आपले हात पुढे केले, "तो उपहार मला दे."

"ही घे स्वर्णिम पेटी, यात काय आहे, याची उत्सुकता मलाही लागली आहे." अर्जुनाने सहदेवाला ती पेटी दिली.

सहदेवाने ती पेटी उघडली, त्यातून नेत्र दिपवणारा प्रकाश बाहेर पडला, त्या दिव्य प्रकाशाचं वलय सारून गुलाबी मेघांचा पडदा नेत्रपटलांवर आला. अचानक ते मेघांचे पुंजके जसे विरले, तशी ती वस्तू सर्वांच्या दृष्टिक्षेपात पडली.

त्या पेटीत एक पारदर्शक दर्पण होते, त्या दर्पणात भावी घटना पाहणे सहज शक्य होते.

सहदेवाने मंदस्मित करत तो दर्पण पुन्हा पेटीत ठेवून दिला.

"कृष्णे, जरा वेध घे पाहू. मी तुझ्यासाठी काय आणलं असेन?"

"आपण कृतास्त्र व सामर्थ्यवान होऊन परतलात, हेच माझ्याकरिता पुरेसं आहे. मला दुसरं काही नको." द्रौपदी समाधानाने म्हणाले.

“तरीही सांग मला, मी तुला काय आणलंय? कारण तुला ज्ञात आहे ना, मी त्याकरिता उपहार आणल्यावाचून राहणार आहे का? पांचाली.”

“असं काय असू शकते, जे मला अत्यंत प्रिय आहे , आर्य?”

“नेत्र बंद कर पाहू.” अर्जुनाने वस्त्रांत बांधलेली पुष्पमाला हातात घेतली. त्याच्या वस्त्रांकित ओंजळीआड काय दडलंय असेल, ह्याचंच आश्चर्य द्रौपदीसह अन्य पांडवांनाही वाटत होतं.

अर्जुनाने हस्तिदंताच्या खोवणीने द्रौपदीच्या नीलाभ केशांत ती पुष्पमाला अलगत खोवली.

“आर्यपुत्र!” द्रौपदी प्रसन्नचित्त झाली, “परिजात? आणि सुवर्णचंपा?”

“मला ज्ञातच होते, माझी द्रौपदी या पुष्पमालेनेच प्रसन्न होईल. तिला अन्य कुठलाच उपहार स्वीकारार्ह वाटलाच नसता, कृष्णे!”

“तात्पर्य?” द्रौपदी स्तिमित झाली.

“पांचाली, हा उपहार मी दिलेला नसून माझ्या पित्याने इंद्रदेवाने दिलेला आहे. त्यांनी प्रथेनुसार तुला तू ज्येष्ठ तसेच प्रिय पुत्रवधू असल्याकारणे तुला उपहार दिलेला आहे. हा घे अन् उघडून पहा.” अर्जुनाने तिला ती स्वर्णिम पेटी दिली.

तिने ती पेटी उघडली. त्यात चकाकत्या रत्नांचे व धातूंचे दिव्य अलंकार नि मृदु वस्त्रे होती.

“आर्य, इतके सारे अलंकार व रत्ने? इतकी सारी राजसी वस्त्रे?”

“तू हा उपहार स्वीकारावास, अशी तातांची इच्छा, आज्ञा, नि विनंती आहे, पांचाली.”

“आर्य, मी वनवासिनी आहे. याशिवाय मी सुवर्णाच्या, रत्नांच्या वस्तूंपासून दूर राहण्याचा निश्चय केलेला आहे. याकारणे मला रत्नालंकार तसेच राजसी वस्त्रे वर्ज्य आहेत.” द्रौपदीने युधिष्ठिराकडे रोखून पाहत म्हटले.

“द्रौपदी! कृपया या वस्त्रालंकाराचा स्वीकार कर. तू ही वस्त्रे-आभूषणे धारण केली नाहीस तरी, माझी ना नाही. परंतु तू या उपहाराचा स्वीकार कर.”

“आर्य, हा उपहार मी स्वीकार केला आहे. आता हा उपहार तिन्ही भागांमध्ये विभागून उलुपी, चित्रांगदा व सुभद्रेला पाठवा.” द्रौपदीने चक्रवर्ती समाज्ञीच्या राजरीतीप्रमाणे पेटीवर उजवा हात ठेवत म्हटले.

“द्रौपदी?” सर्व पाण्डव विस्मित झाले, याखेरीज मातलीसुध्दा. तिची त्यागवृत्ती अन् निर्मत्सरी प्रवृत्ती पाहून मातली अधिकच प्रभावित झाला.

“किंतु पांचाली! हे अलंकार तुझ्याकरिता आहेत ना, तू ही आभूषणे धारण कर.” भीमाने म्हटले.

“नाही आर्य, मी अलंकार धारण करणार नाही. कारण मला स्वतःचा आत्मसन्मान तसेच स्वतःच्या असन्मानाचीही जाण आहे.” द्रौपदी खिन्न स्वरात म्हणाली, ”आणि अजून एक, या मुक्त अपमानित केशांवर ही आभूषणे शोभणार नाहीत.”

“पांचाली?” तिचे शब्द ऐकून पाण्डव स्तंभित झाले.

“असं बोलू नकोस, कृष्णे! तुझ्या केशांवर हे अलंकार बध्द केल्यानंतर ही आभूषणे अतिशय सुंदर तसेच पवित्र होतील. ’’ असं प्रेमाने म्हणून झाल्यानंतर अर्जुन त्वेषाने म्हणाला, ”नि तू चिंता करू नकोस. तुझे मुक्त केश लवकरात लवकर बांधले जातील. त्या दुष्टाचे रक्तबिंदू तुझ्या केशांवर सांडल्याशिवाय कुठल्याही पाण्डवाला स्वस्थता लाभणार नाही.”

“आर्यपुत्र! शांत व्हा.” द्रौपदीने अर्जुनाचे दोन्ही हात हातात घेत विश्वासाने म्हटले, “मला विश्वास आहे, खात्री आहे की आपण सर्व पाण्डव महापराक्रमी, परमप्रतापी आहात. त्याकारणे आपण सर्व स्वतःवरील झालेल्या अन्याय-अत्याचाराचा प्रतिशोध घ्याल अन् मला न्याय द्याल.”

“तरीही तुला हा वनवास सोसावा लागत आहे.” अर्जुन पश्चातापाने म्हणाला.

“तुम्हा सर्वांच्या सान्निध्यात हे दिवसही सरतील. चलावे, आर्य! आपली क्षुधा प्रवासाकारणे प्रबल झालेली दिसते. आपण सर्वप्रथम भोजन करून घ्या.” असे म्हणून द्रौपदीने आश्रमात आसने मांडली. पांडवांचे लक्ष मातलीकडे गेले.

“हा कोण? अगदी देवेंद्राप्रमाणे तेजस्वी दिसत आहे!” भीमाने विचारले.

“मी मातली, इंद्रदेवांचा सारथी.” मातलीने सर्वांना प्रणाम केला.

“म्हणजे गुणकेशीचा पती ना?” द्रौपदीने विचारले.

“होय, मीच गुणकेशीचा पती- मातली. परंतु एक उत्तम आणि एक निकृष्ट वार्ता द्यायची आहे, मला.” मातलीने अर्जुनाकडे पाहत भयभीत होत म्हटले, “तेव्हा अनुमती असावी.”

“सांग, मातली.” युधिष्ठिर म्हणाला.

“स्वर्गात असताना इंद्रदेवाने पार्थाच्या गांधर्ववेदाच्या प्रशिक्षणाचे दायित्व अप्सरा उर्वशीकडे सोपविले होते. तेव्हा धनंजयाचे मदनालाही लाजवेल असे रुप पाहून उर्वशी मोहित झाली. तिने अर्जुनाकडे त्याच्या सहवासाची इच्छा व्यक्त केली. मात्र तिच्या इच्छेला अर्जुनाने विनम्रतेने नाकारले. त्याचे कारणही अर्जुनाने सांगितले की उर्वशी त्याच्या भरतवंशाच्या मूलपुरुषाची- पुरुरवाची पट्टराणी आहे. त्यामुळे ती त्याला मातेप्रमाणे आहे. असे वाटते, की त्याचे अजून कारण असेल, अर्जुनाचे

देवी द्रौपदी- सुभद्रेप्रति असलेले प्रेम.” मातलीचे शब्द ऐकून द्रौपदी लज्जित झाली.

“याकारणे उर्वशीने संतप्त होऊन त्याला शाप दिला, ”स्त्रैण हावभाव करत, मृदू वस्त्रे- कांकणे धारण करत व केशांची वेणी बांधून, तू नपुंसक होऊन स्त्रियांच्या समूहांमध्ये नृत्य करशील.” मात्र तिने इंद्राच्या आज्ञेनुरूप अर्जुनाला उःशाप दिला की, या शापाचा प्रभाव फक्त एक वर्षापुरता असेल, याशिवाय अर्जुन ते वर्ष स्वतःच ठरवू शकतो.” मातलीचे शब्द ऐकून द्रौपदीला अत्यंत धक्का बसला. कुठल्या स्त्रीला हे पीडादायक वाटणार नाही की तिच्या पती नपुंसक होऊन स्त्रैण वेशात नृत्य करेल?

“मातली, यातील कुठली उत्तम वार्ता आहे?” द्रौपदीने क्षोभाने म्हटले.

“हीच उत्तम वार्ता आहे, अर्जुन फक्त एकाच वर्षांकरिता नपुंसक होणार आहे आणि त्याने गांधर्व वेदाचे प्रशिक्षण घेतले आहे.” नकुलाने म्हटले.

“कुठल्याही वीरपुरुषाचे नपुंसकत्व कुठल्या प्रकारे उपयुक्त ठरतं?” भीमाने रोषाने म्हटले.

“अर्जुना, भ्रात्या! तुला ह्या शापाचं वैषम्य वाटतं ना? जे घडते ते चांगल्यासाठीच, तू इतकंच जाणून घे, विश्वातील प्रत्येक घटना घडते, ती

निरर्थक नसते. त्या घटनांचा संबंध मनुष्याच्या अथवा विश्वाच्या कल्याणासाठी जुळलेला असतो.” अर्जुनाच्या स्कंधावर हात ठेवत सहदेव म्हणाला, ”आणि तुला तुझ्या प्रश्नाचे उत्तर हवे होते ना? तर तुझ्या प्रश्नाचे उत्तर हेच आहे की विश्वातील जीव-जंतू, पशु-पक्षी, स्त्री-पुरुष एकमेकांशी अदृश्य ततूंनी जुळलेले असतात. किंबहुना, विश्वाचा संपर्क प्रत्येक जीवाशी असतो. म्हणून तर तुझ्या मस्तिष्काला ‘त्या’ घटनेचा संकेत प्राप्त झालाच असेल.”

“हे कसं शक्य आहे?” अर्जुनाला सहदेवाच्या शब्दांचा विस्मय वाटला.

“हे विश्व विशाल आहे अन् जटिलही. या विश्वातील प्रत्येक रहस्याचा उलगडा होईलच असे नाही.” सहदेवाने मंदस्मित केले.

“मात्र आताचा प्रश्न अजूनही तसाच आहे. आर्यपुत्र अर्जुनांचा हा शाप.... कसा उपयुक्त ठरेल?” द्रौपदीने विचारले.

“अज्ञातवासात हा धनुर्धारी पार्थ आपल्या विख्यात धनुर्विद्येचे प्रदर्शन करू शकतो का? याशिवाय या धनंजयाचे रुप, सौष्ठवपूर्ण शरीर फक्त स्त्रीवेशातच झाकले जाऊन शकते.” नकुलाने म्हटले.

“तोपर्यंत तू स्त्रैण स्वराचा, स्त्रियांच्या अविर्भावांचा तसेच चालीचा सराव कर आणि आपल्या केशांचीही निगा राख, अर्जुना!” युधिष्ठिराने

अर्जुनाला असे सूचित करत द्रौपदीला आज्ञा दिली, ”या धनंजयाला स्त्रैण प्रशिक्षण तू द्यावेस, कल्याणी.”

आता द्रौपदीची नवीन परीक्षा प्रारंभित झाली होती, अज्ञातवासाकरिता पतीला स्त्रैण हावभाव, अविर्भाव, हालचालींचे प्रशिक्षण देण्याची.

ही दुःखदायी परीक्षा असली तरी, द्रौपदीला ती परीक्षा धैर्याने व संयमाने पार करायची होती.

.... आणि द्रौपदी सज्ज होती, सदैवप्रमाणेच!

“**सं**मित, इतकीच वार्ता आहे तुझ्याकडे, की अजून काही सांगायचे आहे तुला? ”

“होय, देवी! राजकुमार अर्जुनांनी स्पष्ट नकार दिला, जेव्हा महाराणी द्रौपदी इंद्रदेवांनी दिलेली वस्त्रे आभूषणे नागकन्या उलुपी, राज्ञी चित्रगंदा व युवराज्ञी सुभद्रेला पाठवून देऊ पाहत होत्या, हेच सांगायचे होते मला.” संमितने लवून अभिवादन केले.

“आता तू प्रयाण करू शकतोस.”असे म्हणून सत्यभामेने सुभद्रेकडे वळून पाहिले.

अर्जुनाने फक्त द्रौपदीलाच स्वर्गीय, दिव्य अंलकार दिले, याकारणे सुभद्रेचा किंचित ईर्ष्येचा भाव उमटला होता. मात्र त्या ईर्ष्येस द्रौपदीच्या निस्वार्थ प्रतिक्रियेने नष्ट केली होते.

"सुभद्रे, ऐकलंस? तुझ्या ज्येष्ठ भगिनीलाच-द्रौपदीलाच अर्जुनाने इंद्रलोकीचे अलंकार- वस्त्रे दिलीत, मात्र तुला नाही." सत्यभामेने नापसंतीच्या स्वरात म्हटले, "तुला काहीच वाटत नाही?"

"भामे, माझा भ्राता कृष्ण म्हणतो तेच खरं, तुला स्थलकालाचा-परिस्थितीचा विवेकच नाही." सुभद्रा रोषाने म्हणाली.

"वा! मी तुझी कड घेते नि तू मलाच दोषी ठरवितेस!" सत्यभामेने स्कंध उडवले.

"तर भामे! मी काय अनुचित म्हटलं आहे? अगं पाण्डव- द्रौपदी कोणत्या परिस्थितीत जीवन कंठताहेत, याची चांगलीच जाण आहे ना तुला? देवी द्रौपदीचे वस्त्रहरण झाले आहे, कुठल्याही पाण्डुपुत्राने तिचे रक्षण केले नाही." सुभद्रेचा स्वर विषण्ण होता, "देवी द्रौपदी निश्चितच मनोमन दुःखी आहेत. त्या दाखवत नसल्या, तरीही त्यांची पीडा कळतच नाही, असे नाही. त्याकारणे त्यांना छोटासा उपहार देऊन आर्यपुत्रांनी त्यांच्या मनाला स्वस्थता-आनंद देण्याचा प्रयास केला, तर त्यात काय आपत्तीजनक आहे?"

"तरीही तुला दुःख वाटलं नाही की, तुझा पति तुझी अशी उपेक्षा करतो? भद्रे?"

“भामे, मला त्याचं दुःख वाटलं नाही. कारण देवी द्रौपदीने माझ्यासह अन्य सपत्नींचाही विचार केला.” सुभद्रेने म्हटले, ”अन् तू! पारिजातकाची पुष्पे कुठल्याच सपत्नीला देऊ इच्छित नव्हतीस ना?”

“पुष्पे माझीच होती म्हणून!” सत्यभामेने लाजत म्हटले.

“शेवटी ती पुष्पे रुक्मिणीच्याच कक्षाच्या गवाक्षात सांडलीच!” सुभद्रेने तिचा परिहास केला.

“ठीक आहे, ठीक आहे. भद्रे, तू सर्वप्रथम हे सांग, त्या द्रौपदीने तुझ्यावर अशी कुठली मोहिनी टाकली आहे, की तू तिच्यावरच प्रशंसेचा वर्षाव करत राहतेस?”

“कुठली मोहिनी वगैरे नाही. देवी द्रौपदीचे आचरण, वर्तन आहेच तसे! की कोणीही त्यांची स्तुती करावी.” सुभद्रेने सत्यभामेच्या नकळत पारिजातकाची माला आपल्या केशांत माळून घेतली.

“बरं, तू सांग, द्रौपदीचे आचरण कसे होते?” सत्यभामेचे लक्षच नव्हते, सुभद्रेच्या कृतींकडे.

“भामे, मी तरी तिचं आचरण पूर्णपणे कुठे पाहिलंय! तरीही मला ज्ञात आहे, ते तुला सांगते. परंतु एक लक्षात घे, सत्ये! मी तुला जे सांगेन, तो फक्त देवी द्रौपदीच्या आचरणाचा, स्वभावाचा, वर्तनाचा एखादा अंशच असेल.”

“असं का, भद्रे? तू तर तिच्या अत्यंत निकटची भगिनी आहेस.”

"भामे, तुला ज्ञात नाही का, मी खूप कालानंतर पांडव परिवारात वधूरूपाने प्रविष्ट झाले होते? माझ्या आगमनापूर्वी प्रत्येक पांडवांनी अनेक उपपत्नी केलेल्या होत्या. याखेरीज राजसूय यज्ञ व दिग्विजयाची सज्जता आरंभित झाल्यानंतर देवी द्रौपदी अविश्रांत कार्यक्रमणेमध्ये रत झाल्या होत्या. त्यामुळे त्यांना जाणून घेण्याकरिता मला समय प्राप्त झालाच नाही."

"अस्सं! तुला जितकं ज्ञात आहे, तितकं सांग, भद्रे!"

"त्यांनी प्रत्येक पाण्डवाचे नव्हे, तर प्रत्येक पाण्डवस्त्रीचे अन् प्रत्येक परिवारजनांचे हृदय जिंकून घेतले आहे. याशिवाय देवी द्रौपदीने राजनीती, अर्थव्यवस्था अथवा कोणत्याही राजनैतिक, आर्थिक कार्यासंबंधित कुठलीही सूचना केली, तर पाण्डव तिचे मत जाणून घ्यायचे. तिचे मत उचित वाटले, तरच ते त्यानुरूप कार्य करायचे. याशिवाय पाण्डवांच्या प्रत्येक कार्यात ते कार्य राजनैतिक असो वा वैयक्तिक, देवी द्रौपदी जातीनं लक्ष घालायच्या. तिच्या प्रत्येक मताचा, शब्दाचा आदर पाण्डव करायचे. याखेरीज सभा-समितीत सहभागी होण्याचा अधिकार स्त्रियांना असला तरी, ...आपलं मत व्यक्त करायचा अधिकार नसतो. मात्र देवी द्रौपदी सभेत आपलं मत सदैव व्यक्त करायच्या." सुभद्रा सांगत होती.

“भद्रे, पाण्डवांनी हे सर्व अधिकार द्रौपदीला देऊ केले असतील, उदारपूर्ण दृष्टिकोनाने!”

“मलाही तसंच वाटतं, भामे!” सुभद्रा सहमत झाली.

“म्हणजे पाण्डुपुत्रांवर द्रौपदीचे पूर्ण नियंत्रण होते तर!” सत्यभामा म्हणाली.

“अगं, तसं काही नाही. भ्राता कृष्ण म्हणतो तेच खरं, तुझ्याकडे सारासार विचार करण्याची बुद्धीही नव्हे.” सुभद्रेने मान झटकली.

“परत तेच? भद्रे, तू खरं ते सांग.”

“भामे, जर देवी द्रौपदीचे पाण्डवांवर पूर्णतः नियंत्रण असते, तर त्यांनी अनेक स्त्रियांशी विवाह केले असते का? इतकं मलादेखील कळतंच.” सुभद्रेने पुनः मान झटकली.

“बरं, तुझा भ्राता श्रीकृष्ण माझ्याविषयी काय काय सांगत असतो?” सत्यभामेने असं म्हटल्यानंतर सुभद्रा उठली, “मला अभिमन्यूच्या गदायुद्धाच्या प्रशिक्षणाचे निरीक्षण करायचे आहे, मला जावेच लागेल.”

……. असे म्हणून सुभद्रेने काढता पाय घेतला.

**रा**त्रीचा समय होता. आकाशात चांदण्या टीमटिमत होत्या. पिठुर चंद्रप्रकाश गवाक्षातून हिऱ्या-माणकांत परावर्तित होत होता.

तोच चंद्रप्रकाश दर्पणावर पडून सत्यभामेच्या मुखावर येत होता. सत्यभामा आपली कर्णफुले, रत्नहार काढून ठेवत होती.

"भामे...." तिच्या कानांवर कृष्णाचा स्वर पडला.

त्याच्याकडे सत्यभामेने लक्षसुद्धा दिलं नाही. ती रुष्ट होऊन मंचकाच्या दुसऱ्या बाजूला जाऊन बसली, मुख दुसरीकडे वळवून.

कृष्ण आपला मुकुट तसेच आभुषणे उतरवीत तिच्याजवळ आला. त्याने भामेच्या स्कंधावर अलगद हात ठेवले, तसे सत्यभामेने आपले स्कंध झटकले.

"रुष्ट आहे वाटतं, आमची सुप्रिय अर्धांगिनी!" कृष्णाने लाडिकपणे म्हटले.

"श्रीकृष्ण, हा कोणताही हसण्याचा विषय नव्हे! मी निष्कारणच रुष्ट होत नाही!" सत्यभामेने आपली मान फिरवली, दुसरीकडे.

"अस्सं तर! मला सत्यभामेच्या नवा हट्ट पूर्ण करायचा आहे, तरच माझी भामा तिच्या प्रिय नावाने मला साद घालील!" कृष्णाने सत्यभामाची हनुवटी अलगद धरली.

"माधव, मला रत्ने, अलंकार अथवा पारिजातक नको."

“काय सांगतेस? तुला यापैकी काहीच नको? खरंच नको का?” कृष्ण चकित झाला.

“माधव, मला खरंच जे हवं होतं, ते आपण कधीच दिलं नाही.” सत्यभामेच्या स्वरात तक्रार होती.

“ठीक आहे. मी आता देतो. तू सांग तरी, भामे!”

“मला उचित तो सन्मान द्या, माधव. हेच तुम्ही देत नाही.”

“का? असं का म्हणतेस? मी तुला, तुझ्या इच्छा-आकांक्षाना सन्मान देत नाही का? महत्त्व देत नाही का?” कृष्ण दुखावल्या स्वरात म्हणाला.

“उचितच आहे ना, मी द्रौपदी आहे का?” सत्यभामेने आता द्रौपदीशी स्वतःची तुलना केली. तेव्हा मात्र कृष्णाला क्रोध आला, “हे काय, भामे? यापूर्वी तू जे बोललीस, त्यावरून मला वाटलं होतं की, तुला परिपक्वता आली आहे. मात्र आता हे कसले बालिशपण? तू आपल्या दोघांमध्ये द्रौपदीला का आणतेस? तिचा काय संबंध?”

“पाहिलं हं, माधव. मी द्रौपदीचा विषय काढला की तुम्ही असेच क्रुद्ध होता म्हणजे द्रौपदीप्रति अधिक सन्मान अन् माझ्याविषयी अत्यल्प सन्मान आहे आपल्या मनात.”

“भामे, सन्मान अधिक की अत्यल्प असल्याचा प्रश्न नाही. मी प्रत्येक स्त्रीला उचित तो सन्मान देतो.” कृष्णाने स्पष्टपणे म्हटले.

"फक्त या सत्यभामेला सोडून." सत्यभामेने कृष्णाच्या विधानाला अन्पुष्टी जोडली.

"भामे, हे काय चालवलंस? जे काय आहे, ते स्पष्ट सांग ना."

"मी ऐकलंय, आपण सुभद्रेजवळ माझी निंदा करत राहता."

"तू सुभद्रेचं काय ऐकतेस? ती अजून लहान आहे. तिला काहीच कळत नाही." कृष्णाने तिच्या स्कंधास थोपटले.

"तिला कळत नाही, मला तर कळते आहे ना!" सत्यभामेच्या स्वर रडवेला झाला, "तुमच्या मते, मी अल्पज्ञानी, बालिश, विवेकहीन, सारासार विचार न करणारी स्त्री आहे ना! मी काही मागितलं, म्हणजे तुमच्या मार्गात बाधा उत्पन्न होतात! मला हवे ते सदैव त्या रुक्मिणीला मिळत राहते. आणि मला काही देताना तुम्ही रुक्मिणीलाही ती वस्तू देऊ पाहत असता. म्हणजे माझ्या वाट्याला शून्यच येतं."

हे ऐकून कृष्ण मनोमन म्हणाला, " सुभद्रे! तुला एवढं सगळं सांगण्याची आवश्यकता होती का? त्याकारणे ही भामा नवीन वाद-प्रतिवाद करते आहे."

अकस्मात सत्यभामेने रुदन करणे आरंभित केले. कृष्णाने तिला जवळ घेत म्हटले, "सत्यभामे! रुक्मिणीपेक्षा मी तुझ्याच इच्छा पूर्ण करत आलेलो आहे. रुक्मिणी माझी ज्येष्ठ पत्नी असूनही मी तिच्यापेक्षा तुला

अधिक महत्त्व दिलं, अधिक प्रेम केलं, तुझे हट्ट कितीही अयुक्त असो, मी ते सर्व पूर्ण केले आहेत ना!"

"तरीही मी तुमची प्रिय नाही ना? कारण मी द्रौपदीप्रमाणे कधीही विशेष पतिसेवा केली नाही, पतिची विशेष काळजी घेतली नाही , पतीच्या राजनीतीत कधीच हस्तक्षेप केला नाही, तुमच्यासह मी विपत्ती झेलल्या नाहीत ना, म्हणून मी आपणांस प्रिय नाही का?" सत्यभामेने आपले अश्रू पुसले, आपल्या वस्त्राच्या टोकाने.

"भामे, मनुष्याने लहान तोंडी मोठा घास घेऊ नये. जितकं शक्य आहे, तितकंच करावं. उगाच उदात्त, अत्युच्च करण्याची जोखीम पत्करू नये. प्रत्येकालाच दुसऱ्यासारखं होणे अथवा आचरण करणं संभव नसतं." कृष्ण स्थिर स्वरात म्हणाला.

"तुम्हांला सदैव माझ्यातील कमतरताच दिसल्या आहेत. तुम्हाला माझ्यातील कुठलीच क्षमता दिसली नाही." सत्यभामेने दासीला संकेत केला, "मधुरे, माधवांचं प्रिय असलेलं नवनीत तयार ठेव. मी स्वतःच्या हाताने त्यांना खाऊ घालेन."

"हे काय, भामे? हे सर्व करण्याची काय आवश्यकता आहे? ती स्वतःच्या हाताने खाईन गं." कृष्णाने म्हटले.

“देवी, हे नवनीत कधीच तयार आहे. श्रीकृष्णांच्या भोजनाच्या वेळा आम्हाला ज्ञात आहेत.” मधुरेच्या शब्दांनी सत्यभामेचा चेहरा पडला. आपल्यापेक्षा ह्या मधुरेला माधवांविषयी अधिक ज्ञात आहे!

“पाहिलंस, भामे?” कृष्ण परिहासाच्या मिषाने म्हणाला.

“हं.” सत्यभामा रोषाने निघून गेली. मात्र ती परतली ते नवनीताची पात्रे घेऊन!

“हे घ्या, ग्रहण करा.” सत्यभामेने कृष्णाला नवनीत भरवत म्हटले. कृष्णाच्या अधरांवर काहीसे नवनीत चिकटले. सत्यभामेने ते नवनीत आपल्या वस्त्राने पुसले.

“परत तेच? नको, प्रिये, इतकं करू नकोस. तू अशी सेवा करू लागलीस, म्हणजे मला निष्कारणच कसंकसं वाटतं.” कृष्ण आपले हास्य लपवीत म्हणाला.

“माधव, तुमची सखी द्रौपदीही आपल्या पतींची अशीच सेवा करत असेल ना?” सत्यभामेच्या पुनः बालिश प्रश्न.

“अगं, प्रियतमे!” कृष्णाने सत्यभामाचे गाल ओढत म्हटले, ” मला पांडव-द्रौपदीच्या व्यक्तिगत जीवनातील प्रत्येकच बाब ज्ञात असते का?”

“मला सांगा, तुम्ही द्रौपदीला का सखी मानलं? तिने आपल्या पतींना नियंत्रणात ठेवलं, त्यामुळे तुमचा कार्यभार घटला; म्हणून ना.”

“तुझ्या प्रश्नाचं हे उत्तर असू शकत नाही, भामे.”

“तर, माझ्या प्रश्नाचे खरं उत्तर काय आहे?”

“तू द्रौपदीलाच हे सर्व प्रश्न विचार की तिने पांडवांना कसं आपल्या नियंत्रणात ठेवलं? मी तिला सखी का मानलं?” कृष्णाने सर्व दीपक विझवले, ” आपण प्रातकाल झाल्यानंतर काम्यकवनाकडे प्रयाण करुया म्हणजे तुला तुझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतील.” अंगावर शाल ओढून कृष्ण मंचकावर पहुडला.

“माधव, मी आपली पादसेवा करते. मी आपले चरण चुरते.” सत्यभामेने म्हटले.

“भामे, तू झोप. मला पादसेवेची आवश्यकता नाही.”

त्यावर काहीच न उत्तर देता सत्यभामा पहुडली……

“हे अत्यंत अनुचित आहे, पांचाली!” अर्जुन रोषाने म्हणाला, “मी नसताना, सखा तुम्हांला कसा भेटून गेला? आता माझ्या आगमनानंतर कृष्णाचा साधा संदेशही नाही? मला हे मुळीच रुचलं नाही.”

“त्याला अनेक कार्ये असतात द्वारकेत!” पांचाली समजूतदारपणे म्हणाली.

“असतील अनेक कार्ये; त्याने हातातली अनेक कार्ये टाकून यायला हवं, मित्राला भेटायला! त्याचा प्रिय सखा- पार्थ, इतक्या वर्षांनी पृथ्वीवर परतला तर, त्याने अनवाणी पावलांनी धावतच मला भेटायला आले पाहिजे, जसा तो सुदाम्याला भेटायला धावला होता!” अर्जुनाला पांचालीने सांगितलेले कारण पटले नाही.

“तू काय स्मरण केलेस, मी खरोखर धावत आलो आहे.” अकस्मात पर्णकुटीच्या द्वारात आलेला कृष्ण कवाड धरत खाली बसला, ”असा धकाधकीचा प्रवास करून आम्ही उभयंता- मी व सत्यभामा अत्यंत श्रांत झालो आहोत.”

“अरे, सख्या! तू आलास. आम्ही तुझेच स्मरण करत होतो. मी तुला जल घेऊन येते.” असे म्हणून द्रौपदी लगबगीने आश्रमात गेली अन् तिने कृष्णाच्या आगमनाची सुखद वार्ता सर्व पाण्डवांना सांगितली.

तसा कृष्णाचे आतिथ्य करण्यासाठी युधिष्ठिर द्रौपदीसह बाहेर आला. त्याच्यासोबत त्याचे अन्य भ्रातेही आले.

“कृष्णा! अकस्मात सपत्नीक? आम्हाला वाटतं होतं, तू यादवांसमवेत येशील.” युधिष्ठिराने म्हटले.

“ज्येष्ठ भ्रात्या! सत्यभामेचा आग्रह अत्यंत दृढ होता, म्हणून मी तिलाही घेऊन आलो आहे.” कृष्णाने जल ग्रहण केले.

“आग्रह? कसला आग्रह?” अर्जुनाने म्हटले, ” म्हणजे केशवा, तू सत्यभामेच्या आग्रहास्तव येथे आला आहेस, मला भेटण्याकरिता नव्हे.”

“मी तुलाच भेटायला येत होतो, पण सत्यभामेनेही माझ्यासह चलण्याचा आग्रह धरला. त्यामुळे मी तिला घेऊन आलो.” कृष्णाने दुसरे निमित्त शोधलं.

“ क्षणाक्षणाला उत्तर बदलू नकोस, केशवा!” अर्जुनाने म्हटले, “मला कळतंय सारं.”

“आर्य, कृष्ण आणि सत्यभामा अत्यंत श्रांत आहेत, त्याकारणे त्यांना आपण सर्वप्रथम भोजन प्रदान करु. त्यानंतर आपण आपल्या सख्यासह मैत्रीसंवाद करू शकता.” द्रौपदीची समयसूचकता पाहून सत्यभामा विस्मित झाली.

आणि आश्चर्य म्हणजे पाण्डवही तिच्या शब्दांना दुजोरा देत हात-पाय धुवून पाटांवर आसनस्थ झाले.

कृष्ण- सत्यभामाही पाटावर आसनस्थ झाले. सत्यभामेला वाटलं, पाण्डव द्रौपदीची प्रत्येक गोष्ट ऐकतात अन् मान्यही करतात.

तितक्यात मित्रसेनाने पत्रावळ्या मांडल्या नि इंद्रावतीने जलपात्रे.

“मला वाटतं, द्रौपदी या सेवकांद्वारेच भोजन वाढेल. ती स्वतः भोजन वाढणार नाही.” असा सत्यभामेने विचार केला.

काही क्षणांत आपल्या हातांत भोजनाची पात्रे घेऊन द्रौपदी स्वतः पाकगृहाबाहेर आली.

तिने अतिथ्याच्या व गृहस्थीच्या रीतीनुसार सर्वप्रथम कृष्णाला, भामेला भोजन वाढलं.

कृष्ण क्षणाचीही उसंत न घेता भोजन ग्रहण करू लागला.

द्रौपदीच्या हातच्या भोजनाला खरंच विशिष्ट स्वाद आहे का, की माधवही इतक्या अधीरतेने भोजन ग्रहण करतात?

द्वारकेच्या राजगृहात असताना माधव राजसी पदार्थ- पंचपक्वान ग्रहण करतात, किंतु इतकी अधीरता ते करत नाहीत.

याशिवाय पाण्डवांकडून परतल्यानंतर माधव तिच्याच भोजनाची स्तुती करत असतात.

सत्यभामेने प्रथम घास उचलला- ग्रहण केला. तिच्या तोंडून तिच्याच नकळत उद्गार निघाले, " द्रौपदी, भोजनाचा स्वाद अतिउत्तम आहे!"

"का अतिउत्तम असणार नाही? आमची पांचाली साक्षात अन्नपूर्णा आहे, सत्यभामे!" भीमाने पांचालीची प्रसंशा केली.

भीमाच्या तोडून पांचालीची स्तुती ऐकून सत्यभामेला वाटलं, माझ्यापेक्षा ही पांचाली भाग्यवती. माधव तर माझी शब्दानेही साधी प्रशंसा करत नाहीत, उलट सुभद्रेकडे माझी निंदा करत राहतात.

“माझ्याही हाताला स्वाद आहे. मी सांध्यकालीन भोजन निर्माण करीन.” सत्यभामेला नकार देत नकुलाने म्हटले, “भामिनी, तू तर आमच्या गृही अतिथी आहेस. तू निष्कारण कष्ट का घेतेस? तू विश्राम कर.”

“काय आहे ना, पाण्डुपुत्रांना आपल्या हृदयेश्वरीच्या हातचंच भोजन प्रिय आहे.” कृष्णाचा या शब्दांवर मंदस्मित करत द्रौपदीने पाण्डवाच्या पत्र्यावळयांत अधिक भोजन वाढले.

“तुम्हालाही तुमच्या सखीचंच भोजन प्रिय आहे ना?” सत्यभामेने म्हटले.

“अर्थातच.” कृष्ण भोजन ग्रहण करत म्हणाला.

सत्यभामा रुष्ट झाली अन् ती भोजन करेनाशी झाली. ते पाहून कृष्णाने तिला हळू स्वरात म्हटले, “ हा रोष पाण्डवांसमोर प्रदर्शित करण्याची आवश्यकता नाही. तू जरा शांत रहा.”

“भामिनी, भोजन ग्रहण कर. जो रोष अशा सुग्रास भोजनाला नाकारू पाहतो, तो रोष अनुचित असतो.” सहदेवाने म्हटले, तसे सत्यभामेने भोजन ग्रहण करण्यास आरंभ केला.

“सत्यभामे, तुला अधिक पदार्थ वाढू का?” द्रौपदीने विचारले.

“नको, त्याची आवश्यकता नाही.” सत्यभामेने औपचारिकपणे म्हटले, “मी हात धुते, माझं भोजन झालं आहे.”

“हा कलश घे आणि हात धू पाहू, अंगणात.” द्रौपदीची शासनप्रियता पाहून सत्यभामेचा प्रभाव काहीसा घटला.

….. अन् ती अंगणात निघून गेली, हात धुण्याकरिता!

❁ ❁ ❁

“**क**ल्याणी, भोजन अत्यंत स्वादिष्ट झाले होते. आम्ही सर्वजण शतपावली करून येतो.” युधिष्ठिराने पांचलीला सूचित केले, “ तू सत्यभामेसह येथे राहून आश्रमातील शस्त्र -वस्त्रांचे, रत्न -आभूषणादि सामुग्रीचे रक्षण करावेस.”

“माधव, आपणही मला असं एकटीला सोडुन शतपावली करायला जाणार?” सत्यभामेने लज्जित होत विचारले.

“तुला द्रौपदीसह वार्तालाप करण्याची इच्छा होती ना?” कृष्णाने सत्यभामेला हसत म्हटले.

“अवश्य, आर्य! आपण यावे.” सत्यभामेने प्रथमतः स्यपक्वतेची भूमिका धारण केली.

तसा कृष्ण तिच्या गालांना स्पर्श करून पाण्डवांसह निघून गेला.

जातां- जातां त्याने द्रौपदीकडे वळून पाहिले, द्रौपदीची दृष्टी त्याच्या दृष्टीला भिडली, कृष्णाने तिला दृष्टीनेच सावध केले.

त्याच्या दृष्टीतील संकेत उमजून तिने हृदयावर पाषाण ठेवला, नि सत्यभामेचे प्रश्न ऐकण्याची- त्या प्रश्नांची उत्तरे देण्याची सज्जता ठेवली

“भामे, तू या मृगचर्माच्या आसनावर बस. तुझ्यासाठी येथे राजसिंहासन नाही.” सहज परिहास करत द्रौपदीने सत्यभामेला मृगाजिनावर बसवले.

“पांचाली, मी राजगृहात असुनही तुझ्यासारखी भाग्यवान आहे का? मला हे मृगाजिनही आसनाकरिता चालेल.” सत्यभामेच्या स्वरात ईर्ष्या, विस्मय, स्वतःच्या भाग्याविषयी खेद आणि दुःख अशा संमिश्र भावना होत्या.

सत्यभामेचे शब्द ऐकून द्रौपदी प्रचंड दुखावली गेली. असं काय होतं तिच्या भाग्यात? की कृष्णाची पत्नी होण्याचं सुभाग्य लाभलेल्या सत्यभामेने असं म्हणावं?

या बालबुध्दीच्या सत्यभामेला कसं सांगावं, आपलं भाग्य कधीच स्थिर नव्हतं. सर्वप्रथम आपल्या मनी अर्जुन होते, तरीही राजमातांच्या आज्ञेनुसार आपले पाचही पाण्डवांत विभाजन झाले होते, एखाद्या वस्तूप्रमाणे! त्यामुळेच त्या सूतपुत्र कर्णाने माझ्या त्या मर्माचा धागा पकडून माझ्या चारित्र्यावर शिंतोडे उडविले.

द्रौपदीच्या मुखावर क्रोधाची रक्तिमा चढली होती. ते विचार झटकताच अन्य पीडादायी विचार-याशिवाय आपल्या भाग्यात सदैव द्विधा, विपत्ती संघर्ष आहेतच! पाचही पाण्डुपुत्रांसह कालक्रमणा करताना होणारी ओढाताण, वारंवार मनात उद्भवणारे द्वंद्व आताही स्मरते.

आणि वस्त्रहरण! कधीही न विसरता येणारा भयानक प्रसंग! माझ्याच ज्येष्ठ पतीने माझे पणन्वयन केले. आणि तो भीषण अवमान.......

कृष्णे, कृष्णे! ते विचार सध्यातरी सोड. मला ज्ञात आहे, ते विचार तुझी पाठ सोडत नाहीत. सावर स्वतःला, कारण याक्षणी तुला कोणी सावरणार नाही, अशा विचाराने तिने स्वतःला सावरले.

तरीही सत्यभामेच्या प्रश्नाने तिचे मन खिन्न झाले. आपल्या जीवनात इतकं सर्व काही घडलं, जे कुठल्याही स्त्रीला असहनीय आहे. आपलं भाग्यच असं आहे, जे अवांछनीय आहे. मात्र भामा माझं भाग्य का इच्छिते आहे? अथवा हे सर्व कळत असूनही ती असा का प्रश्न करते आहे? खरोखरच ही सत्यभामा वस्तुस्थितीबाबत अनभिज्ञ असावी. पांचालीने मनोमन स्वतःचीच समजूत घातली.

"भामे, सखे, मी भाग्यवान कशी आहे, ते सांग. जिच्यावर अन्याय होऊनही जिला वणवण भटकावे लागते, तिच्यावर कोणती भाग्यलक्ष्मी

प्रसन्न आहे, हे तरी मला सांग.'' तिने स्वतःला सावरत, काहीशा कठोर स्वरात सत्यभामेला विचारले.

"भाग्यलक्ष्मी नव्हे, स्वयं तिचे पती व माझा पती.'' सत्यभामेने तर्कहीन युक्तिवाद केला.

''काय? तुला काय म्हणायचं आहे? मला काहीच कळलं नाही.'' द्रौपदीला भामेच्या शब्दांचा आशय पूर्णतः कळला नाही.

''तुझे पती तुझ्या अगदी स्वाधीन आहेत, असे मी ऐकले आहे- स्वयं माझ्या पतीच्या तोंडून, अन् सुभद्रेनेही मला तेच सांगितले आहे!'' सत्यभामा आपल्या वस्त्राच्या टोकाशी बोटांनी खेळत म्हणाली, ''माझ्या पतीशीही तुझे सख्य आहे. माझ्या पतीशी तुझा असलेला मुक्त स्नेहबंध, मैत्री, एकत्र वार्तालाप, विहार करणे हे सर्व काही आणि यावर तुझ्या पतींचा कधीच आक्षेप नव्हता, आताही नाही. मी असे नैमित्तिक जीवनात पाहते की परपुरुषाशी साधा वार्तालाप केला, तरी पती संतप्त होऊन स्त्रीच्या चारित्र्यावर संशय घेतो. मात्र तुझ्या पतींचा तुझ्यावर विश्वास आहे.''

''सत्यभामे, पाण्डवांचा फक्त माझ्यावर नव्हे, तर तुझ्या पतीवरदेखील विश्वास आहे.'' द्रौपदीने स्पष्टपणे म्हटले.

"मात्र तुझे पती तुझ्या अगदी स्वाधीन आहेत, हे सत्य आहे ना?'' सत्यभामेच्या शब्दांवर द्रौपदीने म्हटले, ''भामे, पुरुषाची प्रवृत्ती निसर्गतः

सत्ता अथवा अधिकार गाजवण्याची असते. त्याला कुणाच्याही स्वाधीन राहणे प्रिय वाटत नाही. आणि आपल्या स्त्रीला वशीभूत राहणे तर नाहीच नाही. त्याकारणे महापरमप्रतापी, प्रख्यातपराक्रम असलेले तसेच लोकोत्तर पुरुष असलेले माझे पती माझ्या स्वाधीन कसे राहतील? याउलट मलाच प्रत्येक पांडवाच्या रुची- अभिरुचीचे, इच्छांचे- सुखांचे संवहन करणे, त्यांचे रोष स्वीकारणे, त्यांना एकसमानच प्रसन्न करणे, त्यांना एकासमयीच सुखी करणे, हीच दुष्कर कार्ये करावी लागतात. अन्यथा त्यांचा क्रोध मलाच सहन करावा लागतो."

"माझा पती असत्य कथन करत आहे? की मला चुकीचं ऐकू आलंय? की माझा पूर्वग्रह झाला आहे?" सत्यभामा पटकन बोलून गेली.

"तसं काहीच नाही. पाण्डुपुत्र माझे मत जाणून घेतात, हेच खरं."

" म्हणजेच पांडव तुला वशीभूत आहेत. याशिवाय तुमच्या पतींना अनेक उपपत्नी असूनही तूच त्यांना सर्वाधिक प्रिय आहेस आणि या अन्य पांडवस्त्रिया तुझ्या आज्ञांकित असतात. इतकेच नव्हे तर, सुभद्राही तुझं गुणगान करत असते. म्हणजे तुला सपत्नी असूनही तुम्हा पांडवस्त्रियांत कधीच मतभेद झाले नाहीत." सत्यभामेने जल ग्रहण केलं, काही क्षण उसंत घेतली, " कृष्णे! आमचे मात्र उलटं आहे. आमचा एकच पती माधव अन् आम्ही अष्टनायिका, त्यानंतर षोडस सहस्त्र उपस्त्रिया! पाहिलंस द्रौपदी, आमचा पती आमच्या सान्निध्यात नसतोच

कधी. माधव कधी तुझ्या रक्षणार्थ धावतात तर, कधी अर्जुनाच्या अनुरंजनाची व्यवस्था करतात.”

“भामे, आपल्या पतीची तक्रार वा व्यक्तिगत वैवाहिक जीवनातील अशी बाब कुणालाही सांगू नये, अन्यथा वैवाहिक जीवनात विश्वास कमी होऊन संशयाला स्थान निर्माण होते.”

“परंतु माझे शब्द सत्यच आहेत. म्हणून तू मला सांग, तू तुझ्या पतीला वश करण्यासाठी काय काय करतेस, पांचाली?”

“पतीला कधीच वश केले जात नाही. कारण नात्यांमध्ये किंबहुना पती-पत्नीच्या नात्यामध्ये असे काहीही करणे अनुचित आहे.” द्रौपदी स्पष्टपणे म्हणाली, “ आणि मी असं काहीच करत नाही.”

“नाही, द्रौपदी! तू निश्चितच पांडवांवर कुठल्यातरी मंत्राचा प्रयोग केला असशील. मी तर असे श्रुत आहे, की कित्येक स्त्रिया व्रतवैकल्ये करून, औषधींचा उपयोग करून, तंत्रमंत्राचा प्रयोग करून, जडीबुटी अथवा वशीकरण व तत्सम विद्यांचा वापर करून आपल्या पतीवर नियंत्रण प्राप्त करतात. अन् ते सर्व उपाय केल्याकारणे पती अगदी त्या स्त्रीच्या अधीन होतो. तूही असंच केलं असेल, पांचाली.” सत्यभामेच्या शब्दांना बालिशपणा समजावा की अज्ञान, हेच द्रौपदीला कळेना.

“भामे, भगिनी! तू हे काय म्हणतेस? माझ्या कल्पनीही नाही हे सर्व. याखेरीज असाध्वी स्त्रियांच्या अथवा तंत्र-मंत्रश्रद्ध स्त्रियांच्या मार्गांविषयी

जाणून घेऊ इच्छितेस? हे अनुचित आहे. तूही हे उपाय करण्याचा प्रयत्नही करु नकोस. जर पतीला ते कळेल तर, तोच उद्विग्न होईल." द्रौपदीने सत्यभामाचे हात हाती धरले, " सखे, तू म्हणतेस, ते प्रयोग मी केले असेल असा वेध घेणेही उचित नव्हे."

"परंतु हे मार्ग का अनुचित आहेत, पांचाली?"

" कारण कधी- कधी पतीपत्नीच्या नात्यातील असलेल्या अविश्वास व स्त्रियांच्या मंत्र-तंत्रावरील विश्वासाचा शत्रू लाभ घेतात नि ते पत्नीच्या हातून विषारी जडीबुटीही देतात, ज्याकारणे पतीला अंधत्व, विभिन्न व्याधी, जडत्वही होऊ शकते, कधी-कधी अपमृत्यूही उद्भवू शकतो." द्रौपदीच्या शब्दांनी सत्यभामा स्तंभित झाली, "खरंच?"

"अगदी सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे हे! त्याहूनही एक सुंदर व नितळ जलाप्रमाणे स्वच्छ असलेला अगदी सत्य असा उपाय मी तुला सांगते, जो मी स्वयं करत असते. आपल्या पतीचे हृदय जिंकून घ्यायचं असेल, तर प्रेम आणि सेवा या दोन्ही मार्गांतच आपलं श्रेयस आहे." द्रौपदी आत्मविश्वासाच्या स्वरात म्हणाली, "मी स्वतःही स्वतःच्या पतींवर निस्सीम प्रेम करते आणि माझी महत्ता, कीर्ती, कल्याण त्यातच सामावलेले आहे."

“द्रौपदी, फक्त प्रेमानेच पतीचे हृदय जिंकून घेणे संभव असतं तर, माधवांनी आयुष्यभर द्वारकेत निवास केला असता, आमच्याच सान्निध्यात.” सत्यभामा रुष्ट झाली.

“सत्यभामे, प्रेम म्हणजे काय करतेस तू? असं प्रेम करतेस तू? माझी तुमच्यावर अनंत प्रीती जडलेली आहे, मी तुमच्याकरिता संपूर्ण विश्वाचा त्याग करेन, मी पंचप्राण ओवाळून टाकेन, असे सारखे बोलत राहणे म्हणजे प्रेम नव्हे. ही असत्य आश्वासने आयुष्यभर वैवाहिक जीवन जगण्याकरिता पुरेशी नसतात. मग तरीही ही आश्वासने प्रियवराची असो वा प्रियतमेची.” असं म्हणून द्रौपदीने सत्यभामेला फळे दिली, “ही फळे ग्रहण करता- करता ऐक, मी काय सांगते ते. हे पहा, प्रेम मनापासून करायचं असतं अन् ते न बोलताच मनाला, आत्म्याला उमगायला हवं, कृतीतून त्याचे विविध पदर उलगडायला हवेत.”

“आता तू आत्मा- मनाशी संबंधित सांगू नकोस. माझा त्यात रस नाही वा गतिही नाही.” सत्यभामेने फळे ग्रहण केली.

“तर मी माझी स्वतःची आचरणशैली सांगते, मी माझ्या पतींसह कसे आचरण करते व पाचही पांडवांशी माझे भावबंध कसे आहेत, हेही तुला सांगते.” द्रौपदीने म्हटले, ”तुझ्या मनातील सर्व आशंका, प्रश्न, संशयाचे निरसन होईल.”

“ काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या विकारांचा त्याग करून मी आपल्या पतींची मनोभावे सेवा करते. तुला ज्ञातच आहे, अग्निज्वलंत क्रोध हा तर माझा स्वभाव आहे. मात्र त्या क्रोधाला नियंत्रण करणे आवश्यक होते म्हणून मी संयम व धैर्याचे वेग माझ्यासमवेत घेतलेले आहेत. वैवाहिक जीवनात सतत क्रोध, रोष व्यक्त करणे उचित नसते. अन्यथा आपला सहगामी आपल्या वर्तनाकारणे असंतुष्ट राहतो.

याशिवाय पतीच्या चुकीची अथवा त्याच्या अपगामी कृतींची वारंवार जाणीव करून देऊन त्याला तणावग्रस्त करणे उचित नसते. याचा अर्थ असाही नव्हे, पतीने नाकर्तेपणा केला, त्याच्या वर्णधर्मानुरुप कार्ये नाही केली, तरी त्याचे नैतिक अधःपतन होताना पाहणे. त्याला उचित समयी, उचित प्रकारे समजावले पाहिजे, वेळप्रसंगी काहीसे कठोर भाष्यही केले पाहिजे.

याखेरीज मी कोणत्याही परिस्थितीत ईर्ष्यावान होत नाही. मी माझ्या अन्य सपत्नींचा मस्तर करत नाही अथवा त्यांनी सपत्नीला माझ्यापेक्षा अधिक प्रेम दिले, उपहार दिले असा कधीच उल्लेख माझ्या पतींपुढे करत नाही, सत्यभामे.”

“तर सुभद्रेच्या वेळी का रुष्ट झालीस, द्रौपदी?”

“सत्यभामे, त्या रोषात दुःख होते. एखाद्या स्वाभिमानी स्त्रीला मत्सर वाटत नसला, तरी तिचे मन दुखावले जातेच. आणि तो रोष तुझ्या पतीवर- माझ्या सख्यावर होता. त्याने सुभद्राहरण घडवून आणले होते.”

“परंतु, कृष्णे! पतीने आपल्या अन्य सपत्नीची स्तुती केली अथवा एखाद्या सपत्नीने आपल्यापेक्षा अधिक आपल्या पतीची सेवा केली तर, मत्सर उद्भवणे साहजिकच आहे.”

“जरी मत्सर उद्भवला, तरी असा विचार करावा, असूयेने राजसिंहासन प्राप्त होत नाही, तर पतीच्या हृदयात स्थान कसे प्राप्त होणार? आणि अजून एक, मत्सर हा प्रेममार्गातील मोठा कंटक असतो. तो जर योग्यवेळी हटवला नाही तर, गृहस्थी विषमयी होते.” द्रौपदी सांगत होती, ” भामे, मी सदैव सहज नैसर्गिक राहण्याचा प्रयत्न करते. माझ्या वर्तनात शक्यतो कृत्रिमता असणार नाही, याची काळजी घेते. मी आपल्या वर्तनात, चालण्या-बोलण्यात विनम्रता बाळगते. मी प्रत्येक कृती सारासार विचार करून, विवेकाचा उपयोग करून करते. आणि सर्वप्रथम महत्त्वाची बाब म्हणजे, मी शरीराने व मनाने सदैव शुचिर्भूत- निर्मळ राहते. स्वतःच्या अभिमानाला बाजूला सारून स्वतःच्या पतींची सेवा करते. याशिवाय माझ्या अन्य सपत्नींवर भगिनीप्रमाणे तर, सपत्नींच्या पुत्रांवर माझ्या पुत्रांप्रमाणे प्रेम करते. सपत्नीच्या वर्तनातील दोष वेचून- वेचून मी निष्कारण त्यांची तक्रार पतीकडे करत नाही.

कुठलाही सपत्नीकडून काही चूक झाली तर, त्याचा तणाव पतींना न देता मी स्वतःच त्या समस्येचे निवारण करते. मी माझ्या आचरणात, चालण्या- बोलण्यात कधीच अमर्यादता, असभ्यता येऊ देत नाही. मी आपल्या पतींच्या चुका वारंवार त्यांना सांगत नाही अथवा त्यांची अति स्तुतीही करत नाही. मी त्यांच्या चांगल्या कृतींचे सदैव समर्थन करते व अपगामी कृतींना विरोधही. मी पतींच्या भोजन, शयन, जलपान, आसन, शस्त्रास्त्रे, शस्त्राभ्यास, सभासमय इत्यादींची सुचारु व्यवस्था ठेवते. त्यांच्या प्रत्येक कार्यकारणाचा नित्यक्रम सदैव माझ्या लक्षात असतो. अलस्याचा त्याग करून मी प्रत्येक कार्य वेगाने करते व विशिष्ट वेळेत पूर्ण करते.

याखेरीज कोणीही परपुरुष कितीही सुंदर, पराक्रमी असला, तरी माझ्या मनाच्या भक्कम दुर्गामध्ये प्रवेशू शकत नाही. मी माझे मन कधीच आपल्या पतींना समर्पित केलेले आहे. याशिवाय मी कुठल्याही परपुरुषासह अधिक काळ वार्तालाप करत राहत नाही. कारण त्यामुळे माझी नित्यकर्मे अडून राहू शकतात. मी माझ्या पतींना सदैव सत्य सांगण्याचा प्रयास करते. माझ्या पतींना जे अप्रिय आहे, ते करणे मी शक्यतो टाळते. किंबहुना मी त्यांना प्रिय नसलेल्या भोजनपदार्थांचा त्याग केलेला आहे.” द्रौपदीच्या मुठी आवळल्या गेल्या, ”आणि त्यांच्याशी मनात शत्रुत्व धरणाऱ्या मनुष्यांशी मी संपर्क करत नाही. इतकेच नव्हे, त्यांचे आतिथ्यही मनापासून मला करवत नाही.” हे शब्द

उच्चारताना द्रौपदीला कौरवांचे स्मरण घडले होते. तिने एक उच्छवास टाकला आणि पुनः बोलायला आरंभ केला, ''माझी माझ्या पतींवर पूर्णतः निष्ठा आहे. त्यांना अनुचित वाटेल, अशी कृती माझ्या हातून घडणार नाही, याचीही मला काळजी घ्यावी लागते. पती हाच स्त्रियांकरिता देव तसेच गति असून त्याचे अप्रिय करणे टाळावे, असेच माझे मत आहे. मात्र तू असे समजू नकोस, की जर पतीने आपल्या सन्मानाला धक्का देणारी अनुचित आज्ञा दिली तरी, त्या आज्ञेचे पालन करावे. प्रत्येक स्त्रीने आपल्या सन्मान तसेच अधिकारांबाबत सूज्ञ असले पाहिजे व दक्षही.''

''तुझे पती जर प्रवास, तीर्थाटन, तपश्चर्या नि वनवासाकरिता दूरदेशी गेले तर, तुझा दिनक्रम कसा असतो?''

''भामे, पती दूरदेशी केल्यानंतर स्त्रीच्या कार्याचा भार अधिकच वाढतो. पती दूरदेशी गेले, तर मी शक्यतो व्रतस्थ राहून त्यांच्यासाठी शुभचिंतन करते. जर मी माझ्या एका पतीच्या सान्निध्यात असेन व अन्य पती दूरदेशी गेला, तर मला ते संभव होत नसे. परंतु वनवासात असताना अर्जुनांच्या तपकालात मी शृंगाराचा त्याग केला होता. आणि जरी माझे पाचही पती माझ्यासह असले तरी, मी आपला वेळ प्रसाधनकार्यांत घालवत नाही. याशिवाय व्यर्थ वादविवाद करणे, अथवा वृथा तिरस्काराने बोलणे, उगीचच सतत हसत राहणे मला मुळीच रुचत नाही.

आणि अजून एक म्हणजे मी माझ्या पतींविषयी संशय बाळगत नाही व आपल्याकडे काय कमी आहे, कशाचा अभाव आहे अशा तक्रारी वारंवार करत नाही. कारण असमाधान नि संशयाकारणे नात्यांमध्ये तेढ निर्माण होते.” द्रौपदीने पुन्हा उसंत घेतली, ”याखेरीज मी राजमाता कुंतीची स्नान, भोजन, जलपान, वस्त्र इत्यादींबाबत काळजी घेते. त्यांनी सांगितलेल्या कुलाचारांचेही मी पालन करायचे. आणि मी एका पांडवाचे गुणदोष अन्य पांडवास सांगत नाही. मातृकुलाचे श्रेष्ठत्व मी सांगत बसत नाही. याशिवाय इतरांचे भाग्य सुफळ आहे नि मी किती दुर्भागी आहे, असंही सांगत नाही. नाहीतर त्याकारणे असमाधान व अविश्वास निर्माण होऊ शकतो. मी माझ्या इच्छा तसेच आवश्यकता आपल्या पतींना वारंवार सांगत राहत नाही. सत्यभामे, मी माझ्या पतींची हृदय जिंकून घेण्याचं अजून एक कारण म्हणजे माझी सुसंबध्द कार्यव्यवस्था. पूर्वी इंद्रप्रस्थात असताना आमच्याकडे सहस्रावधी दासी-सेवक होते. त्यांची नावे, त्यांना सोपवून दिलेली कार्ये नि त्यांच्या कार्यांच्या वेळा याची नोंद माझ्याकडे असायची. याशिवाय त्यांच्या व्यक्तिगत आवश्यकता- भोजन, निवारा अशा गरजा पूर्ण होतात की नाही, हे मला पहावे लागे, चक्रवर्ती समाज्ञीच्या नात्याने. या कार्यांच्या इतक्या मोठ्या जंजाळातही माझ्या पतींच्या भोजनाच्या वेळा व त्यांच्या आवडीचे पदार्थ लक्षात घेऊन मी भोजन करून त्यांना वाढायचे. हे माझं अतिशय प्रिय कार्य आहे. कारण हे कार्य करताना पतींचे क्षेमकुशल

करणे अत्यंत सुलभशक्य होई. हे कार्य झाल्यानंतर गुप्तचर, सेवक, सामंतादि तत्सम अधिकारी व्यक्ती कशा प्रकारे कार्य करतात का, याचेही परीक्षण करावे लागे. त्याकारणे जनतेवर अन्याय होतो की नाही, त्यांच्या तक्रारींचे निवारण करणे हीदेखील माझी कार्य होती. भामे, तू सांग मला, द्वारकेच्च्या कोषागारात किती संपत्ती आहे व कृष्ण त्यातील किती संपत्तीचा व्यय करतो?''

''मला ज्ञात नाही.'' सत्यभामेचे उत्तर.

''मात्र मला आजही आठवत आहे, सहस्त्र हत्ती एकत्र बसले तर, तेवढी जागा व्यापेल इतकी रत्ने, संपत्ती होती आमची. आणि त्याची प्राप्ती व व्ययाविषयी मी नोंद ठेवत असे. इंद्रप्रस्थाची अर्थव्यवस्था माझ्या नियंत्रणाखाली होती.'' द्रौपदीने अभिमानाने म्हटले, ''याशिवाय पांडवाचे राजनैतिक, आर्थिक व्यवहार मला ज्ञात असत. अन् राजसूय यज्ञावेळी येणाऱ्या अतिथींचा सत्कार व भोजनाची व्यवस्था करण्याकडे माझे सदैव लक्ष असायचे. मी उगीचच कुठल्याही अतिथीची वारेमाप स्तुती करायची नाही अथवा त्याची उपेक्षाही करायची नाही. शिवाय सहस्त्रावधी दासी असूनही पतींनी सांगितलेल्या कार्याचे निर्वाहन मीच करायचे, त्याकारणे माझे पती माझ्यावर प्रसन्न असत. विशेष म्हणजे माझ्या पतींनी सांगितलेली वार्ता, एखादी विशिष्ट बाब मी सदैव गुप्त ठेवण्याचा प्रयत्न करते, सत्यभामे. आणि म्हणूनच माझे पती विशिष्ट

कार्यासाठी नगरातून प्रयाण करताना ते सगळ्या व्यवस्थेचे उत्तरदायित्व माझ्यावरच अत्यंत विश्वासाने सोपवायचे.”

“द्रौपदी, जर आपल्या पतीने बाहेरच्या व्यवहारांविषयी काहीच सांगितलंच नाही, तर?”

“तर आपण त्याच्याकडून वदवून घेतले पाहिजे, तेही प्रेमाने. पती दुरून गृही परतल्यास त्याचे स्वागत करून व त्याचे प्रिय खाद्य-पेय देऊन त्याचे क्षेमकुशल विचारावे. जर त्याची भावस्थिती प्रसन्न नसेल, तर त्याला काहीच न विचारण्यात सूज्ञता समजावी. मीही असेच करते. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे आपला पती विद्वान वा ज्ञानी असला, तर आपल्याही ज्ञानाच्या कक्षा रुंदावणे आवश्यक असते. कारण पतीला पत्नीकडून शारीरिक सुखाशिवाय सूज्ञता, परिपक्वता, समस्या सोडविण्याची व सारासार विचार करण्याची तार्किक क्षमताही अपेक्षित असते. म्हणून तर मी धर्मराजांसह धर्माधर्माचा व राजनीतीचा ऊहापोह करते, भीमसेनांना पाककलेचे ज्ञान देत असते, अर्जुनांसह धनुर्वेदाविषयी, विभिन्न बाणांविषयी चर्चा करते, मी नकुलांसमवेत काव्यशास्त्रविनोद करते- समस्यापूर्तीदेखील करते, मी सहदेवांशी तत्वज्ञानासंबंधित वाद-प्रतिवाददेखील करते. परंतु राजनीती आणि अर्थव्यवस्था हे माझ्या चर्चेचे -कार्याचे प्रिय विषय आहेत. याखेरीज माझ्या पतींच्या प्रसन्नतेचे कारण हेही आहे की त्यांच्याप्रमाणे मलाही राज्यकारभारात गति व रुची

आहे.” इतकं सर्व ऐकून सत्यभामेने म्हटले, “पुरे, पुरे, द्रौपदी! हे सर्व करणे दूरच तर, हे सर्व ऐकूनच माझ्या मुखावर स्वेदबिंदू उमटले. तुझ्याप्रमाणे गृहस्थी करणं कुठल्याच स्त्रीला संभव नाही.”

“आणि मला भाग्यवान समजण्याचा विचारही करु नकोस. कारण पतिव्रता- सद्गुणी स्त्रियांना सदैव दुःख व आपत्ती सहन करावी लागते. तरीही त्या दुःखाला प्रतिकार करण्याचा हर्ष त्यांना पुनः सज्ज करत असतो.” द्रौपदी दुखावल्या स्वरात म्हणाली. परंतु त्या स्वरातही काहीसे ओज होते.

ते ऐकून सत्यभामा पश्चात्तापदग्ध झाली आपण वस्तुस्थिती न समजून घेता बालिशपणे असे प्रश्न केले, हे आपलंच चुकलंच!

खरोखरच या पांचालीसारखं- पांचालीइतकं करणं आपल्याला शक्य नाही. आपण उगाच तिच्याबद्दल ईर्ष्या बाळगली. या विचाराने ती लज्जित झाली. तिने क्षमा मागण्याच्या अविर्भावात हात जोडले, ” कृष्णे! मी बालिशपणे कसे प्रश्न विचारले! मी तुझी अपराधी आहे.”

“काय झालं? स्वयं भामिनी याज्ञसेनीची क्षमा मागतेय! कारण काय आहे?” अकस्मात पर्णकुटीच्या द्वारातून आवाज आला.

पाण्डव कृष्णासह परतलेले पाहून द्रौपदी क्षणार्धात उठली, तशी आपल्या पतीच्या स्वागतार्थ सत्यभामाही उठली.

“पाहिलंत, पाण्डुपुत्रहो! माझ्या सखीने, माझ्या प्रियतमेमध्ये कसं परिवर्तन घडवून आणलं आहे!” कृष्णाने प्रशंसेच्या स्वरात म्हटले.

“मग तर, शेवटी पट्टराणी कुणाची!” पाण्डवांनी अभिमानाने म्हटले. ते ऐकून द्रौपदीच्या गालांवर आरक्त रंग तर, ओष्ठांवर मंदस्मित उमटले.

.

(अजूनही बंध अनवसित आहेत)

# परिशिष्ट

१) पाषाण :- दगड

२) दर्भ :- धारदार गवत, ज्यामुळे सर्पांच्या जिव्हा दोन भागांत विभागल्याची कथा गरुड पुराणात आहे.

३) सडासंमार्जन :- जमिन शेणाने सारवत फुलांचा सडा घालणे.

४) नीलांगिनी, ऋतानृता, शुभा, कल्याणी, सर्वयोषिद्वरा, पांचाली, याज्ञसेनी, पार्षती:- द्रौपदीची विभिन्न नावे.

५) अकिंचन :- मलिन, अशुचित.

६) संधान साधणे :- निशाणा साधणे.

७) प्रयाण, प्रस्थान, गमन :- विशिष्ट कार्यसिद्धीकरिता गृहत्याग करुन विशिष्ट स्थानी जाणे.

८) रत असणे, रममाण होणे :- आपला प्रियकर/प्रेयसी अथवा पती/पत्नीसह एकांतात प्रणयमग्न असणे.

९) विषाद :- दुःख.

१०) शल्य :- सल.

११) गोहरण :- जेव्हा ब्राम्हणांच्या गायी चोरांनी पळवल्या, तेव्हा अर्जुन त्या चोरांना धरण्याकरिता गांडीव धनुष्य घेण्यासाठी युधिष्ठिर-द्रौपदीच्या शयनकक्षात जातो व त्यामुळे नियमभंग होतो, अन्य भ्राते अडवत असतानाही तो वनवासाला जातो.

१२) बंधकी :- पाच पुरूषांशी संबंध जोडणारी स्त्री.

१३) गति :- गंतव्य.

१४) भालप्रदेश :- कपाळ.

१५) केशाकर्षण :- केश ओढणे.

१६) विश्वस्त :- विश्वासार्ह.

१७) परास्त :- पराजित.

१८) एवमस्तु :- ( हे) असेच असू दे.

१९) भूर्जपत्र :- भोजवृक्ष किंवा भूर्जवृक्षाचे मोठे पान, ज्यावर टाकाच्या साहाय्याने संदेश लिहिला जातो.

२०) मृगाजिन :- मृगचर्माचे वस्त्रांकित आसन

२१) अनिमिषपणे :- क्षणात मुखस्तंभ होणे.

२२) निबिड :- घनदाट.

२३) स्कंध :- खांदे

२४) मंडल :- मंदिराच्या वास्तुरचनेतील गोलाकार आसनरचना.

२५) सुचारू :- अत्यंत उत्तम.

२६) अनुसंवेदना :- अतिशय सखोल संवेदना.

२७) परिमल :- सुगंध.

२८) उत्पलगंधे :- कमळांचा सुगंध जिच्या अंगाला येतो, अशी पांचाली.

२९) दमन :- संयत करणे.

३०) परिवेश :- वातावरण, परिसर.

३१) स्वेदबिंदू :- घामाचे थेंब.

३२) अंत:पुर :- राणीवशा, राणी महाल.

३३) किरमिजी :- केशरी.

३४) क्लांती :- थकवा.

३५) सरीसृप :- सरपटणारे प्राणी.

३६) शिलाखंड :- ( येथे अर्थ) बर्फ गोठल्यानंतर निर्माण होणारे पाषाण.

३७) प्रमाद :- चूक.

३८) मतितार्थ :- अर्थ, तात्पर्य.

३९) विदुषी :- विद्वान स्त्री.

४०) स्थापत्य :- वास्तुरचनेचे शास्त्र.

४१) लोकपाल :- कुबेर देव.

४२) श्रांत :- थकलेला.

४३) हिमपुंज :- हिमाच्या गारा.

४४) न्यूनता :- अभाव.

४५) अधर :- ओठ.

४६) निष्कांचन :- ज्याच्याकडे सुवर्ण, धन नाही, असा.

४७) अपरिमित :- अगणित.

४८) साराध्य :- भीम व राजकन्या कालीचा पुत्र.

४९) विजिगीषू :- विजयाची इच्छा धरणारा.

५०) मुग्ध :- मोहित होणे.

५१) कृश :- बारीक, कोमल. (टीप:- मात्र कृश असणाऱ्या द्रौपदीच्या मांसपेशी क्रोध वा युध्दावेळी कठोर व्हायच्या, म्हणून तर तिने जयद्रथ व कीचकाचा सामर्थ्याने प्रतिकार केला होता. )

५२) सर्वग :- भीमसेन व बलंधरेचा पुत्र.

५३) अनुक्षोभ :- दुःख व क्रोधाचे मिश्रण.

५४) समुचित :- उचित समयाला उचित कृती.

५५) संचित :- चिंतित, ( दुसरा अर्थ) पूर्वजन्मीचे प्रारब्ध.

५६) उपशम :- शांत करणे.

५७) स्यपक्व :- परिपक्व, समजदार.

५८) निरवता :- निःशब्दता.

५९) प्रकर्षाने :- तीव्रतेने.

६०) दैहिक :- देहासंबंधितचे.

६१) प्रभासक्षेत्र :- एक प्रसिद्ध देवस्थान, तीर्थक्षेत्र.

६२) अमरावती :- स्वर्गाची राजधानी.

६३) प्रत्यंचा :- धनुष्याची धातूमयी दोरी.

६४) गांधर्ववेद :- एक उपवेद, नृत्य व गायनाचे पूर्ण ज्ञान ज्यात आहे.

६५) त्रिकालसत्य :- वर्तमान, भूतकाळ व भविष्य या तिन्ही काळांमध्ये जे सत्य आहे, ते.

६६) संवेग :- भावनांचे आवेग.

६७) वरवर्णिनी :- जी दिसायला अत्यंत सुंदर आहे आणि जी सदैव उपवरा(तरूण) दिसते, अशी द्रौपदी.

६८) च्यवनभार्गव :- भृगू ऋषींचा पुत्र, सती सुकन्येचा पती.

६९) प्राश :- अश्विनीकुमारांनी निर्माण केलेली व तारुण्य- उत्साह पुनः मिळवून देणारी औषधी.

७०) रथागार :- जेथे रथांची निर्मिती, डागडुजी केली जाते, असे स्थान.

७१) चारुमती :- कृष्ण व सत्यभामेची पुत्री, जी सारथ्य कर्मात कुशल होती, असे म्हटले जाते.

७२) दारुक :- कृष्णाचा प्रिय सारथी.

७३) परिहार :- निवारण, उपशम.

७४) चेकितान :- यादवांचा एक सेनानायक, पुष्पद नामक प्रदेशाचा राज्यकर्ता.

७५) ऊहापोह :- उचित व अनुचित काय आहे यावर केलेली चर्चा.

७६) संयोग :- सहेतुक घडवून आणलेली कृती.

७७) सात्यकी:- सत्यकाचा पुत्र व यादवांचा प्रमुख सेनापती.

७८) अनुजा :- कनिष्ठ भगिनी.

७९) हृदयगंत :- हृदयातील गुज.

८०) इंद्रसेन :- पाण्डवांचा गुप्तचर व युधिष्ठिर- द्रौपदीचा सारथी.

८१) इंद्रावती :- इंद्रसेनाची पत्नी.

८२) अग्निस्त्रोत :- सहदेवाने लिहलेला ग्रंथ, ज्यात औषधी निर्माण कशा निर्माण कराव्या याबाबत मार्गदर्शन केले आहे.

८३) मंजिरी :- तुळशीची बीजे.

८४) अनवसित :- असमाप्त.

८५) ग्लांततंद्री :- दुःखतंद्री.

८६) उच्चरव :- मोठ्याने बोलणे.

८७) परामर्श :- सल्ला, मार्गदर्शन.

८८) दाशार्ह सैन्य :- यादवांच्या दहा कुलांचे सैन्य.

८९) अभ्युदय :- उन्नती, भाग्योदय.

९०) परिहास :- चेष्टा मस्करी.

९१) कृतवर्मा :- यदुवंशाचा एक सेनानायक, हार्दिक्यचा भ्राता.

९२) मातली :- इंद्रदेवाचा सारथी.

९३) कल्पपुष्प :- कल्पवृक्षाची फुले, जी कधीच कोमेजत नाहीत.

९४) रथमंचक :- रथातील आसन.

९५) गुणकेशी :- गरूडाची पुत्री.

९६) हार्दिक्य :- हृर्दिकाचा पुत्र, भोजवंशी सेनानायक.

९७) निवातकवच :- ज्या राक्षसांनी स्वर्गावर आक्रमण केले आणि जे अर्जुनाकडून पराभूत झाले, ते राक्षस.

९८) भानुमती :- सहदेवाची पाचवी पत्नी व शैनी कुलातील कन्या.

९९) मित्रसेन :- इंद्रसेनाचा भ्राता.

१००) संयत :- नियंत्रित

१०१) श्रुत :- ऐकिवात, ऐकून आहे.

१०२) वृथा:- व्यर्थ.

१०३) कोषागार :- खजिना.

१०४) अपार्जित:- दुसऱ्याने प्राप्त केलेले.

१०५) पणन्वयन :- द्यूतात पणाला लावणे.

१०६) लोकोत्तर :- असामान्य.

१०७) अनुरंजन :- मनाचे रंजन करणे.

१०८) अपगामी :- विरोधी वा प्रमादिय कृती.

१०९) दुर्ग :- गड, किल्ला.

११०) प्रसाधन कार्य :- शृंगार.

१११) संवहन :- निर्वाह

११२) *अर्जुनाला शिवस्तुतीकरिता वीणा देऊ नकोस. कारण त्याने एकदा वीणेच्या तारा छेडताना ताराच तुटल्या होत्या* :- या शब्दांचे स्पष्टीकरण :- अर्जुन महाबाहू होता, त्याच्या सामर्थ्यशाली बाहूंनी वीणेची तार किंवा धनुष्याची प्रत्यंचा धारण केल्यास ती प्रत्यंचा वा तार खंडित व्हायची.

*११३)* सपत्नी :- सवत, पतीची दुसरी पत्नी

११४) मधुपर्क :- वृषभक नामक वनस्पतींच्या पर्णांचा रस व काहीसं मधु, दही घालून तयार केलेले पेय, जी शुभकार्यासाठी व कार्यसिद्धीकरिता दिले जाते. ( वेदांचा व ब्राह्मणकांचा संदर्भ)

११५) इन्दीवरे :- नीलकमळे.

११६) किंवदन्ति :- कोणा एकाने सांगितलेल्या गोष्टी.

११७) पुन्डीरिक :- श्वेत कमळ

११८) ऋत :- सृष्टीचे नियामक तत्त्व, त्रिकालसत्य, (ऋग्वेदाचा संदर्भ)

११९) परिमल :- सुगंध.

१२०) सोपान :- जिन्याच्या पायऱ्या.

१२१) नीरजनयन :- कमळांप्रमाणे असलेले डोळे.

१२२) कंटक :- काटे.

१२३) वाण :- एक लहानसे तंतुवाद्य, जे वीणेप्रमाणे असते.

१२४) देवांगना :- अप्सरा

१२५) पाषाणखंड :- दगडांचे खडे.

१२६) नवनीत :- लोणी.

१२७) विभीषिका :- दुःख, शल्य, खिन्नता (पोकळी)

*१२८) नेत्रौ यस्या सुन्दरौ, सा वरवर्णिनी |*

*सा सस्यश्यामला, मित्रा कृष्णस्या च मे संड्गिनी ||*

*सा अस्माकना प्राणेशा |*

*याम् प्राप्तुव्यम् वयम् च द्वेषे ज्वलिताः नैका नरेशाः ||*

*अर्थ :- जिचे नेत्र सुंदर असून जी सदैव उपवरा (तरूण) दिसते, ती मेघांप्रमाणे श्यामल आहे, ती कृष्णाची सखी व माझी सहगामिनी आहे.*


*ती आमची ( पांडवांची) प्राणेश्वरी आहे, जिला आम्ही प्राप्त केले व अनेक नरेश आमचा द्वेष आणि मत्सर करू लागले.*


*माझी ही महाकादंबरी वाचून कशी वाटली, हे*

*shaktileelanikita@gmail. com या माझ्या इमेल आयडीवर रिप्लाय देऊन कळवा.*

## निकिता पाटील यांची ई साहित्यवर प्रकाशित पुस्तके


पुस्तक
वाचण्यासाठी
कव्हरवर
क्लिक करा












## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्षं.
## निकिता पाटील यांचं ई साहित्यवरचं हे सहावं पुस्तक.

निकिता राजेश पाटील ही मूळची डोंबिवलीची असून सद्यकालात तिचे वास्तव्य काही वर्षांपासून वांगणीत आहे. कुटुंबात लेखनाचा वा साहित्याचा वारसा असा नाही. पण अगदी शालेय वयातच तिला लेखनाची ऊर्मी शांत बसू देईना. वयाच्या तेराव्या वर्षापर्यंत तिने पूर्ण पुस्तक होईल इतके लिहिले. नंतर मराठी साहित्याचा रितसर अभ्यास करून आता ती साहित्याच्या वेगवेगळ्या रसांच्या निर्मितीचा अनुभव घेत आहे. तिने लिहिलेल्या यापुर्वीच्या पुस्तकांचे कौतुक जाणकार वाचकांनी केले आहे.

अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. पण त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकविक्रीबद्दल प्रकाशक साशंक असतात. जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आली नाही तर त्यांचे नांव प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या. पण आता इंटरनेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत नेण्याचे काम अनेक संस्था करत आहेत.

ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ६ लाख वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्यासाठी

ई साहित्यचे प्रयत्न चालू आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, कुमार सोनावणे, प्रतिक उकले, सुजाता सिद्धा, गायत्री रोडे, मनोज कळमकर, काजल दळवी, सचिन बोरसे, कार्तिकी भट, डॉ. प्रितम दरवडे, अमोल गवळी, निकिता पाटील, संजीवनी देशपांडे, अंकिता शिंदे, काजल दळवी असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?